९८३८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. २२
REFBK-0005722



डॉ. केतकर.

# भटक्या

लेखक

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर,

एम्. ए., पीएच्. डी.

संपादक, महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

प्राचीन महाराष्ट्र, निःशस्त्रांचें राजकारण, महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण,
आशावादी, ब्राह्मणकन्या, गांवसासू, परागंदा, गोंडवनांतील
प्रियंवदा, विचक्षणा, इत्यादि पुस्तकांचे लेखक.

---

सप्टेंबर १९३२

REFBK-0005722

किंमत एक रुपया

प्रकाशक :
महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ, लि.
पुणें ४.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत. ]

मुद्रक :
मंगेश नारायण कुलकर्णी,
कर्नाटक प्रिंटिंग प्रेस,
कर्नाटक हाऊस, चिराबझार, मुंबई, नं. २

# पूर्वसूचना.

डॉ. केतकर यांच्या कादंबरीचे ओळखीदाखल दोन शब्द लिहिणें म्हणजे यःकश्चित् दिवटीनें सूर्यप्रकाशाची ओळख करून देणें याप्रमाणें होणार असल्यामुळें मी ती करून देण्याचा प्रयत्नच करीत नाहीं. शिवाय या कादंबरींतील पहिलें प्रकरणच मुळीं कादंबरीचा आढावा देत आहे. डॉ. केतकर यांच्या कादंबऱ्यांबद्दल मी इतकेंच म्हणेन कीं, त्यांच्या कादंबऱ्या ह्या सर्वच समाजांस समजण्यास कठीण आहेत व यामुळेंच त्यांचा फैलाव सर्वत्र झाला नाहीं, परंतु ज्यांच्या ज्यांच्या वाचनांत त्या आल्या, त्यांना त्यांना विचाराचा चटका लावणाऱ्याच झाल्या आहेत.

उपमा देऊनच बोलावयाचें म्हटलें तर त्यांच्या कादंबऱ्या पक्व फणसाप्रमाणें आहेत. ज्याप्रमाणें पक्व फणस आंतील गऱ्यांनीं खाणारांचीं मनें जशीं आनंदित करतो व हा आनंद उपभोगीत असतां ज्यांत हे गरे साठविले होते त्या बाहेरील कांटेरी सालीची त्यांस आठवणहि रहात नाहीं, त्याप्रमाणें डॉक्टरांच्या कादंबऱ्या शाब्दिक बोजडपणामुळें कांटेरी वाटत असल्या तरी पण त्यांतील पूर्णत्वास पोंचलेल्या विचारांनीं वाचकांचीं मनें तल्लीन करतात इतकेंच नव्हे, तर आपणांस अपूर्व असा ठेवा मिळाला असेंहि त्यांस वाटल्याशिवाय रहात नाहीं व यामुळें कांटेरी वाटत असलेला शाब्दिक बोजडपणाचा विचार हा वाचकांच्या मनाचा ठाव सोडतो.

डॉ. केतकरांच्या मृत्यूस आज एक वर्ष पांच महिने झाले. त्यांच्या मृत्यूनंतर ८–९ महिन्यांनींच त्यांनीं लिहून ठेवलेलें राजकारणावरील Victorious India नांवाचें पुस्तक मीं प्रसिद्ध केलें. त्यानंतर आज ही कादंबरी प्रसिद्ध करण्याचें श्रेय मला मिळत आहे.

प्राचीन महाराष्ट्र ग्रंथाचें हस्तलिखित ताबडतोब प्रेसमध्यें देण्यास तयार आहे किंवा नाहीं याबद्दल मला पूर्ण माहिती नसल्यामुळें मी हस्तलिखिताचें चांगल्या तज्ज्ञ मंडळींकडून वाचन करून घ्यावयाचें, तसेंच सुरक्षितपणासाठीं संपूर्ण हस्तलिखिताची नक्कल करावयाची असें ठरविलें. या कार्यास कांहींतरी वेळ हा लागणारच.

व या काळांत आम्ही कार्यशून्य न रहावें म्हणून या मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन त्यांचीं वरील दोन पुस्तकें प्रकाशित केलीं.

डॉ. केतकर यांचें बरेंच अप्रकाशित लिखाण प्रकाशित करावयाचें आहे. या बाबतींत माझ्या कांहीं इच्छा आहेत व त्यांतील दोन तर जास्त बलवान् आहेत. एक, त्यांचें सर्व हस्तलिखित प्रकाशित करून आमच्या आश्रयदात्या ग्राहकवर्गास जितकें लवकर वाचण्यास व मनन करण्यास देतां येईल तितकें लवकर देणें व दुसरी म्हणजे, माझ्या हयातींत सर्व लिखाण प्रसिद्ध झालेलें मी पहाणें या होत.

प्रकाशित करावयाच्या पुस्तकांपैकीं "प्राचीन महाराष्ट्र" हें जास्त मोठें व जास्त खर्चाचें पुस्तक होय. मला अशी बळकट आशा आहे कीं प्राचीन महाराष्ट्र या ग्रंथाचा पुढचा भाग म्हणजे शातवाहनपर्वाचा भाग २ हा, थोडक्याच महिन्यांत जनतेपुढें सादर करतां येईल.

या सर्व गोष्टीस आर्थिक आनुकूल्य पाहिजे. डॉ. केतकरांची आर्थिक परिस्थिति सर्व महाराष्ट्रश्रुत आहे, इतकें लिहिलें म्हणजे पुरे.

आम्हांस आर्थिक साहाय्याची आवश्यकता आहे. परंतु ती डॉ. केतकरांच्या बाणेदारपणास व तत्त्वास साजेशी अशीच पाहिजे. जर डॉ. केतकरांचें कोणतेंहि पुस्तक आपण विकत घेतलें तरी सुद्धां त्यांच्या अप्रकाशित लिखाणास आपण पूर्ण साहाय्य केलें असें मी समजतें.

या संधीचा लोकांस फायदा देण्यासाठींच आम्हीं दोन पुस्तकें अगोदर छापलीं असेंहि समजण्यास हरकत नाहीं.

तारीख १०-९-३८

**शीलवती केतकर.**

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रास्ताविक | १ |
| २ | बाल्य आणि तारुण्य | ३ |
| ३ | आमचें वेटोळें | ६ |
| ४ | घरांतून पलायन | १० |
| ५ | खासगी नोकरीकडे प्रवृत्ति | १४ |
| ६ | वाण्याच्या घरच्या नोकरींतील रहस्यें | १८ |
| ७ | बटाट्याच्या चाळींतील हकीकत; माझें लग्न | २६ |
| ८ | युद्धकाल आणि युद्धोत्तरकाल | ३२ |
| ९ | डॉ. घैसास यांचें अंतेवासित्व | ३८ |
| १० | डॉ. घैसास यांच्या प्रयत्नांचें वैयर्थ्य | ४५ |
| ११ | डॉ. घैसास कसे वळले | ५३ |
| १२ | नर्मदाबाई सरवटे | ५५ |
| १३ | इनस्पेक्टर खर्चे | ६२ |
| १४ | माझा शिक्षक विठु घोमण | ६७ |
| १५ | नाशिकची सफर | ७३ |
| १६ | डॉ. घैसास यांचा संस्थानांतील अनुभव | ७६ |
| १७ | डॉ. घैसास यांच्या अप्रियतेचीं कारणें | ८१ |
| १८ | " घटकर्पर "ची अर्वाचीन आवृत्ति | ८६ |
| १९ | इलेक्शन एजंटाचे थोर आचार्य | ८८ |
| २० | निवडणूकशास्त्रांत माझें शिक्षण | ९३ |
| २१ | रावबहादुरांचा खासगी आयुष्यक्रम | ९६ |
| २२ | रावबहादुरांचें कौटुंबिक रहस्य आणि मानवी योजनांचें वैयर्थ्य | ९९ |
| २३ | पहिले " साहित्य-शिखर " दादा कावळे | १०२ |
| २४ | माझें दुसरें लग्न | १०९ |
| २५ | स्वातंत्र्य-युद्धांत माझा भाग | ११३ |

# डॉ. श्री. व्यं. केतकर, एम्. ए., पीएच्. डी.

यांचीं

## प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

| | |
|---|---|
| प्राचीन महाराष्ट्र [ शातवाहनपर्व भाग २।३ ] प्रत्येकीं. | १०–०–० |
| स्त्री-सत्ता पराभव नाटक [ आगाऊ १–४–० ] | १–१२–० |
| कायस्थ प्रभूंचा सामाजिक इतिहास [ आगाऊ १–८–० ]. | २–०–० |
| ज्ञानकोश पुरवणी [भाग २४।२५] | १५–०–० |
| [ महायुद्धोत्तर जग, भाग १ ते ४ ] | |
| निरनिराळे विषयांवरील संकीर्ण लेख | |

## प्रसिद्ध झालेलीं पण आमचेकडे विकत न मिळणारीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| १ | परागंदा | [ कादंबरी ] | १–८–० |
| २ | गांवसासू | [ ,, ] | १–८–० |
| ३ | विचक्षणा | [ ,, ] | २–०–० |
| ४ | निःशस्त्रांचें राजकारण | | १–०–० |
| ५ | भारतीय समाजशास्त्र | | १–८–० |
| 6 | History of Caste in India, Vol. II. | | 3–0–0 |

# भटक्या

प्रकरण १ लें.

## प्रास्ताविक.

आजच्या कथाप्रिय लोकांना श्रीमंत, जहागिरदार, सरदार, उच्च शिक्षणाचे पदवीधर, थोर पदवीचे सरकारी नोकर किंवा खोऱ्यावारी पैसे ओढणारे ब्यारिस्टर यांच्याच गोष्टी श्रवणीय वाटतात, असें अनेक कथालेखकांस वाटतें. माझ्यासारखे जे मॅट्रिक नापास झाले आहेत आणि सरकारी नोकरींत प्रविष्ट होऊं शकले नाहींत, किंवा प्रविष्ट झाल्यानंतर राहूं शकले नाहींत त्यांच्या कथा श्रवणीय नाहींत असें, वाचकहो तुम्हांस खरोखर वाटत आहे काय ? असें वाटत असल्यास त्या कल्पना सोडा. वर वर्णन केलेल्या लोकांचें आयुष्य जगाच्या दृष्टीनें यशस्वी झालें असेल व आमच्यासारख्यांचें यशस्वी नसेल; पण मजेंत आयुष्य घालविणें, जगाचें वैचित्र्य पहाणें, सर्व प्रकारच्या रसांचा अनुभव घेणें ही जगांत मनुष्याची इतिकर्तव्यता आहे असें तुमचें मत असलें तर त्या दृष्टीनें म्हणजे मनोरंजकतेच्या दृष्टीनें डॉक्टर, वकील, सरकारी नोकर इत्यादि कायम ठशाच्या आयुष्यक्रमापेक्षां आमचें आयुष्य खास अधिक अनुभवपूर्ण व उद्बोधक आणि भारतीय प्रचलित स्थितीचें निदर्शक आहे यांत शंका नाहीं.

अल्प अवलोकनाचे कादंबरीकार खरोखर जनतेचा अपराध करीत आहेत. मोठी परीक्षा पास होऊन लठ्ठ पगार मिळविणाऱ्या आणि पोतेंभर हुंडा हबकविणाऱ्या, एखाद्या

तरुणाचा विवाह जुळवून आणण्याचा प्रसंग आजचे कथालेखक मोठें रसभरीत वर्णन करून लिहितात. पण सर्व आयुष्यक्रमाचें निरीक्षण करावयाचें झाल्यास तसल्या व्यक्तींच्या आयुष्यक्रमापेक्षां आमच्याच आयुष्यांत विविधता अधिक सांपडेल. मुंबईसारख्या शहरांत दीड दोन आण्यांत गुजारा करण्याचें कौशल्य या यशस्वी लोकांनीं कधीं दाखविलें आहे काय ? ते समानतेच्या गप्पा मारतात, पण ब्राह्मण असून ब्राह्मण नाहीं असें सांगून ब्राह्मणेतर समाज, अस्पृश्य समाज, यांमध्यें दिवस काढण्याचा अनुभव त्यांना कधीं आला आहे काय ? कांहीं गुन्हा न करतां गुन्हेगार म्हणून पकडलें जाण्याचा अनुभव देखील थोडक्यांसच आला असेल. केवळ अपमान व दुःख याचेच प्रसंग आमच्या वांट्यास येतात असें नाहीं. आम्हां अल्पशिक्षितांमध्यें अनेक देखणेही तरुण असतात. देखणेपणाबरोबर नीतिकल्पनांचें ओझें बाळगणारा वर्गही आम्हां अल्प शिक्षितांत असतो. त्यामुळें नीतीनें मार्ग आचरणें भयप्रद झालें आहे, तथापि अनीतीनें वागणें सुखाचें आणि द्रव्यप्रद होणार हें दिसत आहे; असें असतां देखील आपलें सत्वरक्षण करणारे लोक आमच्यासारख्यांत असतील अशी कल्पना तरी कधीं आपणांस असते काय ? आमचा वैवाहिक आयुष्यक्रम श्रीमान् लोकांच्या आयुष्यक्रमापेक्षां हीनतर खास नाहीं. स्त्रीपुरुषांच्या सात्विक प्रेमाचा अनुभव आम्हांला मिळत नाहीं, व श्रीमंतांस मिळतो अशी कल्पनाच करतां येत नाहीं. सारांश काय कीं, आमच्या आयुष्यक्रमांत अनेक रहस्यें आहेत. त्याप्रमाणेंच धीरोदात्तपणाच्या अनेक गोष्टी आहेत, माझ्यासारख्याच्या आयुष्यांत त्याप्रमाणेंच माझ्या मित्रांच्या आयुष्यांत अनेक औदार्य दाखविण्याचे जे प्रसंग आले आहेत, त्यांची कल्पना आज तुमच्यासारख्या आरामखुर्चीवर बसून स्वस्थपणें मासिकें वाचणाऱ्या आणि काव्याच्या गप्पा करणाऱ्या लोकांना नसेल.

नवमतवादी तरुणांनों तुम्हांला आमच्या गोष्टी आम्हीं सांगाव्यात कीं सांगू नयेत असे प्रश्न माझ्यापुढें उभे रहात आहेत. कारण ज्या गोष्टी आमच्या आयुष्यांत आम्हीं स्वतःला गौरवास्पद समजतों त्या तुम्ही केवळ आमचा मूर्खपणाच समजाल.--समजांना ! आम्हांला त्याचें काय ? निंदा किंवा स्तुति एवढ्या दृष्टीनें मी कथन करीत नाहीं. आयुष्यक्रमाची विविधता लक्षांत यावी, आमच्या समकालिनांच्या सामाजिकस्थितीची चित्रणा पुरी व्हावी, एवढीच माझी मुख्य मनीषा आहे. व्यवहारांत ज्या अनेक व्यक्तींशीं माझा संबंध अगदीं निकटपणें आला आहे, त्यापैकीं अनेक व्यक्ति सार्वजनिक मोठेपणाच्या उपभोक्त्या आहेत.

त्यांचा आयुष्यक्रम जसा आमच्या नजरेस आला आहे, तसा तुमच्या नजरेस खास आला नाहीं. यासाठीं आमचें चरित्र आणि आमचें अवलोकन हें प्रचलित समाजाच्या इतिहासाचें एक महत्त्वाचें प्रकरण आहे, अशी माझी तर खात्री आहेच— पण आपण वाचाल आणि मनन कराल तर आपलीहि खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं. ग्रंथकाराचा लेखक, वकिलाचा कारकून, डॉक्टराचा कंपांउडर, राजकीय पुढाऱ्याचा हस्तक, वर्गणीवहाद्दराचा सहाय्यक, तरुण विधवाबाईचा मुखत्यार, सट्टेबाजाचा कारकून, या नात्यांनीं विविध क्षेत्रांत महत्त्वाची कामगिरी करणाऱ्याच्या अनुभवाबरोबर कोण आपल्या अनुभवाची तुलना करूं शकेल ? वाचकहो, दुरभिमान सोडा, आमच्या सारख्यांचें चरित्र निरीक्षा, म्हणजे तुम्ही खात्रीनें कांहीं शिकाल, एवढेंच नव्हे तर आपल्या तरुण मंडळींच्या भवितव्याविषयीं अधिक आशामय वृत्ति बाळगाल यांत शंका नाहीं.

—×—

प्रकरण २ रें.

## बाल्य आणि नव तारुण्य.

माझा वैयक्तिक वृत्तांत लहानपणापासूनचा मोठासा रसभरीत रीतीनें सांगतां येण्याजोगा नाहीं. अंजनवेलच्या गांवांत माझें बाल्य गेलें, आणि माझे आईबाप जिवंत असतांचा माझा आयुष्यक्रम अजून मोठ्या आनंदानें वर्णन करण्याजोगा मला अजूनहि वाटतो. अंजनवेल हें गांव लहान तरी टुमदार आहे. तेथील किल्ला, गांवास एक्याकाळीं असलेल्या मोठेपणाची साक्ष अजूनहि देत आहे. तेथील खोतांचें जें वैद्यघराणें त्या घराण्यांतलेच आम्ही. तथापि वैद्यांचीं घरें तेथें पुष्कळ असल्यामुळें माझ्या वडिलांच्या वांट्याला वर्षाकाठीं तीस रुपये येत असत तेवढेच. तथापि सर्व वैद्य मंडळीच्या जमावांतच आम्ही असल्यामुळें, खोताच्या घराण्यांतील म्हणून आमच्या वडिलांचा मान गांवांत होताच. आमच्या वडिलांना मास्तरकीचे व पोष्टाचे कांहीं रुपये मिळत, त्यामुळें त्यांचा संसार चांगल्या तऱ्हेनें चालून गावांतल्या अत्यंत प्रतिष्ठित व्यक्तींत ते मोडत होते. माझ्या आईचें माहेरघर गुहागरला होतें; त्यामुळें मला आजोळ देखील अगदीं जवळ होतें. अंजनवेलीहून दाभोळला जावयाचें

म्हणजे वेळदूरला जाऊन पुढें एक पैसा देऊन तर ओलांडावयाची. एवढाच खटा-टोप असल्यामुळें दाभोळची वैद्य मंडळी, अंजनवेलची वैद्य मंडळी ही सर्व वेणू-गोपाळच्या देवळांत जेव्हां ब्राह्मणभोजन होई त्या वेळेस एकत्र जमत; आणि त्या जेवणाच्या वेळच्या जमावावरून आम्हां गार्ग्य गोत्री वैद्यांचें घराणें किती विस्तृत आहे याचा नीट कयास लागला होता आणि आम्हां वैद्य मंडळींना आपल्या घराण्याच्या मोठेपणाची अगदीं स्पष्ट कल्पना आलेली होती.

लहानपणींच माझे वडील वारले. त्यानंतर दोन वर्षांनीं माझी आईहि दिवंगत झाली, आणि त्यामुळें जगांत आपण पोरके व निराश्रित आहों याची मला एकदम जाणीव झाली. वडलांच्या मृत्यूनंतर पण आईच्या मृत्यूपूर्वी मी गुहागराला म्हणजे आजोळीं राहात होतों. पण आई वारल्यानंतर थोड्याच दिवसांनीं मी पुढें चिपळुणास काकांकडे राहावयास गेलों. मी चिपळुणास गेलों तो आई वारली म्हणून गेलों असें नाहीं, तर शिक्षणासाठीं गेलों. त्यावेळेस माझें वय अवघें नऊ वर्षांचें होतें. चिपळुणास गेल्यानंतर आपण एका मोठ्या गांवांत गेलों असें प्रथम मला वाटलें. तथापि चिपळूण म्हणजे कोंकणची सरहद्द असल्यामुळें देशावरच्या म्हणजे कऱ्हाड साताऱ्याच्या परिस्थितीच्या गप्पा चिपळुणास ऐकूं येत. येथें माझीं आयुष्याचीं पुढलीं आठनऊ वर्षें गेलीं. आमच्या काकांचें मत कीं, आम्ही फक्त अभ्यासच करावा, भराभर पारीक्षा पास होत जावें. इकडे तिकडे पाहूंसुद्धां नये. या त्यांच्या वृत्तीमुळें आम्हीं गोष्टींचीं पुस्तकें वाचतों कीं काय यांची त्यांस भीति वाटे. गोष्टींचीं पुस्तकें म्हणजे त्यांत विषय प्रेमाचा येणार. प्रेमाचा विषय वाचला म्हणजे अभ्यासाच्या पुस्तकांकडे दुर्लक्ष होणार, अशाच प्रकारची त्यांची मनोभूमिका असे. यामुळें ते माझ्या मनोवृत्तीचें नियंत्रण करण्याची खटपट करीत. त्याचा परिणाम मात्र उलट झाला. जें मला निषिद्ध होतें तिकडेच माझें मन जाई. वर्तमानपत्रें वाचावींत हें देखील काकांना संमत नव्हतें. आमचे काका चिपळूणच्या मामलेदार कचेरींत कारकून होते. व तेथील मामलेदार एक कायस्थप्रभू होते. त्या मामलेदारांचें नकळतपणें अनुकरण आमच्या काकांकडून होत असे. मामलेदारांच्या घरींच आमच्या काकांना जावें लागत असे व त्यामुळें त्यांच्या घरच्या अनेक गोष्टी त्यांच्या नजरेला येत. ते मामलेदार आपल्या मुलांस सांगत असत कीं वर्तमानपत्रें मुलींच वाचूं नयेत. वर्तमानपत्रांत सरकारवर टीका असते. आणि आपल्याला तर सरकारची नोकरी करावयाची आहे. सरकारविरुद्ध वर्तमानपत्रें वाचल्यानें आपल्या

मनाची चलविचल होते, ती होऊं नये यासाठीं वर्तमानपत्रांचें वाचन आपणांस बिलकुल उपयोगी नाहीं. जेव्हां तुला इंग्रजी चांगलें समजत जाईल तेव्हां टाईम्स-सारखीं इंग्रजअधिकाऱ्यांस मान्य असलेलीं वर्तमानपत्रें वाचावींत. या तऱ्हेच्या गोष्टी गुप्ते मामलेदारांच्या घरीं झाल्या म्हणजे त्यांचीच उजळणी आमच्या घरीं होई. अर्थात् त्याचा परिणाम मात्र उलट होई. सरकारचें व्यंग काढणारीं वर्तमानपत्रें वाचावींत. सरकारी नोकरीसाठीं खटपटच करूं नये, असें वाटे. येणेंप्रमाणें काय वाचावें या बाबतींत माझें व काकांचें मुळींच जुळत नसे. आणि ते सांगतील त्याच्या विरुद्धच आपण करावें अशी मनाची प्रवृत्ति होई.

नऊ वर्षांपासून सतराव्या अठराव्या वर्षांपर्यंत जो काळ गेला त्या काळांत चिपळुणास ज्या ज्या गोष्टी आमच्यापर्यंत पोहोंचत असत त्या त्या गोष्टींनीं माझ्या आणि माझ्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होत असे. आमच्या भावना जागृत व्हावयाच्या म्हणजे दोन क्षेत्रांत व्हावयाच्या; देशभक्ति आणि प्रेम हे आमचे विषय अगदीं लहानपणापासून होते. मी नऊ-दहा वर्षांचा असतांनाच पुरा देशभक्त बनलों होतों. आमच्या जवळच्या अनेक गांवांत जीं कोंकणस्थ ब्राह्मणांचीं घरें होतीं त्यांतील बहुतेक घराण्यांतील मंडळी पेशवाईच्या काळांत आमचा अमुक पूर्वज उदयास आला, अमुक लढाई त्यानें मारली अशा गोष्टी बोलतांना ऐकूं येत असत. आणि त्यामुळें आमचा देशाभिमान हा ऐतिहासिकतेवर आधारलेला होता. प्रेमभावना काय तारुण्य पक्कें स्थापित झालें असतांच जागृत होतात काय ? तसें समजत असाल तर चुकाल ! प्रेमभावनाच काय पण लैंगिकभावना देखील तेरा–चौदाव्या वर्षांच्या वयांत जागृत होतात. या वेळेस ज्या भोंवतालच्या मुली प्रेमाचा विषय होतात त्या ८।१० वर्षांच्या परकऱ्या पोरीच कशा असतील ? माझ्या मनांत तर प्रेमभावना ज्या मुलींविषयीं किंवा स्त्रियांविषयीं उत्पन्न होत त्या स्त्रिया अल्पवयाच्या पोरी नव्हत्याच तर बहुतेक संप्राप्त यौवना असत. त्यांत सर्वच अविवाहित असत असें नाहीं. तथापि ज्या विवाहित आहेत त्या आपल्या होणें शक्य नाहीं, ही भावना मनांत सदैव जागृत असल्यामुळें साधारणतः समवयस्क मुलींविषयींच प्रेमोत्कटता मनांत जागृत होत असे. जेव्हां मी चौदा वर्षांचा होतों तेव्हां चिपळूणला फार वाढलेल्या मुली म्हणजे १४ वर्षांच्याच होत्या. बहुतेकींचीं लग्नें त्यापूर्वींच आटपलेलीं असत. त्यामुळें माझ्या शेजारची गोदू व माझ्या बहिणीकडे येणारी मंजुळा या दोघी माझ्या विचारांचा विषय झाल्या. त्यावेळेस अर्थात जे प्रौढ विवाहाचे पुरस्कर्ते होते

त्यांचा मला संताप येत असे. माझ्या काकांनीं चौदाव्या वर्षींच माझें लग्न गोदूपाशीं करून टाकावें असें मला वाटे. पण माझे काका पडले जरा जबाबदारीच्या कल्पनांनीं ग्रस्त झालेले. मला उत्पन्न मुळींच नाहीं त्याअर्थीं माझी उपजीविका नोकरीवरच होणार, आणि नोकरी करण्याची पात्रता आल्याशिवाय लग्नच करण्यांत अर्थ नाहीं असलीं मतें ते बोलत. अर्थात मला त्या प्रकारच्या मतांचा फार राग येत असे. काकांना तरी काय इस्टेट आहे. त्यांना शिक्षणहि बेताचेंच आहे. असें असतां ते आपला संसार करूं शकले कीं नाहींत, असें असतां त्यांनीं माझ्या लग्नाचा विचार इतक्या व्यवहारी आणि भविष्य संशयी दृष्टीनें कां करावा असें वाटे. मी कधींहि लग्नाविषयीं आतुरता दाखविली नाहीं. उलट वायकोला संभाळावयाची ताकद आल्याशिवाय लग्न करणें हा वेडेपणा आहे, अशींच मी एकदां ऐकलेलीं वाक्यें पुन्हां पुन्हां उच्चारीत असें आणि आमच्या काकांना या प्रकारचा माझा समजुतदारपणा ऐकून मोठा आनंद होत असे.

—×—

प्रकरण ३ रें.

## आमचें वेटोळें.

माझ्यावेळच्या विद्यार्थीमंडळीमध्यें जगांत पुढें काय करावयाचें याच्या-संबंधानें चर्चा चाले. त्या चर्चेंत खऱ्या अपेक्षा मधूनमधून व्यक्त होत. वुद्धया विचित्र दिसणाऱ्या अपेक्षा मांडणारी मंडळी होतीच. त्यावेळच्या चिपळूणच्या विद्यार्थ्यांच्या डोक्यांतील मेंदू सुपीक नव्हता असें कधींच सिद्ध होऊं शकणार नाहीं. डॉक्टरी, वकिली किंवा सरकारी नोकरी हे तिन्ही धंदे मिळमिळीत असून कोणासच पसंत नव्हते, व तेच रडके धंदे आम्ही करूं असें बोलण्याची कोणाचीहि प्राज्ञा नव्हती. निदान आमच्या वेटोळ्यांतल्या मंडळींच्या तोंडांतून ठराविक धंद्याकडे वळूं इच्छिणारीं अधम वाक्यें कधींच निघालीं नसतीं. कॉलेजांत जायची मात्र बहुतेकांची इच्छा होतीच. आपण लोकदृष्टीनें सुशिक्षित होऊन कांहींतरी निराळें केलें पाहिजे असेंहि आमच्या मनांत येई. तथापि सध्यांच्या शाळा म्हणजे केवळ सरकारी नोकर तयार करण्याचे कारखाने आहेत, त्या शिक्षणांत कांहीं अर्थ नाहीं

अशीं वाक्यें पुणेकरांचीं वर्तमानपत्रें वाचून आम्हीं बोलावयास सवकलों होतों. तथापि त्याबरोबर आपला भावी आयुष्यक्रम निरुपायानें डॉक्टर, वकील किंवा सरकारी नोकर या तीन तऱ्हेच्या क्रियांत जाईल अशी कल्पना देखील प्रत्येकाची होती. हे नीरस आयुष्यक्रम पेशवाईच्या वेळच्या कथा ठाऊक असलेल्या वीरांस खरोखरच शोभादायक नाहींत असें आम्हांस वाटे.

आमच्या वेटोळ्यांत कांहीं कवी होते, कांहीं वक्ते होते, नाटकें देखील कांहीं लोकांनीं लिहिलीं होतीं; व आमच्या संघाचें एक हस्तलिखित प्रकाशित त्यावेळेस नुकतेंच सुरू झालें होतें. त्यांत आमचें कवित्व निदान भावना मधूनमधून व्यक्त होत असत. कोणत्या गोष्टी शक्य आहेत, कोणत्या नाहींत याचें ज्ञान नसणाऱ्या मंडळीला कल्पनेनें मनोरंजक चित्रें आपल्या अंतश्चक्षूंसमोर मांडण्याची क्रिया मुळींच कठीण नव्हती. इतिहास हा ज्याप्रमाणें आमच्या मनोराज्याचा आधार होत असे त्याप्रमाणें नाटकेंहि होत असत. चारुदत्तावर ज्याप्रमाणें श्रीमान वेश्येची कन्या आसक्त झाली त्याप्रमाणें आपल्यावर कोणीतरी आसक्त होणार नाहीं काय ? झाली तर किती तरी बरें होईल. आणि होणार नाहीं तरी कशावरून ? चारुदत्ताच्या आंगचे दोन गुण म्हटले म्हणजे ब्राह्मण्य आणि दारिद्र्य. हे दोन्ही आपल्या अंगीं आहेतच. तर उरलेल्या गोष्टी आम्हांस चारुदत्ताप्रमाणें साध्य कां होऊं नयेत असेंच वाटे. कित्येकांना आपण वर्तमानपत्रकर्ते व्हावें, आणि पकडलें जाऊन आपल्यावर खटला व्हावा आणि तो खटला चालू होईल तेव्हां तो ऐकण्यास गांवांतले सर्व लोक येतीलच, तेव्हां किंबहुना ज्या दिवशीं आपण पकडले जाऊं त्याच दिवशीं आपण मोठ्या आर्तस्वरानें

**जो लोक कल्याण । साधावया जाण**
**घेई करीं प्राण । त्या सौख्य कैचें ?**

असें उच्च स्वरानें गात गात जाऊं, असें त्यांस वाटत होतें. नाटककार आणि नाट्यनायक हे दोघेहि आमचे आदराचें स्थान होते. आमच्यांतील भावनायुक्तांस नाट्यविषय चारुदत्ताप्रमाणें आपलें चरित्र व्हावें असें ज्याप्रमाणें वाटत होतें, त्याप्रमाणें यशस्वी नाटककार व्हावें असे वाटत असे. देवलांचा काय पण माधवराव पाटणकरांचाहि मत्सर करणाऱ्या व्यक्ति आमच्यांत देखील असत. जेव्हां आमच्या गांवांतील कांहीं तरुण देखण्या ( विवाहित ) स्त्रिया नाटकांतील गाणीं म्हणत असत

तेव्हां विशेषें करून देवल व अण्णा किर्लोस्कर व कोल्हटकर यांचा आम्हांस मत्सर होई. आम्हीं रचलेलीं पदें ज्या वेळेस तरुण सुंदर स्त्रिया प्रेमानें गातील तो दिवस खरोखर भाग्याचा, असें आम्हीं मनांत ठरवून ठेवलें होतें; पण तें बोलत मात्र नव्हतों. आमच्या मनांत स्त्रीविषयक विचार येतात, ते जाहीरपणें सांगणें याची आम्हांस चोरीच होती. आम्ही बऱ्याच मंडळींनीं नाटकें लिहिलीं होतीं, तीं ज्याच्या त्याच्या मतें प्रसिद्ध नाटककारांच्या नाटकांपेक्षां अधिक चांगलीं होतीं. पण आपली नाटक कंपनींत दाद कशी लागणार, आपण कोठें एलएल्. बी. झालों आहोंत ? नाटक कंपनीनें श्रीपाद कृष्णांचीं नाटकें ते एल्एल्. बी. होते म्हणून घेतलीं. तितपत नाटकें आपण सहज लिहूं ही आमच्या वेटोळ्यांतील प्रत्येक कवीची खात्री होती. एवंच आमच्या वेळच्या कवीची महत्त्वाकांक्षा लोकप्रिय नाटककार होण्याची होती. तथापि दुर्दैवानें त्यांतून अजून कोणीहि नाटककार म्हणून पुढें आला नाहीं. याचें कारण आमच्या त्या वेळेच्या कवींचें वैगुण्य नसून बाजार पाठलागी नाट्यसंप्रदाय अजून आमच्या कवींच्या कवित्वाचें महत्त्व ओळखण्याच्या लायकीचा झाला नाहीं असेंच म्हणावें लागेल.

चिपळूणचेच आम्ही विद्यार्थी. चित्पावन ब्राह्मणांचें आद्यस्थान आमचें गांव आणि त्याचा परिसर होय. चित्पावनांचा आराध्य विषय जो परशुराम त्याचें क्षेत्र शेजारींच होतें. चिपळूणच्या खाडींतून वल्हीं मारीत परतीरास जाणें किंवा पाण्यांतून चालत जाणें याचा आम्हांस सरावच होता. आणि परशुराम–क्षेत्रांतील डोंगरावरून नदीचीं नागमोडी वळणें पहाण्यानें आणि पावसाळ्यानंतर चोहोंकडे दिसणाऱ्या हिरवळीमुळें ज्या डोंगरांचें कठोर स्वरूप झांकलें गेलें आहे त्या डोंगरांच्या अवलोकनानें कित्येकांचें कवित्व जागृत झालें होतें, तर कित्येकांचें परशुरामाच्या सान्निध्यानेंच जागृत होई. परशुरामाच्या कृपेनेंच कोंकणस्थ ब्राह्मणांस चांगले दिवस आले, आणि त्या परशुरामाचीच निद्रिस्थ झालेली इच्छा पुन्हां जागृत होऊन पुन्हां ब्राह्मणवर्गास उच्चत्व आणून देईल अशी आशा अनेकांच्या काव्यांतून व्यक्त होत असे. अर्थात् काव्याच्या प्रसाराचे जे दुष्परिणाम व्हावयाचे ते आम्हां सर्वांवर झालेच होते. कठोर व्यवहारदक्षता आणि काव्यमय वृत्ति यांचें वांकडें असावयाचेंच, आणि त्यामुळें आमच्या त्या वेळच्या तरुणांत व्यवहारदक्षता जागृत न होतां काव्यभावना तेवढ्या जागृत झाल्या. परिणाम असा झाला कीं आमच्या वेळच्या बऱ्याच हुशार विद्यार्थ्यांचें अभ्यासावरचें

लक्षच उडालें. जे विद्यार्थी लहान वयांत हुशार असतात त्यांपैकीं पुढें पुष्कळच मंदबुद्धि निघतात अशा तऱ्हेचा अनुभव मानसशास्त्रवेत्ते वारंवार सांगतांना दृष्टीस पडतात. तथापि त्याचें कारण तो केवळ स्वाभाविक नियम आहे असें वाटत नाहीं. लहानपणीं हुशार असलेला मुलगा दूरदृष्टि असतो. त्याला इतिहास समजला म्हणजे मागच्या काळाकडे तो भावनायुक्त तऱ्हेनें पाहूं लागतो, आणि यामुळें आधुनिक आयुष्याविषयीं त्यास अनास्था उत्पन्न होते. आमच्या वेटोळ्यांतल्या विद्यार्थ्यांच्या मनांत आधुनिक महत्त्वाविषयीं अनास्था उत्पन्न झाली यांत नवल तें काय! आम्हांस असें वाटे कीं परराज्यांत मोठेपणा मिळावयाचा तो आपल्या लोकांचे गळे कापण्यानेंच मिळावयाचा; तर मोठेपणा मिळविण्याचा प्रयत्न तरी कशाला करा आणि मोठेपणा ज्या शिक्षणानें मिळेल त्या शिक्षणाचें महत्त्व तरी काय? या तऱ्हेचे विचार आमच्या आयुष्याचें नियंत्रण करते झाले.

पूर्वी परीक्षांत जसे कोंकणस्थ ब्राह्मण वर येत तसे अलीकडे येत नाहींत, म्हणून वर्तमानपत्रांत मधून मधून लेख येत असत आणि त्यामुळें कोंकणस्थ ब्राह्मण ही जात अगदीं खचून गेली आहे काय? त्या जातीच्या कर्तृत्वाची परिसमाप्ती होत आली आहे काय? अशी पृच्छा करणारे लेख येत असत आणि ब्राह्मण त्याचप्रमाणें ब्राह्मणेतर मंडळी असें बोलत असत. खरोखर म्हणाल तर आमच्यापैकीं बऱ्याच जणांचें अभ्यासावरील लक्ष उडालें होतें. ज्या लोकांना इंग्रजी राज्य आलें हीच गोष्ट चांगली झाली असें वाटत होतें त्यांच्याकडून जसा झटून अभ्यास होत असे किंवा सरकारी नोकरी एकनिष्ठपणानें होत असे, त्याप्रमाणें या राज्याविषयों प्रेमभाव नसणाऱ्या मंडळींत राज्यकर्त्यांशीं सहकारिता करण्याची भावना कोठून उत्पन्न होणार? इतरांच्या मनावर या परिस्थितीचा परिणाम काय झाला असेल तो पूर्णपणें सांगतां येत नाहीं. माझ्या मनावर परिणाम झाला तो असा कीं ज्यास जगांत मोठेपणा आहे तो मिळविण्याविषयींचा उल्हासच निघून गेला होता. सरकारी नोकरी जर करावयाची झालीच तर ती आपद्धर्म म्हणून करावयाची, ती गोष्ट मोठी सन्मानाची म्हणून नव्हे.

—×—

प्रकरण ४ थें.

## घरांतून पलायन.

माझ्या हायस्कूलच्या आयुष्यक्रमांत कांहीं विशेष वावग्या गोष्टी झाल्या नाहींत. अभ्यासापासून मन व्यावृत्त करणाऱ्या गोष्टी केवळ राजकारण आणि प्रेमकल्पना या दोनच होत्या असें नाहीं. त्यापेक्षां देखील निराळ्या गोष्टी मनांत येत असत. अशामध्यें धार्मिक गोष्टींचा अंतर्भाव होई. "**धर्मासाठीं मरावें ॥ मरोनि अवघ्यांस मारावें**" वगैरे गोष्टी धंदेवाईक देशभक्त बोलत असत. त्यावेळेस आम्हांला काय माहीत कीं या तऱ्हेची बोलण्याची फॅशन पडली आहे. आणि पुण्याच्या लोकांचा असल्या लवाड गोष्टी बोलून पोट भरणें हा धंदाच आहे. आम्हांला या गोष्टी ठाऊक नसल्यामुळें धर्म, स्वार्थत्याग, यांसारख्या ठकवाठकवींच्या प्रवचनाला आम्हीं भुलून जात होतों. प्रत्येक मनुष्य देशमुक्ततेचें राजकारण करणार ! एक देशमुक्ततेसाठीं शाळा काढणार, आणि त्या शाळेला ग्रँट मिळावी म्हणून साहेबांकडे खेटे घालणार आणि स्वस्त शिक्षक मिळावे म्हणून स्वार्थत्यागाच्या गोष्टी करणार; तर दुसरा धर्मोद्धार आणि राज्यप्राप्ति यासाठीं मरावयाच्या गोष्टी बोलणार. काय करावयाचें हें कोणासच माहीत नाहीं. मोठ्या वयाच्या मंडळीनीं लहान वयाच्या लोकांस आपल्यावर विश्वास ठेवा म्हणून सांगून ठकवावें आणि शहरांतल्या लोकांनीं खेड्यांतल्या लोकांस ठकवावें. ही रीति राजरोस झाली होती व लोकमान्य झाली होती. जेव्हां राजकारणीं मंडळी देशोद्धाराच्या गोष्टी बोलत तेव्हां ते काय करणार आहेत हें विचारून त्यांच्याशीं चर्चा करतां येई. तथापि जेव्हां योगाभ्यास आणि धर्म यांवर बोलणारी मंडळी येत, तेव्हां सर्वच अदृश्य, त्यावर अधिकारयुक्त वाणीनें कोणीतरी कांहींतरी सांगावें तेंच दुसऱ्यानें ऐकावें आणि तें त्यानें विश्वासानें स्वीकारलें पाहिजे असा आग्रह धरावा. अशा प्रकारची परिस्थिति जेव्हां आम्हांस दिसूं लागली तेव्हां तिच्यापुढें आम्हांस पराभूत झालें पाहिजे. धर्म हा अर्थ, काम आणि मोक्ष यांच्यापेक्षां देखील आद्यत्व पावलेला पुरुषार्थ आहे. त्याची मागणी फार मोठी आहे. तनमनधन अर्पण केल्याखेरीज त्याची प्राप्ती होत नाहीं आणि ईश्वर प्रसन्न झाला म्हणजे कोणत्याहि गोष्टीचा तोटा नाहीं. इत्यादि

गोष्टींचा भडिमारा वर्तमानपत्रांतून, धार्मिक मासिकांतून आणि व्याख्यान–पीठांवरून होत होता.

रत्नागिरी जिल्ह्यांत धार्मिक वातावरण पुष्कळच आहे. अखिल भारतीय सर्व धार्मिक सांप्रदायांचे प्रतिनिधि येथें सांपडतील. येथें जुन्या ग्रामदेवतांची उपासना आहेच. त्यांचे नैवेद्य कोंकणस्थ ब्राह्मण अगदीं नियमानें देतात. येथें पंढरीला जाणारे वारकरी आहेत. येथें लोणावळ्याजवळच्या एकवीरेच्या यात्रेला नियमानें जाणारे कोळी आहेत आणि कोळ्यांच्या देवता चोहोंकडे आहेत. ब्राह्मणांचीं महत्वाचीं मुख्य स्थानें म्हटलीं म्हणजे पुळ्याचा गणपती आणि परशुराम–क्षेत्र. या दोहोंचा उत्सव जोराचा. आणि त्या उत्सवांत नेहमीं चोहोंकडच्या व्यक्ति तेथें येतात. परशुरामक्षेत्राच्या तेथें कांहीं तपश्चर्या करणारी मंडळी येतात. तेथें एक योगी म्हणविणारा स्वामी भूतानंद नांवाचा संन्यासी आला. तो अनेक लोकांचे रोग बरे करीत असे. आणि त्याला तेथेंच सर्व प्रकारच्या सिद्धि प्राप्त होतील असा दृष्टांत झाला होता. त्या भूतानंदांबरोबर एक शिष्य होता. तो शिष्य अनेक ठिकाणीं गुरूबरोबर हिंडला होता. त्याचा व माझा बराच स्नेह झाला. गुरुजी भूतानंद मजसारख्या सामान्य जनाजवळ बोलत नसत. तथापि त्यांच्या आयुष्यक्रमाबद्दल मला जिज्ञासा पुष्कळ होती. ही सर्व मंडळी शुद्ध मराठी बोलणारी होती. स्वामी म्हटलें म्हणजे उत्तर हिंदुस्थानचे, हिंदुस्तानींत बोलणारे असा माझा समज झाला होता, तो दूर झाला. स्वामींबरोबर कांहींतरी दिवस हिंडावें अशी इच्छा माझ्या मनांतून होती. त्यांतल्या त्यांत स्वामींना व त्यांच्या शिष्यांना आमच्या काकांनीं जेव्हां पुढीला बोलावलें, तेव्हां त्या स्वामींचा परकेपणा देखील नाहींसा झाला. जेव्हां स्वामींचें स्थानांतर करण्याचा प्रसंग आला तेव्हां मी त्यांच्याबरोबर जाण्याची गोष्ट काढली पण काका त्यास परवानगी देतना. स्वामी तेथून निघून दुसऱ्या एका गांवीं गेल्याचें कळलें. आपणच त्यांच्याकडे जाऊन बसलों म्हणजे स्वामी काय काय करतात तें पाहूं असें माझ्या मनानें घेतलें. उन्हाळ्याची सुट्टीहि होती तेव्हां मी ते कऱ्हाडला गेले याचा पत्ता काढून निघून गेलों. जातांना एवढा शहाणपणा केला कीं घरांत चुलत्यांना एक पत्र लिहून ठेवलें आणि त्यांत स्वामींची विद्या शिकून घेण्याच्या निश्चयानें मी बाहेर पडलों आहें, मी त्यांच्याकडे गेलों आहें, असें लिहून ठेवलें होतें. मला वाटलें कीं मला पकडून नेण्यासाठीं कोणीतरी येईल पण तसें कांहीं झालें नाहीं. दोन तीन दिवसांनीं चुलत्यांचें कार्ड मात्र आलें कीं

तुला स्वामींबरोबर हिंडण्याचा कंटाळा पंधरा–वीस दिवसांत येईलच. तसा कंटाळा आला म्हणजे निघून ये !

मी कऱ्हाडला गेलों, स्वामी व मी एका देवळांत उतरलों. स्वामींचा परिचारक म्हणून काम करूं लागलों. स्वामींच्या पायां पडायला कांहीं लोक येत त्याप्रमाणें माझ्याही पायां कांहीं लोक पडले. तेव्हां स्वामींच्या जवळ राहाण्याचें महत्त्व वाटूं लागलें. स्वामींचा आयुष्यक्रम अगदीं साधा होता. सकाळीं स्नान करावें, गुरुचरित्र वाचावें, किंवा दुसरे कोणतेतरी ग्रंथ वाचावे, नऊ वाजल्यापासून आलेल्या लोकांशीं संभाषण करावें, धार्मिक प्रश्नांसंबंधाचा वादविवाद करावा; दुपारीं जेवावें; वामकुक्षी करावी, पुन्हां लोक येतील त्यांना भेटावें, लोक कांहीं औषधोपचार व्हावा म्हणून येतील त्यांस आशीर्वाद द्यावा. तुमचें बरें होईल म्हणून प्रत्येकास सांगावें. त्यांच्या आचरणांत गुरुबाजी कोणत्याच तऱ्हेची दिसली नाहीं. अर्थात् त्यांचा एकंदर आयुष्य-क्रम अगदीं नीरस वाटूं लागला. आणि थोडक्याच दिवसांत मी कंटाळलों आणि परत येण्याचा विचार करूं लागलों. स्वामींचा आयुष्यक्रम जर इतका साधा असेल तर स्वामी होण्यांत तरी फायदा काय असें मला वाटलें. आणि परत जाण्याची गोष्ट काढतांच स्वामींनीं मला परवानगी दिली. ज्या दिवशीं परत जाण्याची त्यांनीं पर-वानगी दिली त्या दिवशीं मन मोकळें करून बोलणें झालें असें म्हणतां येईल.

"कऱ्हाडहून चिपळूणला जाणाऱ्या गाड्या उद्यां निघतील तर मी जातों."

"बरें आहे."

"पण मी आपल्याकडे येण्यानें माझें समाधान झाल्यासारखें मला वाटत नाहीं."

"मी तुला पाहुणा समजतों, सर्व तऱ्हेनें प्रत्येकाचें समाधान मी कसें करणार."

"आपणांस ज्या सिद्धि येत आहेत त्या शिकाव्यात, निदान शिकण्याचा मार्ग तरी समजावा अशी इच्छा होती."

"मला सिद्धि मुळींच येत नाहींत, हें मी तुला पूर्वींच सांगितलें आहे."

"आपण योगी आहांत अशी आपली प्रसिद्धि आहे."

"मी स्वतःला योगी म्हणत नाहीं."

"आपण लोकांचे रोग केवळ मनोबलानें बरे करतां."

"थोड्याशा अभ्यासानें कोणीहि हें करूं शकेल."

'आपण योगाभ्यास केला नाहीं काय ?"

" मुळींच नाहीं."

" तर मग आपण साधु कां झालां?"

" बाबा, प्रत्येक साधु हा योगी नव्हे. मी स्वतःला साधु देखील म्हणवीत नाहीं; मी चतुर्थाश्रम घेतला आहे, एवढेंच."

" तो आपण कां घेतला?"

" नेहमींच्या सांसारिक खटपटीपासून सुटावें म्हणून."

" म्हणजे?"

" म्हणजे एवढेंच कीं गृहस्थाश्रम अनेक वर्षें केला, मुलगे कर्ते-सवरते झाले, पैसे मिळविण्यासाठीं ज्या गोष्टी करीत होतों त्यांचाहि कंटाळा आला; आतां आयुष्य-क्रमांत पालट म्हणून चतुर्थाश्रम घेतला आहे."

" मग आपण काय करतां?"

" उपजीविकेची काळजी सोडून दिली आहे. ग्रंथ वाचावेत, मनन करावें या मार्गांतच मी आहें. मला योगमार्ग ठाऊक नाहीं आणि अणिमा व गरिमा ठाऊक नाहींत."

" मग हे आपले शिष्य काय शिकत आहेत?"

" हे माझे पूर्वाश्रमींचे भाचे आहेत. माझ्यासाठीं भिक्षा मागून आणावी आणि आम्हीं दोघांनीं खावी असें यांचें ठरलें आहे. यांना कंटाळा आला म्हणजे हें काम दुसरे एक भाचे आहेत ते करणार आहेत."

" म्हणजे तुमच्या अंगीं दैवी शक्ति किंवा अपूर्व शक्ति कांहीं नाहीं?"

" कांहीं नाहीं."

" पण लोक तसें मानीत नाहींत."

" आतां लोकांच्या पुढें काय करावयाचें! डोकें फोडायचें?"

" मग तुमचा चतुर्थाश्रम तरी घेण्याचा काय हेतु होता?"

" सांगितलें ना संसाराची काळजी सोडून दिली याची ही खूण आहे एवढेंच; माझ्या मतें प्रत्येक ब्राह्मणानें चतुर्थाश्रम घ्यावा. जन्मभर पैशाच्याच मागें लागण्यांत कांहींएक अर्थ नाहीं."

" तुमचें खरें स्वरूप किती जणांस माहीत आहे?"

"मला वाटतें, तुझ्या चुलत्यास ठाऊक आहे. तूं येथें माझ्या पाठोपाठ येशील अशी माझी अटकळ होती आणि म्हणून मी तुझ्या चुलत्यापाशीं देखील बोललों होतों. तुझा चुलता म्हणाला कीं राहूंद्या तुमच्या सहवासांत कांहीं दिवस. म्हणून ठेवून घेतला. तूं आल्यापासून गीता तर चांगली वाचून काढलीस ना?"

"होय."

"तुझ्या चुलत्यानें तेंहि सांगितलें होतें. बरें, आतां घरीं जाशील तेव्हां आम्ही सुखरूप आहों हें कळीव. आणि माझा उपदेश तुला घ्यावयाचा असला तर एवढाच घे कीं आयुष्यांत खूप पराक्रम करावा आणि शेवटीं आपलें चित्त शांत होण्यासाठीं चतुर्थाश्रम घ्यावा. पैशाच्या मागें न लागणें आणि लोकांस आपला उपयोग व्हावा हेंच ध्येय ठेवणें यांत जो मनाला आल्हाद होतो तो तुला प्राप्त होवो."

"आपण भूतानंद हें नांव कां घेतलें?"

"झालेल्या गोष्टींबद्दल मी दुःख मानीत नाहीं, उलट ज्या अनेक गोष्टी माझ्या हातून घडल्या त्यांच्या आठवणीनें मनाला आनंदच होतो म्हणून."

सांगावयाची गोष्ट एवढीच कीं अणिमा गरिमासारख्या सिद्धि मला प्राप्त झाल्या नाहींत पण भूतानंदाचें म्हणणें माझ्या कानांत अजूनहि गुणगुणतें.

—x—

प्रकरण ५ वें.

## खासगी नोकरीकडे प्रवृत्ति.

एकोणीसशें तेरासाल लक्षांत घ्या. तें मोठें महत्त्वाचें साल होतें; यांत शंका नाहीं. कारण या सालामध्यें एक महत्त्वाची गोष्ट घडून आली. अज्ञांस त्या प्रकारच्या गोष्टींचें महत्त्व वाटणार नाहीं. तथापि ती महत्त्वाचीच होती यांत शंका नाहीं. लोकांस जिचें महत्त्व वाटत नाहीं अशी गोष्ट म्हटली म्हणजे मी म्याट्रिकमध्यें तिसऱ्यांदा नापास होऊन परिक्षेचा नाद सोडून दिला त्यावेळेस माझें वय देखील वीस वर्षांचें होतें. परिक्षेचा नाद सोडणें म्हणजेच आयुष्यांतील कामगिरीस सुरवात करणें होय. माझी सुरवात त्या शुभवर्षींच झाली. मी मुंबईस नोकरी शोधण्यासाठीं दाखल

झालों. पण त्यावेळेस देखील नोकरी मिळणें कठीण आहे, अशा तऱ्हेच्या अफवा होत्याच. पण त्या सर्व खोट्या. खऱ्या अडचणींतल्या मनुष्याला नोकरी ही मिळतेच, असें माझें मत झालें आहे. ज्याला नोकरी मिळत नाहीं त्याला नोकरीची जरूरच नसते. मला नोकरी कशी मिळाली याचें स्पष्टीकरण विशेष करण्याचें कारण नाहीं. खरें कारण म्हटलें म्हणजे मला खरी जरुरी असल्यामुळें मिळाली. आणि कांहीं अवांतर गोष्टी निमित्तमात्र झाल्या. उदाहरणार्थ, ज्या बोटीनें मुंबईस आलों त्याच बोटीवर एक भाट्या होता, त्याची ओळख होय. त्याची एक इमारत बांधली जात होती. त्या भाट्याची ओळख माझ्या कामीं कशी काय पडली तें पुढें येईलच.

प्रथमतः रेल्वे, टेलिग्राफ, पोस्ट, म्युनिसिपालिटी इत्यादि ठिकाणीं नोकरीसाठीं अर्ज केले व ठराविक नकारहि मिळाले. मला मुंबईस थारा कसा मिळाला तें सांगितलें पाहिजे. मी मुंबईस आलों तो आमच्या चिपळूणचे दोन विद्यार्थी मुंबईस एका खोलींत रहात होते, त्यांच्याचकडे उतरलों होतों. त्यांच्या ओळखीनें त्यांच्या खाणावळींत जायची सोय झाली होती. खाणावळींत जेवावें, नोकरीसाठीं हिंडावें याप्रमाणें थोडा काळ गेला. पण या हिंडण्यामध्यें मला मुंबईचें ज्ञान चांगलें झालें. सुमारें महिनाभर भटकल्यानंतर नोकरीचा शोध निराळ्या दिशेनें करूं लागलों. सरकारी नोकरी नाहीं मिळाली तर व्यापारी नोकरी करावयाची, पण ती रेल्वे, ब्यांका आणि यूरोपीयन लोकांच्या लिमिटेड कंपन्या हींच माझीं नोकरी शोधण्याचीं स्थानें होतीं. त्या सर्व ठिकाणीं नकार मिळाल्यानंतर मला नोकरीसंबंधानें निराशा वाटूं लागली. या निराशेच्या निशेंत वाणगटांच्या हाताखालीं नोकरी करण्याचे विचार येण्यापूर्वी भिक्षापात्र हातीं घ्यावें, असाच मनाचा निर्धार झाला होता. तथापि त्या विचाराचा स्पर्शच मनास धक्का देता झाला. मग मी साध्या देशी व्यापाऱ्यांच्याकडे नोकरीस जावयाचें ठरविलें.

भिक्षापात्राच्या विचाराचा प्रवेश मनाला धक्का देता झाला, त्याचें कारण माझें आगबोटींतील एक संभाषण होय. तें एका वाण्याबरोबर झालें होतें. बोटीमध्यें तो वाणी माझ्याबरोबर गप्पा मारीत होता, व बरोबर आणलेल्या परिचारकांपैकीं एकाला तो हुकूम करीत होता. त्या नोकराला तो " अरे महाराज " असें म्हणे. पण हुकूम करी! महाराज म्हणण्याचें कारण तो नोकर ब्राह्मण होता, हें होय. मी त्या गुजराथ्याला विचारलें, " ज्यांना तुम्ही महाराज म्हणतां त्या मनुष्याविषयीं तुमच्या मनांत आदर असतो काय ? "

" मुलींच नाहीं. "

" तर मग तुम्ही त्याला महाराज कां म्हणतां ?"

" रीत पडली आहे म्हणून; " तुम्ही कसे मुसलमान दुकानदाराला " हजरत " म्हणतां; हजरत याचा अर्थ तर बाप. ज्याप्रमाणें तुम्ही मुसलमान दुकानदाराला सहजगत्या " हजरत " म्हणतां, दूध आणून देणाऱ्या परदेशी अहिरास " भय्या " म्हणजे भाऊ म्हणून म्हणतां त्याप्रमाणेंच आम्ही ब्राह्मण नोकरास " महाराज " असें म्हणतों.

" तुम्ही ब्राह्मणाला कमी मानतां कीं थोर मानतां ?"

" हा प्रश्न तुम्ही कठीण विचारलात. आम्हांला त्याचें उत्तर देणेंच फार कठीण आहे. आम्ही ब्राह्मणाला जास्तीही समजतों व कमीही समजतों. श्राद्धाच्या दिवशीं ब्राह्मणांना पितर समजून दक्षिणा देऊं, त्यांच्या पायां पडूं, पण व्यवहारांत त्यांना नोकर समजूनच वागवूं."

" तुम्ही ब्राह्मणांचें कर्म उच्च प्रतीचें समजतां कीं नाहीं ?"

" आमचा मुलगा ब्राह्मणासारखा वागूं लागला तर तें आम्हांस आवडणार नाहीं."

" तें कां बरें ?"

" ब्राह्मण अडचणींत आला तर भिक्षा मागेल. पण अस्सल वाणी भिक्षा कधींच मागणार नाहीं. तो लोकांना ठकवील, कर्ज काढील, बुडवील, पण तो भिक्षा मागणार नाहीं. माझ्या मुलानें दहा लोकांना ठकवून पैसे काढले तर मला त्याचें दुःख होणार नाहीं; पण तो भिक्षा मागतांना दृष्टीस पडला तर दुःख होईल. ब्राह्मणांनीं भिक्षा मागावी पण जर कोणी वाणी भाटिया किंवा पाटीदार कुणबी भिक्षा मागायला लागला तर त्याचा आम्हांस तिरस्कारच येईल."

" तर मग तुम्हीं ब्राह्मणाला हलकी, केवळ भिक्षेच्या अधिकाराची जात समजतां काय ? "

" मी ब्राह्मणांना केवळ भिक्षेकरी जात समजत नाहीं, पण आम्हां वाणी लोकांना भिक्षा जितकी लाजीरवाणी वाटते, दान घेणें जितकें लाजीरवाणें वाटतें, तितकें ब्राह्मणाला वाटत नाहीं, हें मला ठाऊक आहे. "

हें त्या वाण्याचें म्हणणें मला पटलें. पण त्याबरोबर ब्राह्मण जातीसंबंधानें ही हीन कल्पना व्हावी याबद्दल मला फार दुःख झालें. "Beg, borrow or steal"

असें आमच्या शाळेंत मास्तर म्हणत असत. त्या शब्दांची आठवण झाली, आणि असें वाटूं लागलें कीं, ती शब्दत्रयी योजणारा मनुष्य (ब्राह्मणेतरांच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास) कोणीतरी भटाळलेला इंग्रज असला पाहिजे यांत शंका नाहीं. माझी अहंमन्यता जागृत झाली आणि आपण भिक्षा कधीं मागावयाची नाहीं असें ठरविलें. आणि चोरी, फसवेगिरी, आणि ऋणकरीपणा, या अधिक प्रतिष्ठित गोष्टी आहेत असें माझ्या मनानें घेतलें, आणि जेव्हां नोकरी शोधण्याच्या क्रियेंत मी पराभूत झालों; तेव्हां आतां आपणांस भिक्षा मागावी लागेल व त्यास आपण तयार झालें पाहिजे असें वाटलें. पण भिक्षेचा विचार मनांत आल्याबरोबरच माझा स्वाभिमान जागृत झाला आणि मी ब्राह्मण, वाणगटांना तरी आपल्यापुढें प्रतिष्ठा सांगूं देणार नाहीं, अशी वृत्ति एकदम जागृत झाली आणि त्याबरोबर नेमिनाथ शेटशीं झालेल्या संभाषणाची पूर्ण आठवण होऊन नेमिनाथ शेटजीलाच आपण भेटावें असें ठरविलें. नेमिनाथ शेटजींचा पत्ता काढला, ते सांपडले. त्यांची गांठ घेतली. त्यांनीं लगेच कामावरही ठेवलें. त्यांचें काम म्हणजे सकाळीं सात वाजल्यापासून रात्रीं आठ-नऊ वाजेपर्यंत करावें लागे. पंधरा रुपये ठरले, पण काम एक महिनाभर झाल्यानंतर त्यांनीं पगाराचे पंधरा रुपये दिले व अडीच रुपये चहासाठीं दिले. त्यांचें काम चालू असतां एक बिल दोनदां दिलें गेलें होतें ती चूक मीं शोधून काढली. पण ती 'चूक' त्यांच्या भाच्याची असल्यामुळें शेटजींनीं तीबद्दल क्षमा केली. पण भाचा माझ्याशीं वैर करूं लागला. ती गोष्ट शेटजींच्या लक्षांत आली व त्यामुळें माझी नोकरी कायम झाली. शेटजी म्हणाले कीं मीं जर लबाडी कोठें केली तर भाचा ती बरोबर शोधून काढील, तुमच्या विरुद्ध तो गोष्टी सांगतच असतो; पण आम्हाला आमचा भाचा हवा व तुम्हीहि हवेत.

शेटजींच्या दोन इमारती माझ्या हातून झाल्या. म्हणजे मी प्रत्येक गोष्टीचा जमाखर्च ठेवीत होतों. प्रत्येक बिल पहात होतों. कामाची हजेरी घेत होतों. काम मोजीत होतों. दोन इमारती झाल्यानंतर मला आत्मविश्वास पुष्कळच उत्पन्न झाला आणि मी आपला पगार तीस रुपये करावा अशी शेटजींस विनंती केली. माझा शेटजींना बराच उपयोग होत असे. शेटजींनीं आपल्याकडेसच येऊन राहण्यास मला सांगितलें. तुम्हांला जेऊनखाऊन पंधरा रुपये देऊं, व रहाण्यासाठीं तुम्हांस चांगली खोली मिळेल. तुम्ही वाण्याच्या घरीं कसें जेवावें असा विचार मनांत आणूं नका. आमच्याकडे स्वयंपाक करण्यास ब्राह्मण असतो. तुम्ही आमच्या

बरोबरच जेवीत जा, आणि घरीं येत जा. आमची मोटार जाण्यायेण्यास तुम्हांलाहि उपयोगी पडेल.

शेटजींची माझ्यावर इतकी कृपादृष्टि झाली कीं ते मला घरांतलेच एक समजूं लागले. तुम्ही आमच्या जातीचे नाहीं, नाहींतर तुम्हांला आमची एक आप्त मुलगी देऊन सोयरीकहि केली असती, असें शेटाणी म्हणाली. इतक्या तऱ्हेनें मला आपलासा त्यांनीं करून घेतलें होतें. शेटजी आपलेपणानें जितके मला वागवीत तितका मी त्यांचा कट्टा नोकर बनत चाललों. ही गोष्ट पाहून शेटजींना आनंद होत असे.

माझें जेवण हलकें नव्हतें. चांगलेंच जेवण मिळत असे. दोन वेळ चहा मिळत असे. फळफळावळ मिळत असे. खावयाला कोणत्याहि तऱ्हेनें कमी नव्हतें. शेटजींनीं एकदां दिवाळीचें बक्षीस म्हणून चांगले कपडेहि करून दिले. म्हणजे माझा पगार जरी कमी होता तरी देखील मी चांगला प्रतिष्ठित मनुष्य आहें असें कपड्यांवरून कोणालाहि वाटेल.

—×—

प्रकरण ६ वें.

## वाण्याच्या घरच्या नोकरींतील रहस्यें.

नेमिनाथशेटजींचें गांव काठेवाडांत होतें. हे मोढबनिया म्हणून लोकांस ठाऊक होते. हे मूळचे जैन पण पुढें वैष्णव झालेले होते. तथापि त्यांच्या घरांत नेमिनाथ वगैरे जैन नांवें चालू होतींच. यांच्या गांवांत त्यांचें मोठें जुनें दप्तर आणि हिशोब असत. अलीकडे १० वर्षें त्यांनीं मुंबईस आपलें घर बांधलें होतें, आणि त्यांत गेल्या वीस वर्षांच्या हिशोबाच्या वह्या देखील आणून ठेविल्या होत्या. त्यांचे हिशोब म्हणजे इतिहासच असत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. नातीं-गोतीं हिशोबावरून निघत. कोणाची जन्माची तारीख हवी असेल तर हिशोबावरून ती काढतां येई. घराण्यांत एकाद्याला मुलगा अगर मुलगी झाली तर दहा रुपयांपासून शंभर रुपयांपर्यंत त्याला अगर तिला देणग्या मिळत. जन्म होईल त्याच दिवशीं आजाची अगर बापाची देणगी दहा रुपये मुलाला मिळावयाची व ती पुन्हां सहा टक्के व्याजानें जमा करून घ्यावयाची. दरसालचा हिशोब काढला तर जी किफायत झाली असेल ती

घरांतल्या मंडळींच्यामध्यें वाटली जावयाची व त्यांच्या नांवानें ज्या रकमा असतील त्यांवर व्याज चढावयाचें. मुलगा १८ वर्षांच्या खालीं आहे तोंपर्यंत त्याच्या नांवानें जी रक्कम असेल तिला व्याज फक्त सहा टक्के असावयाचें. पण जेव्हां तो अठरा वर्षांचा होईल तेव्हां त्याच्या रकमेवर व्याज साडेसात किंवा नऊ टक्के करावयाचें. कारण तो कायद्यानें सज्ञान झाला म्हणजे रक्कम कौटुंबिक निधींतून काढून भलत्या ठिकाणीं व्याजानें ठेवील अशी भीति असे. सहा टक्केप्रमाणें चक्रवाढ व्याजानें अठरा वर्षांत शंभराचे किती रुपये होतात ही गोष्ट बायकांना देखील ठाऊक असे. येणेंप्रमाणें प्रत्येकाचा पेढींत काय हिस्सा आहे याची माहिती प्रत्येकास असे आणि त्यामुळें लग्न कोणी कोणाशीं करावयाचें यावर फॅमिली कॉन्फरन्स भरत असे. मुख्य हेतु असा कीं लग्नामुळें रक्कम दुसऱ्याच्या पेढीवर जाऊं नये. ही दृष्टि लग्नांत जर प्राधान्यानें ठेवावयाची तर नोकर कोण ठेवावयाचे यांतहि विवक्षित दृष्टी असलीच पाहिजे. घरीं नोकर ठेवावयाचे ते आप्तांतलेच ठेवावयाचे, विशेषतः पेढीवर ज्यांचे पैसे असतील त्यांच्या मुलास नोकर ठेवावयाचे. ही वृत्ति पेढीवरचा जो कर्ता पुरुष अगर त्याचा मुनीम असेल त्याची असे, आणि पेढीवरील जो कर्ता पुरुष असेल तो योग्य पगार आपल्या मुलाला देईल, पक्षपात करणार नाहीं, या प्रकारचा विश्वास पेढीवर रक्कम ठेवणारांत असे. जेव्हां एखादी कंपनी काढावयाची असेल तेव्हां पेढीवरून कंपनींत पैसे जमाखर्चानेंच जावयाचे. पोरबंदर कन्स्ट्रक्शन कंपनी या नांवानें धंदा करण्याचें नेमिनाथ शेटजींनीं ठरविलें. त्या कंपनीचे म्यानेजिंग एजंट नेमिनाथजी असणार! आणि आपल्या पेढीवरचें भांडवल वापरलें जाणार. पण ऱ्या कन्स्ट्रक्शन कंपनींत भागिदार व्हावयाचें कीं नाहीं, हें त्या पेढींत रक्कम ठेवणाऱ्या आप्त वर्गानें ठरविलें म्हणजे पेढीवरची कांहीं जुनी रक्कम, कांहीं नवीन रक्कम कंपनीच्या नांवें जमा होणार, आणि कंपनी आपली सर्व रक्कम पुन्हां पेढीवरच ठेवणार. या तऱ्हेनें हा केवळ हिशोबी कारभार होणार, आणि पेढीवरचें भांडवल वाढणार. या सर्व बाबतींतला कायदा नेमिनाथशेटजींना पूर्णपणें अवगत होता. त्यांना इंग्रजी येत नसे. तरी त्यांना कंपनीचा कायदा अगदीं तंतोतंत समजत असे. ते कधींकधीं मला कंपनीच्या कायद्याचा सेक्शन वाचून अर्थ करावयाला सांगत. त्यामुळें मला देखील कंपनीच्या कायद्याची आणि व्यावहारिक कायद्याची चांगली माहिती झालेली होती.

नेमिनाथशेटजींच्या घरीं बऱ्याच मंडळीचा परिवार असे. त्यांना दोन मुलें

झालीं, पण तीं उतार वयांत असतां झालीं होतीं. त्यांची शेटाणी प्रथम फार स्थूल होती. पुढें ती कोणत्या तरी आजारीपणानें कृश बनली, आणि पुढें तिला मुलें झालीं. असा त्यांचा कौटुंबिक इतिहास होता. शेटजींच्या घरचे कर्ते मनुष्य म्हणजे त्यांचा पुतण्या व भाचा. दोघांचीं लग्नें झालेलीं होतीं. पण त्यांचा भाचा चुनीलाल याचें दुसरें लग्न झालें होतें. त्याची दुसरी बायको नानीबहेन ही वयानें अठरा एकोणीस वर्षांची; व चुनीलाल चाळीशीच्या जवळ आलेला. त्यामुळें त्याची बायको शेटजींचा पुतण्या खूपचंद याच्यावर थोडीशी प्रसन्न असल्यासारखी दिसे. तथापि खूपचंदाची बायको कुमुदसुंदरीचें लक्ष तिच्यावर होतें. कुमुदसुंदरी आणि नानीबहेन या दोघी शेटाणीच्या बहिणींच्या मुली होत्या. म्हणजे एकमेकींच्या मावस बहिणी होत्या. आणि त्यामुळें एकीच्या नवऱ्यानें दुसरीची थट्टा करावी, या प्रकारच्या गोष्टी अगदीं स्वाभाविक असत. तथापि कुमुदसुंदरीस आपल्या नवऱ्यानें नानीबहेनशीं सलगीनें बोलावें, हें मुळींच आवडत नव्हतें.

नेमिनाथशेटजींचें घर म्हणजे एक मोठें कुटुंब आहे असें जरी दिसत असे, तरी तें केवळ तसें नव्हतें. तो एक कुटुंबसमुच्चय होता. शेट आणि शेटाणी यांनीं जेवावयास बोलाविलें म्हणजे सर्वजण जमत असत. आणि आठवड्यांतून दोन-तीनदां तशीं जेवणेंहि होत; तथापि त्यांच्या मोठ्या कुटुंबांत जीं पोटकुटुंबें होतीं, त्यांचा बराचसा व्यवहार निराळा असे. प्रत्येक लग्न झालेल्या मुलीस आपल्या नवऱ्याला मिळणाऱ्या पैशांत त्याचा कारभार आटपण्याचें शिक्षण म्हणून म्हणा किंवा त्याच्या स्वतंत्रतेला बिघाड येऊं नये म्हणून म्हणा, प्रत्येक कुटुंबास एक किंवा दोन खोल्या निराळ्या दिलेल्या असत. त्यांत त्यांची शेगडी किंवा प्रायमस् स्टोव्ह असे व त्यावर प्रत्येक कुटुंब आपली रोटली, भाजी आणि चहा करीत असे. मोठा दिवाणखाना सर्वांचाच. कोणी कोणास भेटावयास आले तर त्यांस त्यानें मोठ्या दिवाणखान्यांत घेऊन जावयाची मुभा असे. याप्रमाणें नेमिनाथशेटजींचा पुतण्या लालजी आणि त्याची बायको कुमुदसुंदरी यांचें पोटकुटुंब निराळें असे. आणि चुनीलाल आणि त्याची बायको नानीबहेन हीं निराळीं रहात असत. मुख्य दिवाणखान्यांत इंग्रजी तऱ्हेचें फर्निचर होतें. त्याप्रमाणें एक झोंपाळाहि होता. नेमिनाथशेटजींना झोंपाळ्यावरच बसावयाची आवड असे. आणि त्यामुळें संध्याकाळीं नेमिनाथशेटजी घरीं यावयाचे ते झोंपाळ्यावरच बसावयाचे; तेव्हां झोंपाळ्यावरच गाद्या-गिरद्या ठेवलेल्या असत. जेवावयाला मंडळी बसत त्या वेळेस नेमिनाथशेटजी व्यासपीठासारख्या

आसनावर बसत. आणि त्यांच्यापुढें चौरंग ठेवलेला असे. त्यावर ताट ठेवीत. इतर मंडळी मात्र लाल पाटावर बसत असत. आणि त्यांच्या ताटाखालींहि एक लाल पाट असे. त्यांचें जेवण काशाच्या ताटल्यांत होत असे. काशाचीं ताटें आणि वाट्या एकदां केलीं म्हणजे दर वेळचा कल्हई करण्याचा खर्च चुकतो ही त्यांची दृष्टी असे. घरांतीलच भांडीं त्यांच्या जेवणखोलींत शोभादायक वस्तु म्हणून चक्क करून मांडून ठेवण्याची पद्धती त्यांच्या घरांत होती. त्यांच्या घरांतला जेवण करणारा ब्राह्मण "औदित्य सहस्र" जातीचा होता. त्याला मी दक्षिणी ब्राह्मण आहें, असें कळल्यानंतर तो माझी सरबराई विशेष करूं लागला. आपल्याला संध्या वगैरे करावयाची आहे काय? ताम्हन वगैरे लागलें तर घरांत आहे असें म्हणून तो आणून देई. मला देखील तेथें संध्या वगैरे करण्याची स्फूर्ति झाली व मी तेथें थोडी संध्या व पुरुषसूक्त म्हणूं लागलों. तें शेटाणी, कुमुदसुंदरी व नानीबहेन या लक्षपूर्वक ऐकत आहेत, आणि त्यामुळें माझ्याविषयीं त्यांना अधिक आदर वाटत आहे असें दिसून आलें.

मी तेथें रहावयास गेल्यापासून नानीबहेनचें लक्ष मजकडे लागावें अशा तऱ्हेचा प्रयत्न कुमुदसुंदरीनें केला असावा. माझें आणि चुनीलालचें फारसें चांगलें नाहीं, ही गोष्ट नानीबहेनला ठाऊक असेल, आणि तिची माझ्याविषयीं स्नेहबुद्धि नसणारच हें मी गृहीत धरून होतों. तथापि दोन–चार दिवसांत नानी-बहेन माझ्याशीं स्मितयुक्त भाषणें करूं लागली. त्यांतल्या त्यांत असें झालें कीं एके दिवशीं नानीबहेननें कांहीं एक प्रकारचा हलवा केला होता. तो मला खायला मिळाला, त्यावेळेस तो फार चांगला लागला. मीं त्याची तारीफ केली. तारीफ केली त्या वेळेस तो हलवा नानीबहेननें केला याची मला माहिती देखील नव्हती. तरी देखील कुमुदसुंदरीनें मीं त्या हलव्याची केलेली तारीफ नानीबहेनला खूप फुगवून सांगितली. नानीबहेन मला खूष करण्यासाठीं त्यानंतर बराच प्रयत्न करूं लागली. मला वारंवार नवीन चांगले चांगले जिन्नस तयार करून खावयास आणून देऊं लागली, असें दिसूं लागलें. मला प्रथम असें वाटलें कीं हा केवळ स्तुतीचा परिणाम आहे. तिनें मला भाऊ म्हणून माझा पूर्ण स्वीकार केला आहे, असें मी समजूं लागलों. तिच्या या चांगुलपणाचें कारण कांहीं निराळेंच असेल अशी मला कल्पनाच नव्हती.

मी खरोखर कामावर जावयाचा तो तिच्या नवऱ्याच्या बरोबरच जावयाचा. असें असतां मला भेटण्याची संधि तिला कशी प्राप्त होई, हें सांगितलें पाहिजे.

शेटजींच्या दिवाणखान्यामध्येंच एक आडोसा करून एक लहानसें ऑफीस केलेलें होतें. तेथें टेबलें, खुर्च्या, टाईपरायटर आणि कांहीं साहित्य असे. शेटजींना इंग्रजींत करावा लागणारा पत्रव्यवहार, मीच करीत असें. माझें इंग्रजी फारसें चांगलें नव्हतें, पण शेटजींच्या इंग्रजी गरजा देखील तितपतच होत्या. जेव्हां पत्रव्यवहारानें काम होणार नसेल, तेव्हां प्रत्यक्ष भेटून काम होत असे. शेटजींना येणाऱ्या पत्रव्यवहाराचें फायलिंग करणें; व्हाऊचरें जपून ठेवणें, हें सर्व काम माझ्याकडेसच दिलें होतें. आणि त्यामुळें मला कधीं तास दोन तास कामाच्या जागेवर उशीरां जावें लागे, आणि अशा वेळेस चुनीलालबरोबर खुद्द शेटजीच सकाळीं कामावर जात. अशा वेळेस मोटार माझ्यासाठीं पुन्हां दोन तासांनीं येत असे. अशा प्रसंगीं नानीबहेन माझ्यासाठीं कांहीं चांगल्या जिनसा करून आणून मला ऑफीसांतच खावयास देत असे. पुढें ती ऑफीसांत मी बसलों असतां आपल्या "भाई" चे केंस विंचरणें अशा गोष्टी करूं लागली. तरी देखील मला असें वाटे कीं, गुजराती लोकांत साधेपणा आणि प्रेमळपणा अधिक असावा. मला बहीण नसल्यामुळें बहिणीच्या प्रेमाचा अनुभव आपल्याला नाहीं तो आज नानीबहेनमुळें मिळत आहे असें वाटलें, व तिला मीं त्याप्रमाणें बोलूनहि दाखविलें. नानीबहेन माझ्याशीं नेहमीं स्मितयुक्त बोलत असे, आणि नानी बहेन मला आपला भाऊ मानते, अशा तऱ्हेची प्रसिद्धि घरभर झाली.

माझी खोली त्या घरांतच मुख्य दिवाणखान्याच्या पलीकडे पण एका बाजूला असे. इतर सर्व मंडळीची रहाण्याची जागा दिवाणखान्याच्या दुसऱ्या अंगास असे. त्या खोलीच्यापुढें गच्ची होती. आणि त्या गच्चीवर वाटेल त्यानें येऊन बसावें अशी मुभा असे; पण ती खोली व गच्ची दिवाणखान्या पलीकडे असल्यामुळें कोणी तेथें येत नसे. रात्रीं साडेनऊ दहा वाजल्यानंतर ती गच्ची माझ्याच मालकीची होत असे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मी आपल्या खोलींत रात्रींच बसत असें, आणि विशेषें करून वाचीत बसत असें. गोष्टींचीं पुस्तकें, इतिहास, काव्यें आणि वर्तमानपत्रें एवढेंच माझें वाचनसाहित्य होतें. मराठी ग्रंथसंग्रहालय हें आमच्या रहात्या घरापासून जवळच होतें. त्यामुळें वाचनाच्या पुस्तकांचा तोटा पडला नाहीं. कंपनी कायदा, भागीदारीचा कायदा वगैरे गोष्टींची माहिती मीं मिळविली होती. शेटजींचें काम जितकें चांगल्या तऱ्हेनें आपल्या हातून होईल तितकें आपण करावें, असें मी समजत होतों. शेट मधून मधून व्यापारी लोकांच्या गोष्टी सांगत असत. त्यांचा माझ्या मनावर मोठा परिणाम झाला होता.

एकदां शेटजींनीं जी गोष्ट दुसऱ्या एका कंत्राटदाराकडून ऐकली होती ती ते सहज बोलून गेले, आणि त्यामुळें माझ्या कंत्राटदाराच्या कारकुनाच्या निरस आयुष्यास देखील महत्वाकांक्षेची जोड मिळाली. आणि मी शेटजीचें काम तें आपलेंच समजून करूं लागलों होतों. आमच्या शेटजीनें दुसऱ्या एका श्रीमान ब्राह्मणमित्र कंत्राटदाराला विचारलें कीं तुम्हीं पैसे कसे मिळविले, आणि सुरवातीचें भांडवल कसें मिळविलें ? त्या ब्राह्मण कंत्राटदारानें आमच्या शेटला सांगितलें कीं, मी पूर्वी कामाठी कंत्राटदारांकडे कारकून म्हणून नोकरीला होतों. त्यावेळेस मीं इतक्या कसोशीनें काम केलें कीं, खुद्द मालक देखील तितकें करणार नाहीं. मालकाचें हित खुद्द त्याच्यापेक्षां मी अधिक पहात असें. आणि त्याविषयीं मालकाची अधिक खात्री पटून मालक बऱ्याचशा गोष्टी पाहीनासा झाला. आणि त्याच कारणामुळें सर्व मालवाले लोक माझीच खुशामत करूं लागले. माझ्या एकनिष्ठपणें काम करण्यामुळें मालवाले, मजुरीचे कंत्राटदार यांमध्यें वजन वाढलें. त्याप्रमाणें मालकावरही माझ्या दृष्टीनें फारच इष्ट परिणाम घडून आला. तो म्हटला म्हणजे मालक आळशी बनला हा होय. पुढें त्या इमारतीचें काम जेव्हां संपत आलें, तेव्हां मीं मालकाला म्हटलें कीं आतां पुढें मी स्वतःच्या नांवानें कंत्राट घेणार आहें, व त्यासाठीं आपली नोकरी मला सोडावी लागणार आहे. मालकापाशीं ही गोष्ट काढण्याच्यापूर्वी मीं जर खासगी कंत्राट घेतलें तर मला माल वगैरे पुरविण्यासंबंधानें मालवाल्यांकडून खातरजमा करून घेतलीच होती. मी प्रत्येक गोष्ट बारीक तऱ्हेनें पहाणारा आहें, ही गोष्ट सर्व मालवाल्यांना ठाऊक असल्यामुळें, मी ज्यांचें कंत्राट घेईन त्यांजकडून योग्य तऱ्हेनें पैसे वसूल करीन हीही खात्री मालवाल्यांस होती, आणि त्यामुळें त्यांनीं माझें म्हणणें कबूल केलें होतें. पुढें जेव्हां मी मालकापाशीं जाण्यासंबंधानें गोष्ट काढली, तेव्हां मालकानें संमति दिली नाहीं; तर पुढच्या कंत्राटामध्यें फायद्यांत रुपयाचा चार आणे भाग देऊं केला. आणि येणेंप्रमाणें मी मोठ्या कंत्राटदाराचा भागीदार झालों. आमच्या मालकास ही गोष्ट त्या ब्राह्मण कंत्राटदारानें सांगितली तेव्हां मी जवळच होतों. आणि तो गेल्यानंतर हा मनुष्य कसा यशस्वी आहे, याजपासून पुष्कळ गोष्टी कशा शिकण्यासारख्या आहेत वगैरे गोष्टी नेमिनाथ शेटजींनीं आमच्यापाशीं केल्या. त्यांचाही आमच्या मनावर मोठा परिणाम झाला होता.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे काम करून घरीं आल्यानंतर कांहीं वाचीत बसावें

असा माझा कार्यक्रम असे तर घरांतल्या इतर मंडळीचा आणि त्यांत विशेषेंकरून पुरुषांचा–स्त्रियांचा कार्यक्रम सिनेमा वगैरे पहावयास जाण्याचा असे. कधीं कधीं पुरुष मंडळी सिनेमास गेली तर बायकामंडळी एकत्र जमून गप्पा मारीत किंवा आपापल्या खोल्यांत जाऊन निजत. आणि कधीं कधीं मलाही त्यांच्या गप्पांत सामील होण्यास बोलावीत. त्यांच्या घरच्या गप्पांमध्यें जो माझा असा शिरकाव झाला त्यामुळें या वाणीलोकांच्या भोंवतालचें वातावरण बरेंच समजून आलें. वाणीलोकांत बायकांचीं लग्नें होण्याला जी अडचण पडते, त्यापेक्षां पुरुषांच्या लग्नाला अधिक पडते. आणि त्यामुळें स्त्रीपुरुषसंबंधविषयक एकंदर वातावरण बदलतें. स्त्रियांना बरेंचसें अधिक स्वातंत्र्य मिळतें, आणि जर स्त्रियांचें पाऊल वाकडें पडलें तर अधिक क्षमाशीलवृत्ति त्यांच्या पुरुषांत असते. एक तर अनेक वाण्यांस परंपरागत या विषयाच्या कथा ठाऊकच असतात. शाळामास्तर किंवा सरकारी नौकर यांस महिनोगणति घराबाहेर रहावें लगत नाहीं पण वाण्यांस व्यापारासाठीं प्रवासास जावें लागतें. आणि त्यामुळें या प्रवासी लोकांच्या स्त्रियांसंबंधीच्या कथा शुक-सारिकांच्या तोंडून प्राचीन ग्रंथकारांनीं वदविल्या आहेत. अमक्याची बायको कांहीं दिवस पळून गेली पण तिला नवऱ्यानें परत घेतली. एवढेंच नव्हे तर तिचीं आर्जवें करून तिला परत आणली, अशा अनेक गोष्टी वाणीसमाजांत नेहमीं ऐकूं येतात आणि त्यामुळें एकाद्याच्या बायकोचें "पाऊल वांकडें पडलें तर अधिक क्षमाशील दृष्टीनें आपल्या बायकोकडे पहाण्यास पुरुषांचें मन तयार झालेलें असतें." "शिवाय चमडी देईन पण दमडी देणार नाहीं," अशा अर्थाची जी व्यापारी लोकांत म्हण आहे, त्या म्हणीचा स्त्रिया काय अर्थ घेतात, त्याची कल्पना आली. आमची शेटाणीन ज्या बायका वाईट निघाल्या, परंतु त्यांस बिघडवणाऱ्या पुरुषाला आपल्या पैशाला हात कसा लावूं दिला नाहीं, अशा वाणी लोकांच्या बायका आहेत, असें सांगत असे. परंतु तुमची पांढरपेशा लोकांची बाई एकदां बिघडली म्हणजे ती अब्रूही गमावील, व पैसाही गमावील. "तिला बिघडवणाऱ्या पुरुषानें तिचे पैसेही लांबविले," अशा गोष्टी या मुंबईस मीं कितीक ऐकल्या आहेत. परंतु पुरुषानें नादीं लावून जिचे पैसे लांबविले, अशा गोष्टी तुम्हांस वाणी लोकांच्या विधवांत सांपडणार नाहींत. सांपडल्यास अगदींच थोड्या. सांगावयाची गोष्ट एवढीच कीं, वाणी बायकांत एकमेकींच्या सहवासानें जें शिक्षण मिळतें, तें द्रव्यरक्षणपर मिळतें. आणि नवरे जास्त वेळ कामावर असल्यामुळें किंवा बाहेरगांवीं गेल्यामुळें स्त्रियांवर कोणचा परिणाम होतो, हें सांगण्याची आवश्यकता नाहींच.

या गोष्टी सांगण्याचें मुख्य कारण असें कीं, त्या परिणामांचे परिणाम माझ्या तेथें राहाण्यावर झाले. नानीवहेन पुष्कळदां एकटीच असावयाची, आणि चुनीलाल बाहेर गेलेला असावयाचा. अशाच एके दिवशीं नानीबहेन एके रात्रीं माझ्या खोलींत आली, आणि चुनीलाल बारा वाजेपर्यंत येणार नाहींत, मला एकटीला भीति वाटते असें म्हणून तिनें माझ्या खांद्यावर हात टाकला. मला असल्या गोष्टींचा परिचय नसल्यामुळें मी घाबरलों, आणि माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला. आणि मी चटकन् खोली बाहेर पडलों व गच्चीवरच उभा राहिलों. थोड्या वेळानें नानीबहेन तिरस्कारयुक्त मुद्रेनें माझ्याकडे पाहून निघून गेली. आणि मीं खोलींत चटकन् जाऊन कडी लावून घेतली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझ्या नांवानें मोठीच ओरड झालेली ऐकूं आली. नानीबहेनला मीच आपल्या खोलींत ओढून नेत होतों, असा नानीवहेननें बोभाटा केला, आणि चुनीलाल, त्याला जेवढ्या शिव्या ठाऊक होत्या, तेवढ्या शिव्या मला देत होता. शेटजींनीं तो सर्व तमाशा पाहिला, आणि सर्व जणांस गप्प रहाण्यास ताबडतोब हुकूम केला, आणि मला ताबडतोब कामावर जाण्यास सांगितलें. मी कामावर जाण्यास निघालों तेव्हां दरवाजांत कुमुदसुंदरी मला भेटली. पण तिनें ज्या स्मितयुक्त मुद्रेनें मजकडे पाहिलें, त्यांत या ओरडीवर माझा बिलकूल विश्वास नाहीं, असा अर्थ भरला होता असें मला वाटलें.

हा सर्व गहजब नेमिनाथ शेटच्या आणि शेटाणीच्या कानावर गेला. मी शेटाणीला सांगितलें कीं, मी तुमच्या पायाची शपथ घेऊन सांगतों कीं, नानीबहेनवर वाईट दृष्टी मी ठेवली नव्हती व नाहीं. मी तिला बहिणीप्रमाणें समजत होतों. आणि तिनेंच माझ्या विरुद्ध ही कारवाई केली आहे. कारण तिच्या म्हणण्यास मी कबूल झालों नाहीं. शेटाणीला माझें म्हणणें खरें वाटत होतें असें दिसलें. पण शेटाणी म्हणाली, 'बाबारे, मीं प्रत्यक्ष कोणचीही गोष्ट पाहिली नाहीं, मी कोणती गोष्ट खरी धरूं. तुझें वर्तन आतांपर्यंत कांहीं वाईट नव्हतें हें मी कबूल करतें. अर्थात ही सर्व गोष्ट नेमिनाथ शेटजींच्या कानावर गेली. आणि संध्याकाळीं नेमिनाथ शेटजींनीं मला एकीकडे बोलावून नेलें. त्यावेळेस शेटाणी तेथें बसली होती. नेमिनाथ शेट म्हणाले नानीबहेन सांगते तें मी खरें धरीत नाहीं. तथापि तूं इतःपर आमच्या घरीं रहाणें योग्य होणार नाहीं. तूं आतां दुसरे कोठें बिऱ्हाड कर. तुला जेवून खाऊन आम्हीं पंधरा रुपये देत होतों. आतां इतःपर कोरडे पसतीस रुपये देत जाऊं. तूं कामावर रहा. जोंपर्यंत तूं कामामध्यें लबाडी केली नाहींस, तोंपर्यंत

तुझी भाकर शाबूद आहे. माझ्यावर इतकी तोहमत आली असतां देखील मला नोकरीवर ठेवतात, आणि माझ्यावर विश्वास ठेवतात, हें पाहून माझें हृदय शेटजीं-विषयीं आदरानें भरून गेलें. मी शेटजींचे आणि शेटाणीचे पाय धरले आणि तुम्ही मला खरोखर आईबापांच्या ठिकाणीं आहांत असें म्हटलें. दुसऱ्या दिवशीं कामावर गेलों तेव्हां मात्र निराळा ध्वनी ऐकूं येऊं लागला. कामावर दुसरा एक कारकून होता. त्याला चुनीलालनें असें सांगितलें कीं शेटजींना आम्हीं सांगितलेलें सर्व पुराव्यानिशीं पटलें. तथापि शेटजी पडले फार न्यायी. त्यांनीं ठरविलें कीं "हा मनुष्य आपल्या घरांतल्या स्त्रियांपाशीं ओळख होऊं देण्याला अयोग्य आहे. हिशोब ठेवण्यास अयोग्य नाहीं."

—×—

प्रकरण ७ वें.

## बटाट्याच्या चाळींतील हकिकत : माझें लग्न.

बटाट्याची चाळ म्हणजे मुंबईंतील जे अगदीं गरीब किंवा अगदींच गरीबींतून वर आलेले पांढरपेशे असतील, त्यांची रहाण्याची, त्याचप्रमाणें त्यांच्या अड्ड्यांची जागा. येथें अनेक अड्डे असत. कांहीं अड्ड्यांत यजुर्वेदीमंडळीचा भरणा असे, तर कांहीं अड्ड्यांत कोंकणस्थांचा व कऱ्हाड्यांचा भरणा असे. पुण्यासारख्या शहरापेक्षां मुंबईच्या या चाळींत सोवळेपणा व त्यांच्या दृष्टीनें धर्मनिष्ठा अधिक असे. या बटाट्याच्या चाळींत मी कांहीं दिवस घालविले, ते आमचे विद्यार्थी मित्रांबरोबर कांहीं महिने घालवल्यानंतरचे होत. विद्यार्थी मंडळींची स्थळी सोडून या अधिक अस्वच्छ जागीं जाऊन रहाण्यास अनेक कारणें प्रेरक होतीं. मला एक स्वतंत्र खोली पाहिजे होती ती या बटाट्याच्या चाळींतच बेताच्या भाड्यांत मिळूं शकली. स्वस्ताई-खेरीज माझा तेथें जाण्यांत दुसरा एक हेतु होता. माझें लग्न व्हावें असें मला वाटत होतें; पण तो हेतु मीं मनांतल्या चोर कप्प्यांत अगदीं गुप्त ठेवला होता आणि दुसरींच कांहीं कारणें देत होतों. जे बोलत नव्हतों ते विचार पुढीलप्रमाणें होते. आपण केवळ विद्यार्थी मंडळींत राहिलों तर जी गरीब मंडळी आपल्या आप्त मुलींसाठीं स्थळें शोधीत असतील त्यांच्या दृष्टीस आपण पडणार नाहीं. आपलें

लग्न झालें पाहिजे, तर आपण कुटुंबवत्सलांच्या दृष्टीसमोर असणें अवश्य आहे असें वाटे.

बटाट्याच्या चाळींत तरी जागा मिळविणें तितकेंच कठीण होतें. आपण कुटुंबवत्सल असलों तरच तेथें जागा मिळावयाची. सड्या मनुष्यांना तेथें थाराच नसे. तथापि एकदां कोणाला तेथें जागा मिळालीच तर त्याची उचलबांगडी होत नसे हें मात्र खरें. म्हणून तेथें हरप्रयत्न करून जागा मिळवावी असें ठरविलें व मी सडा येत नाहीं असेंच दाखविलें. मीं जागा मिळविली ती माझी आत्या येथें रहावयास येणार आहे, असें सांगून मिळविली. तिचें येणें ही खरोखर पहातां थाप नव्हती. आपले डोळे डॉक्टरला दाखविण्यासाठीं मुंबईस येण्याची तिची इच्छा होती, तर मीं तिला कोंकणांतून आणून डॉक्टरला डोळे दाखवून परत पोंचती करीन, असें आश्वासन देऊन प्रसन्न केलें होतें. मी मुंबईस कामधंदा करूं लागल्यापासून मधून मधून तिला ५ रुपये पाठवीत असें व तसें करण्यांत मला मोठा आनंद वाटे. आत्याबाईस मधून मधून केलेली मदत फार फलप्रद झाली. आत्याबाईच्या सद्गुणी व यशस्वी भाच्याची प्रसिद्धी पुष्कळच झाली. या पैशानें माझी लग्नासाठीं जाहिरात व्हावयास सुरवात झाली होती, असें पुढें दिसून आलें. आत्याबाईंना आणावयास जाण्यांतच माझें मोठें काम झालें. तिला आणण्यासाठीं कोंकणांत गेलों तेव्हां माझ्या स्वतंत्र रोजगाराच्या गोष्टी आत्याबाईंनीं आपल्या गांवीं इतर बायकांना सांगितल्या होत्या. त्यामुळें खरोखरच मला पहाण्यासाठीं पण आत्याला भेटण्याचें निमित्त करून अनेक आयाबाया तेथें आल्या. त्यांत कांहीं आपल्या मुलींनाहि घेऊन आल्या. आत्याबाईंनीं मी आल्यापासून तूं लग्नाशिवाय राहूं नको, मुंबई-सारख्या शहरांत लग्नाशिवाय राहणें हें अगदीं वाईट, अशा तऱ्हेचीं बोलणीं सुरूं केलीं. लग्नाचा हेतु इतका सुसाध्य आहे हें मला ठाऊक नव्हतें. व आतां आपण काय उत्तर द्यावें याचीच पंचाईत पडली. तेव्हां मी एक हजार रुपये व्यांकेंत असल्याशिवाय लग्न करावयाचें नाहीं, असें ठरविलें आहे असें सांगितलें, व तें सांगितल्यानंतर तेथील मंडळीच्या दृष्टीनें माझी विवाहार्हता अधिकच वाढली.

आत्याबाई मुंबईस येऊन बटाट्याच्या चाळींत दाखल झाल्यापासून मी किती चांगला मनुष्य आहें, हें माझें मलाच कळण्यास सुरवात झाली. कोणीहि झाला तरी त्याची प्रशंसा करावयास कोणीतरी दुसरें लागत असतें. आत्याबाई आपल्या दिराच्या घरीं असत. त्याच्या घरीं कालक्रमणार्थ कामधंदा करून असत. त्यांना खावयास–प्यावयास

कमी नव्हतें, पण त्यांच्या दृष्टीस पैसा पडत नव्हता. माझी मधून मधून पांच रुपयांची मनीआर्डर गेली म्हणजे त्यांना आपण श्रीमंत झालों आहों असें वाटे. आणि तेव्हांपासून त्या माझा भाचा मुंबईस चांगला नांवलौकिक कमावीत आहे, असें कोकणांत सांगत होत्या. माझी वडलोपार्जित जमीन थोडीशी होती तीसंबंधानें त्या मुंबईस बोभाटा करत्या झाल्या, आणि आतां त्याचें लग्न ठरविलें पाहिजे. मुली पुष्कळ सांगून आल्या आहेत, पण ब्यांकेंत रक्कम जमल्याशिवाय लग्नाच्या फंदांत पडावयाचें नाहीं, असें हा म्हणत आहे, वगैरे गोष्टी त्या बटाट्याच्या चाळींत सांगूं लागल्या. त्या व मी मुंबईस एका खोलींत कांहीं दिवस राहूं लागलों, तेव्हां घरांत थोडेंसें सामानसुमान वाढूं लागलें. चहाचा स्टोव्ह आणि कपबशा व एकदोन भांडीं एवढा संसार माझा होताच. मुंबईस आमच्या आत्याबाई आल्यापासून त्यांना काम कमी पडूं लागलें, चहा दररोज मिळूं लागला, व घरीं जेवण होऊं लागलें, तेव्हां मला देखील आपण गृहस्थ आहों, अशी भावना उत्पन्न झाली, व आपण लग्न केलें तर आपण देखील सहकुटुंब रहाण्याचा खर्च सहज चालवूं, असा आत्मविश्वास उत्पन्न झाला. आणि पुढें मी आत्याबाईसाठीं पत्रें तिच्या गांवीं लिहूं लागलों. त्यांत आत्याबाई कांहीं दिवस मुंबईसच रहाण्याचें ठरवीत आहेत, ही गोष्ट जेव्हां कोंकणच्या गांवच्या लोकांना कळली, तेव्हां माझी स्थिति अधिक चांगली आहे हेंही कळलें; आणि आत्याबाईंना मुलींच्या आईबापांकडून पत्रें येऊं लागलीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे सोमणांच्या घराण्यांतील एका विधवा स्त्रीच्या दोन मुलींपैकीं थोरलीशीं माझें लग्न झालें.

सोमणांच्या ज्या थोरल्या मुलीशीं माझें लग्न झालें तिचें नांव काशी. काशीचें शिक्षण मराठी चार यत्तांपलीकडे झालें नव्हतें, तथापि ती मला शिक्षणाच्या दृष्टीनें अगर इतर कोणत्याहि दृष्टीनें कमी वाटत नव्हती. महत्त्वाचें काय याविषयीं माझी दृष्टीच बदलली होती. बाहेरगांवच्या आर्डरी मिळवून माल पाठविण्याची क्रिया करणारा मी काव्य मीमांसेपेक्षां थोडक्या पैशांत पुष्कळ चांगला माल मिळविण्याच्या कौशल्यास महत्त्व देत होतों. या बाबतींत काशी मला अप्रबुद्ध मुलींच वाटली नाहीं. पुष्कळदां ती दारावरच बराचसा माल कसोशीनें खरेदी करीत असे. काशी गोरी होती. व अंगापिंडानें मजबूत होती, म्हणूनच आमच्या आत्याबाईंनीं ठरवून ठेवली होती. मी माझें पूर्वीचें सर्व अद्भुत रसाचें वातावरण विसरून लग्नाला संमति दिली होती. खरें विवाहसौख्य दूरस्थित असलें म्हणजे कल्पनेंत

मनुष्य अवगाहन करूं लागतो, आणि काल्पनिक वैवाहिक सौख्यामध्यें गटंगळ्या खातो. त्याच्या अननुभूत सौख्यापेक्षां काल्पनिक विवाहसौख्य अधिकच असलें पाहिजे, असें माझें मत माझ्या अनुभवावरून झालें.

मी होतों बावीस वर्षांचा. मुलगी १४ वर्षांची. ती वयांत आली होती. पण तिचें वयांत येणें लपवून ठेवलें होतें. लग्न झाल्यानंतर १ महिन्याच्या आंत ती वयांत आली, असें जाहीर करण्यांत आलें. अर्थात् ही सर्व मखलाशी कोंकणांतील जुन्या लोकांच्या समजुतीशीं बदललेली स्थिति जुळवून घेण्यासाठींच होती. लग्न झालें तें कोंकणांत झालें. मी वधूस घेऊन मुंबईस आलों त्यावेळीं त्याच चाळीमध्यें पण जराशी प्रशस्त अशी लाकडी पार्टिशन असलेली खोली घेतली होती. लग्नानंतर आत्याबाई कांहीं दिवस होत्या, पण त्यांना हवा मानवत नाहीं, म्हणून कोंकणांत परत गेल्या. व त्यामुळें त्यांचा दाब नाहींसा झाल्यानंतर, मी आणि माझी प्रियतमा हीं संवगड्यांप्रमाणें राहूं लागलों. तिनें रोज नवीन नवीन पदार्थ करून मला खाऊं घालण्यांत धन्यता मानावी. मी तिला दुपारीं वाचण्यासाठीं निरनिराळीं गोष्टींचीं पुस्तकें आणून द्यावींत. तिनें दुपारीं कोणा स्त्रियांना घरीं बोलाविलें तर हरकत नाहीं असें मी तिला सांगत असें. मीं तिला नाटकें व सिनेमा हीं पहावयास वारंवार घेऊन जात असें, व आम्ही दोघेंहि सारख्याच गोष्टींबद्दल हंसत होतों.

नवरा–बायको स्वतंत्रपणें मुंबईस राहूं लागलीं म्हणजे त्यांचे दिवस अधिक आनंदांत जावयाचे. त्या दोहोंमध्यें द्वैत उत्पन्न करण्यास नवऱ्याचे आप्त किंवा बायकोचे आप्त नसले म्हणजे द्वैत उत्पन्न होण्याचा संभव कमी असतो. काशीचें व माझें प्रेम एकमेकांवर एकसारखें वृद्धिंगत होत होतें. काशीविषयीं सहानुभूति मला लग्नाच्या अगोदरच उत्पन्न झाली होती आणि तिचें कारण ती आपल्या औदार्यामुळें नुकसान पावलेली. तथापि आपले अडचणीचे दिवस धैर्यानें सावरून धरणारी, आणि गेल्या झाल्या गोष्टीबद्दल दुःखानें तोंड आंबट करणारी मुलगी नसून हंसतमुख होती; हें माझ्या लक्षांत आलें. मला माझ्या चुलत्यांच्या वागणुकीचा कांहीं चांगला अनुभव आला नव्हता. उलट कटु अनुभव आला होता, असेंच म्हटलें तरी चालेल. तरी देखील कोंकणच्या इस्टेटीच्या भानगडींत आपण पडायचें नाहीं, असेंच मनानें ठरविलें होतें. काशीची कुलकथा थोडीशी माझ्यासारखीच असल्यामुळें तिच्याविषयीं जें सौहृद उत्पन्न झालें तेंच तिच्याशीं लग्नास संमति देण्यास मला कारण झालें. काशीपेक्षां देखील एक दोन अधिक सुंदर मुली मला सांगून आल्या होत्या. तथापि

त्यांविषयीं या पारिजातकाचीं फुलें आहेत असें वाटत होतें. काशी तगरीसारखी सहज न कोमजणारें फूल होती. ती हंसतमुख होती. आणि लोकांनीं आपणास लुटलें याची जाणीव असूनहि ती आनंदी वृत्ति ठेवणारी आहे अशी माझी समजूत झाली. तिची कुलकथा माझ्या आतेनें मला पुढीलप्रमाणें सांगितली.

काशीचें घराणें जरी आमच्या गांवास एक दोन पिढ्या आहे, तरी ती वडदच्या सोमणांचीच एक शाखा आहे. हिच्या आजानें कर्ज करून ठेवलें पण तें काशीच्या बापानें फेडलें. काशीचा बाप रत्नागिरीस अव्वल कारकून होता. आणि त्यानें ४।५ हजार रुपये मिळवून आपली वडलोपार्जित जमीन सोडवून घेतली. पण त्यास आणखी तीन भाऊ होते. त्यांना कांहीं पैसे मिळविण्याची ताकद नव्हती. तथापि जमीन सोडविली तीवर बोजा एका भावाचाच रहावा म्हणजे ऋणको–धनको व्यवहार घरांतल्या घरांत व्हावा, असें दुसरे भाऊ म्हणत. परंतु त्या म्हणण्याप्रमाणें कागद केलेला नव्हता. जोंपर्यंत सर्व वडिलोपार्जित मिळकत कर्जमुक्त झाली नव्हती, तोंपर्यंत काशीच्या आईचा घरांत मान फार मोठा होता. तिचे सर्व दीर तिला " वहिनीसाहेब " म्हणत आणि तिला देखील आपण अधिकाधिक औदार्य दाखवावें असें वाटे. तिनें रत्नागिरीहून गांवीं यावें तर कोणास खण, कोणास लुगडें, तर कुणाच्या मुलांस कपडे आणावेत. त्यामुळें तिच्या जावा-देखील तिची खुशामत करण्यांत चढाओढ करीत; तथापि त्या सर्वजणी आंतून तिचा द्वेषच करीत होत्या. कारण ती इतर तिघी जावांप्रमाणें केवळ स्त्रीच असून, त्यांचे नवरे तिची खुशामत करीत, याबद्दल त्या सर्वजणींस मत्सर होत असे. काशीचा बाप सर्व इस्टेट कर्जमुक्त झाल्यावर थोडक्याच दिवसांनीं वारला. त्यामुळें मात्र मनु एकदम पालटला. तिच्या बापानें इस्टेट कर्जमुक्त करण्यासाठीं दिलेले पैसे त्यांचें कुटुंब अविभक्त होतें याचा पुरावा बनले. आणि ज्याअर्थीं काशीला भाऊ नव्हता, त्याअर्थीं तिचा आणि तिच्या आईचा केवळ अन्नवस्त्रावर हक्क आहे, अधिक कांहीं नाहीं असें ठरलें. ती घरांत राहिली तरच तिची उपजीविका समाईक इस्टेटीं-तून व्हावयाची आहे, एरव्ही नाहीं असें सांगितलें. काशीच्या आईला सोंवळी करण्याचीहि मसलत चालविली होती. त्यांत हेतु असा होता कीं, तिला सोंवळी केली म्हणजे तिचा दागिन्यांवरील हक्क उडवितां येणें सोपें होईल. सोंवळी होऊन तिच्या हातून एकदां दागिने काढून घेतले, म्हणजे शास्त्र सांगतां येईल कीं, विधवा स्त्री दागिने घालूंच शकत नाहीं, आणि दागिनेहि समाईक इस्टेटीचा भाग आहेत.

तथापि काशीची आई अगदीं मूर्ख नव्हती. ती दिरांपासून वेगळी झाली, आणि आपल्या माहेरच्या गांवीं येऊन राहिली. दागिने तिच्यापाशींच राहिले. येणेंप्रमाणें कथाभाग मला समजल्यानंतर काशीविषयीं आणि तिच्या आईविषयीं खरी सहानुभूति उत्पन्न झाली. आणि तीच आमचें लग्न जुळण्यास कारण झाली होती.

माझ्या लग्नाच्या वेळेस शेट आणि शेटाणी यांनीं प्रत्येकीं शंभर रुपये दिले, आणि त्यांचे दागिने करून बायकोला द्या असें सांगितलें. लग्नानंतर कांहीं दिवसांनीं शेटाणीनें म्हटलें कीं, तुम्ही बायकोला दाखविण्यासाठीं आमच्या घरीं घेऊन आलां नाहीं? मीं सवडीप्रमाणें घेऊन येईन म्हणून सांगितलें. तेव्हां शेटाणी म्हणाली कीं, कोणत्या दिवशीं येणार तें सांगा, म्हणजे मी मोटार पाठवीन. याप्रमाणें बोलणें झाल्यानंतर दिवस ठरला. शेटाणीनें मोटार पाठविली व मी काशीला घेऊन गेलों. शेटच्या घरीं राहात असतां काय प्रकार झाला हें मी काशीपाशीं बोललों नव्हतों. विनाकारण तिच्या मनांत संशयाला जागा तरी कां करून द्या, असें मला वाटलें. पण ही गोष्ट तिच्यापासून गुपित राहाण्याचा योगायोग नव्हता. काशीला दाखवावयाला नेलें त्यावेळेस सर्व मंडळी घरीं होती, व चुनीलाल देखील तेथें होता. तो माझ्याशीं थट्टा करण्याचा बहाणा करून पण खरोखर माझ्या संसारांत विष कालविण्याच्या हेतूनें म्हणाला, "भाऊराव, तुम्हाला चांगली बायको मिळाली; चांगली रूपवान् आहे. आतां तुमचें दुसऱ्यांच्या बायकांवर लक्ष जाणार नाहीं." हें ऐकतांच काशीनें चुनीलालच्या बोलण्याकडे आपलें पूर्ण लक्ष आहे असें दाखविलें. तेव्हां चुनीलाल म्हणाला, "वहिनीसाहेब, आमच्या बायकोकडे याचें लक्ष फार होतें. आमच्या बायकोला देखील हे भावासारखे वाटत होते; पण त्या गोष्टी काढण्यांत अर्थ नाहीं. तुम्ही नवऱ्यावर चांगला पहारा ठेवा. एवढेंच तुम्हांला सांगून ठेवतों." "घेल्याप्रमाणें काय बोलतोस" असें शेटाणी मुद्दाम मराठींत म्हणाली, आणि काशीकडे वळून म्हणाली कीं, "तुम्ही याचें कांहीं ऐकूं नका. हा आहे असाच वात्रट. याला वाटतें कीं, आपली बायको इतकी देखणी आहे कीं, सर्व लोक तिच्या मागें लागतील."

येणेंप्रमाणें जें संभाषण शेटजींच्या घरीं झालें, त्याच्यावर बरेंच स्पष्टीकरण घरीं आल्यावर झालें. मला असें वाटलें कीं, काशीला मी सांगतों तें पुरें पटणारें नाहीं. पण तें अगदीं पुरें पटलेंसें ती सांगती झाली. आणि त्याचें कारण तिनें असें सांगितलें कीं, चुनीलालची बायको नानीबहेन हिच्या डोळ्यांत जणूंकाय सुरे भरले आहेत व ती आपल्या दृष्टीनें मला मारूं इच्छिते, असें तिला पहातां क्षणींच मला

वाटलें. जर तुम्हीच अपराधी असतां आणि तिनें तुमचा अभिलाष धरला नसता, तर तिनें मजकडे विषारी दृष्टीनें पाहिलें नसतें, असें काशी म्हणाली. काशीच्या या म्हणण्यामुळें मला फार आनंद झाला. चुनीलाल माझ्या संसारांत विष कालवूं शकला नाहीं, हें पाहून मला आनंद झाला आणि काशीला मीं घट्ट आलिंगन दिलें. नानी-बहेनच्या दृष्टींत विषारीपणा भरला होता, ही गोष्ट माझ्या दृष्टीस पडली नव्हती. तथापि एक गोष्ट मनाला पटली ती ही कीं, स्त्रिया स्त्रीविषयक प्रश्न अगदीं चटकन समजतात. पुरुषांना ते तसे समजावयाचे नाहींत.

जरी मी शेटच्या कामावर अजून होतों आणि शेटच्या घरीं माझी मान्यताही चांगल्या प्रकारें होती, व ती माझें लग्न झाल्यानंतर वाढल्यासारखी दिसली, तरी देखील त्यांच्या नोकरींतून आपण निघावें, अशी इच्छा माझ्या मनांत दिवसेंदिवस वाढत चालली; याच सुमारास मेसापोटेमियांत लष्करी कारकून म्हणून जाण्यासाठीं मनुष्यभरती चालू होती. तेव्हां एके दिवशीं मनुष्यभरतींत मीं आपलें नांव दाखल केलें. १५० रुपयांवर बसऱ्याकडे जाण्याचा मला हुकूम मिळाला.

—×—

प्रकरण ८ वें.

## युद्धकाल आणि युद्धोत्तर काल.

सन १९१७ पासून पुढील दोन वर्षांचा काल मेसपॉटमध्यें गेला. त्याचें वर्णन विशेष काय करावयाचें? लढाईवर गेलेल्या कारकुनांचें जें सामान्य वर्णन तेंच माझें. बसरा, अमारा, बगदाद, इत्यादि स्थळीं माझा निवास होता. आम्ही सर्व तरुण मंडळी होतों. आमच्या खाद्यपेयांची सोय लष्करांतच लागत असल्यामुळें, जो पैसा जवळ होता तो सर्व उडवावयाला होता. तो आम्ही कसा उडवीत होतों हें सांगावयास नकोच. लष्कर हें नेहमीं गांवापासून थोडक्या अंतरावर असे. आम्हांला लष्करी पोषाख वापरावा लागत असे. आणि लष्करी मंडळींना गांवांतील विशिष्ट भागांत जावयास मनाई असे. आम्हीं अमुक अमुक रस्त्यानें गेलें पाहिजे, असा निर्बंध असे. अरब स्त्रिया गौरवर्ण आणि त्या आमच्या पैशामुळें अत्यंत सुसाध्य. यहुदी मंडळीची तीच कथा असे. तथापि आम्हीं "आऊट ऑफ् बाऊंडस्"

जाणें ही गोष्ट मनाई असल्यामुळें, तीच गोष्ट कायती आम्हांस नियंत्रक होई. तथापि ती गोष्ट अगदींच नियंत्रक होत असे असें नाहीं. कारण " आऊट ऑफ् बाऊंडस् " आम्ही गेलों तर परिणाम काय होणार ही गोष्ट निश्चित होती. जे " अगम्य " ठिकाणीं गमन करीत, त्यांस त्याबद्दल दहा किंवा पंधरा रुपये दंड होई एवढेंच. आम्ही जर कोणी अगम्य भागांत जाऊं लागलों तर पोलीसचा पहारा असे; तोहि नियंत्रक होई. पण तो तितका होत नसे. कारण एक तर पोलीसचा डोळा चुकविणें कठीण नव्हतें. आणि दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे आम्हीं लष्करी पोषाख काढून टाकून " सिव्हिल " पोषाख केला म्हणजे झालें. हिंदुस्थानची बरीच मंडळी व्यापार वगैरे निमित्तानें आली होती ती गांवांत रहात असत व लष्कराबरोबर रहात असली तरी देखील ती बाजारबुणगी " सिव्हिल " म्हणून धरली जाई. यामुळें आम्हांला हवें तिकडे जाण्यास मोकळीक प्राप्त होत असे.

लढाईचें वर्णन काय करावयाचें? तिचा कोणताहि भाग आमच्या दृष्टीस पडत नसे, असें सांगितलें तर फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण आम्ही सुरक्षित भागांत होतों. जखमी झालेली मंडळी जात-येत, दारूगोळा जात येत असे, व रोज लढाईच्या बातम्या येत असत. त्यामुळें आम्ही जरी प्रत्यक्ष संग्रामांत नव्हतों तरी त्याच्या वातावरणांत होतों हें खास. शिवाय मधून मधून वैमानिक उपसर्ग होण्याची भीति होतीच.

आमची जी निकटची मंडळी होती तीपैकीं बहुतेक मंडळी आज नोकरींतून वजा झाली आहेत. कित्येकांस पेन्शन मिळत आहे तर कित्येकांस मिळत नाहीं. जे कित्येक नोकरींत आहेत, ते चांगल्या स्थितींत आहेत. तथापि आज अनेक मंडळी भिक्षा मागत हिंडत आहेत. लढाईच्या नोकरीचा एक फार वाईट परिणाम अनेकांवर झाला. ज्या लोकांना हिंदुस्थानांत पंचवीस रुपये मिळावयाची मारामार त्यांना दीडशें रुपये दोनशें रुपये असे पगार तात्पुरते मिळाले, आणि त्या लोकांना आपली योग्यताच कांहीं निराळी आहे असें वाटूं लागलें. ही मंडळी नोकरींतून वजा झाल्यानंतर जेव्हां खाजगी नोकरी पाहूं लागली, तेव्हां त्यांस जर कोणी तीस किंवा पसतीस रुपये पगार देऊं केला तर त्यांस राग येई. त्यांना वाटे कीं मी दीडशें रुपये लायकीचा मनुष्य मी काय तीस रुपयांवर काम करावयाचें? अशा तऱ्हेची भावना होऊन बरीच मंडळी निरुद्योगी राहिली, व कांहीं मंडळी अनुभव नसतांनाच व्यापार वगैरे करूं लागली. त्यामुळें कित्येकांपाशीं जी पुंजी जमली होती तीहि खलास झाली

व ती खलास झाल्यानंतर मात्र पुन्हां पंचवीस-तीस रुपये पगारावर काम करावयास तयार झाली. अशा मंडळींतच माझी गणना करतां येईल.

मी १९२० च्या सुमारास परत आलों. मी देखील अनेकदां तीस पासून साठ रुपयांच्या नोकऱ्या मुंबईसच नाकारल्या. आणि पुढें शेवटीं जेव्हां कांहीं उद्योगच मिळेना, तेव्हां डाक्टरचा मदतनीस किंवा शागीर्द, वकीलाचा कारकून, इलेक्शन एजंट असलीं कामें करूं लागलों. बरींच वर्षें भटक्याच राहिलों. पण पुढें कर्मधर्मसंयोगानें माझा द्वितीय संबंध होऊन माझ्या आयुष्यास पुन्हां स्थैर्य उत्पन्न झालें आणि माझा भटकेपणाचा आयुष्यक्रम तात्पुरता संपला, असें म्हणावयास हरकत नाहीं.

माझा कौटुंबिक आयुष्यक्रम मी हिंदुस्थानांत परत आल्यानंतर थोडक्याच दिवसांत संपला, त्याची थोडक्यांतच हकीकत देतों. मी मेसपॉटमध्यें होतों त्यावेळेसच आमच्या कुटुंबाची प्रकृती खालावली होती. तथापि कोंकणची हवा चांगली आहे, प्रकृति सुधारेल असें वाटलें होतें. तथापि टी. बी. चा विकार जडला होता. दुखणें टी. बी.चें होतें ही गोष्ट मला नीटपणें कळलीच नव्हती. ताप येतो, खोकला झाला आहे वगैरे मधून मधून ती लिहीत असे. तथापि आपल्या प्रकृतीचें खरें वर्तमान लिहून माझें स्वास्थ्य बिघडविणें तिला बरें वाटलें नाहीं. औषधोपचार झाले, पण ते यशस्वी झाले नाहींत.

मी मेसपॉटमध्यें गेलों तेव्हां मी पत्नीच्या संमतीनें गेलों होतों. तथापि तिची माझ्या जाण्याला पूर्ण खुशी होती अशांतला भाग नाहीं. तिचीं त्यावेळचीं आलेलीं पत्रें मीं अजून आपला अमोलिक खजिना समजूनच जपून ठेविलीं आहेत. त्या वेळच्या तिच्या भावनांचें एक पत्र मीं एका मित्रास दाखविलें. त्याचाही आयुष्यक्रम कांहीं अंशीं माझ्याचसारखा झालेला होता. ते शेअर बझारांत होते. त्यांनीं देखील जगाचे विचित्र खेळ पाहिले होते. माझ्या घरमालकिणीचीं जीं पत्रें मजजवळ होतीं, त्यांत एक पत्र तिनें आपल्या आतेभावाला लिहिलें होतें, त्यांत तिनें मी लवकर परत यावें, यासाठीं माझें मन वळवावें, अशी विनंती केली होती. तें पत्र त्या आतेभावानें मजकडे पाठविलें तेंहि त्या संग्रहांत होतें. या आमच्या मुंबईकर मित्रानें तें पत्र पाहिल्यानंतर त्या पत्रांतील आशयाची लावणी तयार केली व ती पुढें विद्यासेवककारांकडे पाठविली. ती लावणी पुढीलप्रमाणें आहे.

## संदेश

— × × × —

सखा माझा मृग मी त्याची हारिणी ॥
कर्माची कहाणी ॥
मोठी विपरीत ॥
गेला मृगजळाच्या पाठिला मृग धांवत ॥
मोठी हुद्द्याची नौकरी ॥
आली सरकारी ॥
परदेशांत ॥
सख्याच्या पारतंत्र्याची बिडि सोनेरि पायांत ॥
किती परोपरीनीं विनविलें ॥
नाहीं ऐकिलें ॥
गेलें धांवत ॥
तिकडे गेल्यापासुन सखा नाहिं मला करमत ॥
त्यांचा ध्यास लागला मनीं ॥
येति माझ्या स्वप्नीं ॥
खुशि मी मनांत ॥
जागीं होऊन पहाते तो माझी फसगत ॥
दादा येऊं दे दया ॥
बहिणीची माया ॥
नाहीं राहावत ॥
सारी लज्जा सोडून सांगितली हकिकत ॥
भाऊबिजेची ओवाळणी ॥
दे मज लागोनी ॥
एवढी त्वरीत ॥
सांगते तो मजकूर त्यांना लिहून टाक डांकेंत ॥
तुम्ही गेल्यापासुन प्राणनाथा ॥
झाली आवस्था ॥
येऊं द्या ध्यानांत ॥

तुमच्यावांचून क्षण मला युगासमान भासत ॥
गंगायमुना सरस्वती ॥
आणि गोमती ॥
नयनिं वाहात ॥

दुःख सागरिं मिळति जाऊन खळाळत ॥
त्या दुःखसागरामधीं ॥
आधि नि व्याधीं ॥
जहाज तरंगत ॥

तुमच्या माझ्या वियोगाचा सुटला झंझावात ॥
मनोविकार खलाशि बावरले ॥
जहाज भडकलें ॥
कहार दर्यांत ॥

त्याचे तांडेल तुम्ही सुकाणूं तुमच्या हातांत ॥
ही नोकरी मृगजळापरी ॥
वियोग करी ॥
तुमच्या नि माझ्यांत ॥

यावें सोडुनि परतुनी हरिण जसा कळपांत ॥
सदाशिव सांगे सर्वांला ॥
हाचि दाखला ॥
पटला सिद्धांत ॥
याचें सार काढतां द्वैतमत अद्वैत. ॥

माझा द्वितीय संबंध पुढें फार उशीरां झाला. तो कसा याची हकीकत पुढें येईलच. ती सांगण्यास मन जरासें मोकळें करावें लागणार आहे. विधुरावस्थेला थोडक्याच दिवसांत कंटाळलों होतों, आणि पुन्हां कौटुंबिक स्वास्थ्य पाहिजे होतें. तथापि माझें लग्न चटकन होईल अशी परिस्थिति नव्हती. किंबहुना लग्न होण्याची परिस्थिति असूनहि मी संधि नाकारीत होतों असें म्हटलें तरी चालेल. कोंकणांत मुलींना तोटा नव्हता. तथापि कोंकणांत लग्न करावयासच जाऊन मुलगी शोधून

आणण्याची क्रिया करण्यास लाज वाटत होती. आमची आत्या मेली असल्यामुळें, माझी योग्य तऱ्हेनें जाहिरात करण्यास कोंकणांत कोणी नव्हतें. शिवाय पुन्हां एकदां इकडे तिकडे हिंडण्याचें स्वातंत्र्य अनुभवावें असेंहि वाटत होतें. मुंबईतल्या चाळींतील बिऱ्हाडांत राहून आयुष्य क्रमण्यापेक्षां मोकळेपणानें कोठें फिरतां येईल, तर तें चांगलें असें वाटत होतें. यासाठीं मी कांहीं दिवस वाटेल तिकडे हिंडावें, सांपडेल तेथें नोकरी करावी, अशा तऱ्हेनें आयुष्य कंठण्यास सुरवात केली. एकादें वर्षभरच भटकावें असें संकल्पिलें होतें; पण ज्याप्रमाणें वैवाहिकबंधनांत मनुष्य गढला असला म्हणजे मोकळा होत नाहीं, त्याप्रमाणेंच भटक्याच्या आयुष्यक्रमांत शिरला म्हणजे तो मोकळा होत नाहीं. भटकण्याच्या आयुष्यास जो प्रारंभ झाला, तो चांगला बारा वर्षांवर टिकला. त्यानंतर पुन्हां द्वितीय संबंध झाला. आणि आतां आयुष्यास पुन्हां स्थिरता उत्पन्न झालेली आहे. आणि सडेपणाची स्वतंत्रता आणि वैवाहिक बंधन, या दोहोंची योग्य प्रकारें तुलना करण्याची योग्यता मला आली आहे.

आज मी असें म्हणूं शकतों, कीं मला अविवाहित स्थिति आणि विवाहित स्थिति यांवर तौलनिक दृष्टीनें जितकें मार्मिकपणें व प्रामाणिकपणें बोलतां येईल, तितकें थोडक्यांसच येईल. मी अजूनहि असें म्हणातों कीं, विवाहास दूरदृष्टीची अडचण नको आहे. आणि पैसे मिळाले म्हणजे लग्न करूं, हें तत्त्वज्ञान मूर्खपणाचें आहे. मी उलट असें म्हणतों कीं, पैसे ज्यास मिळवावयाचे असतील त्यानें लग्नच करावें. अविवाहितास पैसे मिळण्यापेक्षां विवाहितास मिळतील. कारण पैसे मिळविण्याची आंच लग्न झाल्यासच लागेल. माझ्या दुसऱ्या लग्नापासूनच मला िथरता उत्पन्न झाली आहे. आणि माझी आर्थिक स्थिति सुधारतच आहे. दुसरें लग्न झाल्यानंतरची हकीकत मी देतच नाहीं. कारण तें लग्न माझा भटकेपणाचा शेवट होय. मधल्या काळाचा वृत्तांतच सविस्तर सांगावयाचा आहे. या काळांतच मला अनेक व्यक्ति भेटल्या आणि जगाचें अधिक व्यापक ज्ञान झालें. जगाच्या दृष्टीनें जरी भटकेपणाचा काल यशस्वी झाला, तरी आर्थिक दृष्टीनें सध्यांचाच काल अधिक यशस्वी आहे. मी आज लोकांना असें सांगेन कीं, पैसे मिळतात ते पैसे मिळविण्याची आंच लागली तरच मिळतात; एरव्हीं मिळत नाहींत. आणि पूर्वीं मिळविलेला पैसा पुरत नाहीं. लग्न झाल्यानंतरचेच खरे पैसा मिळविण्याचे दिवस होत. लग्न करण्यास विलंब लावूं नका. नियंत्रकांचें ज्ञान करून घ्यावें आणि पुरुषसंबंध करावा अशा तऱ्हेची शिकवणी स्त्रियांमध्यें पसरवूं देऊं नका. असली शिकवणी भ्याडपणाची आहे. ती पराभूत

मनुष्याची आहे. स्त्रियांना असें सांगा कीं, तुम्ही पुरुषांची पुंजी किती आहे हें पाहूं नका. आपली जबाबदारी ओळखणारा आणि सामान्यतः सरळ वागणुकीचा आणि मेहनती पुरुष दिसला म्हणजे त्याच्याशीं निःशंक लग्न करा. जर त्यास पैसे मिळविण्याच्या बाबतींत अडचणी आल्या तर मदत करा. तो धंदा करीत असला तर धंद्यांतलें कांहीं काम तुम्ही करा. त्यानें दुकान काढलें असलें तर कांहीं वेळ दुकानांत तुम्ही बसा; पण विनाकारण विवाह लांबवूं नका. नियंत्रकांचे उपदेशक दुर्बल आणि नीच आहेत.

—×—

प्रकरण ९ वें.

## डॉ. घैसास यांचें अंतेवासित्व.

एकोणीसशें वीस सालीं नोकरी सुटल्यानंतर मी एकदां पुण्यास गेलों होतों. पुणें शहराविषयीं माझ्या ज्या कांहीं काव्यमय कल्पना होत्या, त्या पुण्यास आल्यानंतर मावळल्या. पुण्यास आल्यानंतर नोकरी कोठें तरी पहावी, निदान नोकरीसाठीं चार घरें हिंडावें, असें ठरवून मी कांहीं ठिकाणीं हिंडलों. चिपळूणचेच डॉ. घैसास पुण्यास प्रॅक्टिस् करीत होते. त्यांच्याकडे गेलों. त्यांनीं "ट्रायल" म्हणून कामावर ठेवलें.

डॉ. घैसास हे एकदां कट्टे देशभक्त होते. पुढें कांहीं दिवसांनीं ते इंग्रज नोकरशाहीच्या अनियंत्रित अधिकाराचे आग्रही संरक्षक बनले, आणि असें असून देखील आपण पक्के देशाभिमानी आहोंत असा बाणा ते मिरवीत. आणि जे जे कोणी लोकशाही झाली पाहिजे म्हणून विधानें करीत, त्यांस ते देशाचे शत्रू म्हणत असत. ते डॉक्टर म्हणून फारसे प्रसिद्ध नव्हते. आपला वेळ सूक्ष्मजीवशास्त्रीय संशोधनामध्यें ते घालवीत आणि त्यांना काम मिळत असे तें प्रत्यक्ष लोकांकडून येत नसे; तर डॉक्टर लोकांकडून येत असे. ते आजकाल फारसे प्लाट-फार्मवर चढत नसत; कां कीं त्यांचीं मतें काय आहेत हें सर्व गांवाला ठाऊक होतें; आणि त्यांनीं प्लाट-फार्मवर जर पाय ठेवला तर भोंवतालचा श्रोतृवर्ग त्यांचें व्याख्यान तर ऐकून घेणार नाहींच, पण उलट त्यांचे पाय धरून त्यांनीं ओढले नाहींत म्हणजे मिळविली, असें त्यांस ठाऊक झालें होतें. डॉ. घैसास या सारख्या विचित्र व्यक्तीची आपण अवश्य ओळख

करून घेतली पाहिजे, त्यांची मनोरचना आपणांस कितपत समजते तें पहातां येईल, असा त्यांच्याकडे नोकरीसाठीं जाण्यांत माझा हेतु होता.

डॉ. घैसास पुण्यास आहेत हें माझ्या खरोखरच लक्षांतच नव्हतें. तथापि वाचण्यासाठीं म्हणून मीं तेथील एक स्थानिक वर्तमानपत्र "शार्दूल" या पत्राचा अंक विकत घेतला होता. त्यांतील संपादकीय पाहून डॉ. घैसास यांची आठवण झाली.

"शार्दूल" पत्राच्या त्या अंकांत खालील मजकूर होता :—"गेल्या आठवड्यांतील डॉक्टर घैसास यांचें व्याख्यान ऐकून कोणाहि स्वाभिमानी मनुष्यास खेद झाल्याशिवाय रहाणार नाहीं. पाश्चात्य देशांत जाऊन आपल्या तरुण मंडळींचे डोळे दिपून कसे जातात, आणि येथें आल्यानंतर ते स्वजनांना दोष कसे देऊं लागतात, याचें हें अनुकंपनीय उदाहरण आहे. त्यांच्या व्याख्यानांत नवीन असें कांहीं नाहीं. पाश्चात्य देशांत जाऊन शिकून आलेल्या अनेक डॉक्टरांनीं आमच्या या पवित्र नगरींत असलीं व्याख्यानें अनेकदां दिलीं आहेत. पेशंटविहीन डॉक्टरांना लोकप्रेमाचें कसें भरतें येतें, आणि आपल्या राहाणीची थट्टा करणें, म्युनिसिपल कारभाराची थट्टा करणें इत्यादि ढंग कसे सुचूं लागतात, आणि पुढें त्यांची जाहिरात होऊन प्रॅक्टिस जोरांत सुरू झाली म्हणजे त्यांचें देशप्रेम केव्हांच लयास कसें जातें, मग ते व्याख्यानें वगैरे देण्याच्या भानगडींत पुन्हां कसे पडत नाहींत, एवढेंच नव्हे तर व्होट देखील करावयास जात नाहींत, या सर्व गोष्टी आमच्या ग्रामांतील चतुर नागरिकांस परिचितच आहेत. यामुळें डॉ. घैसास यांच्या व्याख्यानाकडे विशेष लक्ष देण्याचें कारणच नाहीं. त्यांना अजून गिऱ्हाइकी जोडावयाची आहे, व ती जोडण्यासाठीं त्यांना म्युनिसिपालिटी, राजकारणांत चळवळ करणारी मंडळी वगैरेवर टीका करून पुढें यावयाचें आहे. आणि यासाठीं त्यांना नगरप्रेमाचें भरतें आलें आहे. त्यांच्याकडे लोकांचें लक्ष गेलें, व कांहीं गिऱ्हाइकें त्यांना मिळालीं म्हणजे त्यांचें नगरप्रेम असें अजिवात ओसरून जाईल कीं, डॉ. घैसास यांचें नांव पुन्हां कधीं ऐकूंहि येणार नाहीं.

"डॉ. घैसास सांगतात तरी काय हें आपण पाहूं. ते ड्रेनेज दुरुस्त करून फ्लशचे पायखाने करावयास सांगतात. उघड्या तोंडांचीं गटारें कधीं स्वच्छ राखलीं जात नाहींत म्हणून तीं अजीबात बंद करावयास सांगतात, इत्यादि. उघडीं गटारें स्वच्छ राखलीं जात नाहींत, तर तीं स्वच्छ ठेवावयासाठीं चळवळ करण्यास डॉ. घैसास

यांना कोणी बंदी केली होती काय ? तसा त्यांनीं प्रयत्न केल्याचें कधीं ऐकिवांत नाहीं. एकदम उघडीं गटारेंच बंद करा असें सांगण्यांत त्यांचा हेतु काय असेल हें उघडच आहे. या व्याख्यानाबरोबर जर त्यांनीं असें सांगितलें असतें कीं, 'ड्रेनेजचा खर्च इतका होईल, त्याला अमुक अमुक माल लागेल, तो माल पुरवावयाची मीं एजन्सी घेतली आहे तर मला ऑर्डर द्या, व दोन पैसे मला मिळूं द्या; मला डॉक्टरींत पैसे मिळत नाहींत.' तर त्यांचें व्याख्यान अधिक प्रामाणिक झालें असतें. म्युनिसिपालिटींतून पैसा ओढावा हा हेतु डॉ. घैसास नाकारतील काय ? म्युनिसिपालिटीनें डॉ. घैसास यांच्या योगक्षेमाची सोय करण्याचें नाकारलें, या गोष्टीची त्यांना नसली तरी येथील नागरिकांस आठवण आहेच." इत्यादि.

डॉ. घैसास यांजवर टीका आलेली पाहिल्यामुळें त्यांची आठवण होऊन चौकशी केली. ते चिपळूणचे, मी चिपळूणचा यामुळें ते मला ठेवतात कीं नको म्हणतात, याविषयीं कांहीं कल्पना चालेना. त्यांची गांठ तर घेतलीच. त्यांना कंपाउंडर नको होता व त्यामुळें कोणी अधिक मनुष्य नको, असाच त्यांच्या कडून जबाव आला. पुढें मी त्यांना तुम्ही अलीकडे कधीं चिपळूणला आलां नाहीं, असें म्हणून आपण एकाच गांवचे, अशी त्यांस समज दिली. ती ऐकून पुढें ते म्हणाले, मला एक हरकाम्या मनुष्य हवा आहे. वेळेवर त्यानें स्वयंपाक करून घातला पाहिजे. माझे कपडे मी कोठें फेकून दिले तर ते उचलून जागच्या जागीं त्यानें ठेविले पाहिजेत. सकाळीं मी अंथरुणांत असतांच मला चहा करून माझ्याकडे त्यानें आणला पाहिजे. मात्र अशा मनुष्यास मी नोकराप्रमाणें न वागवितां मित्राप्रमाणें वागवीन. पगार फक्त पंधरा रुपये मिळेल. राहावयाचें आहे काय तुम्हांला ? अशी पृच्छा केली. मी होकार दर्शविला. तेव्हां जा, आपलें सामान घेऊन येथें रहावयाला या असें सांगितलें.

दुपारीं मीं सामान आणलें. संध्याकाळीं चहा केला तो चहा घेतल्यानंतर डॉ. घैसास टेनिस खेळण्यासाटीं बाहेर पडावयाची तयारी करूं लागले. त्यावेळेस माझ्या खिशांतला शार्दूलाचा अंक घेऊन वाचूं लागले. तो वाचतांना त्यांना संताप आल्यासारखें दिसलें. त्यांनीं पुढें तें पत्र फेकून दिलें व म्हणाले, चल माझ्याबरोबर. मी क्लबाकडे जातांना मजबरोबर गप्पा मारायला ऐस. मी कपडे करून त्यांच्याच बरोबर निघालों. घराबाहेर पडतां पडतां डॉक्टर बोलले, 'या शार्दूलकारांस सर्व

लोक लबाड वाटत आहेत काय? कोणी प्रामाणिक बुद्धीनें कार्यप्रवृत्त होत असेल असें यांस वाटतच नसेल. कीं वाटत असून ते मुद्दामच लिहीत असतील. यांना चांगल्या कृत्याला विरोध करून फायदा तो काय?' इत्यादि गोष्टी त्यांच्या मनांत घोळूं लागल्या. त्यांचें क्रोधमय झालेल्या डोक्यांतील रक्त शरीराच्या इतर भागांस व्यायाम मिळूं लागल्यामुळें सर्व शरीरभर होऊं लागलें, आणि त्याबरोबर त्यांचा शार्दूलकारांवर रागहि होऊं लागला. इतक्यांत आणखी दुसरा एक देखावा त्यांच्या दृष्टीस पडून, त्यांच्या डोक्यांत अन्य तऱ्हेचे विचार घोळूं लागले. सुधारणेच्या मार्गांतील अडचणीसंबंधानें कांहीं नवीन कल्पना त्यांच्या डोक्यांत येऊं लागल्या. गांवांतून बाहेर जाण्यासाठीं डॉक्टर घैसास ज्या रस्त्यानें बाहेर पडले, त्या रस्त्यावर लहान मुलें आणून परसाकडेस बसविलीं आहेत, ही गोष्ट त्यांनीं पाहिली आणि गांवांतले पोलीस मेले आहेत काय? लेकाचा गाढव इंग्रज त्याला येथें घाण बंद करतां येत नाहीं तर राज्य तरी कशाला करतो? असे शब्द त्यांच्या तोंडांतून बाहेर पडले. आणि पुढें एका मुलाला सोबत म्हणून जी बाई पाहिली, त्यावरून त्यांना दिसून आलें कीं जिल्ह्याच्या कलेक्टराची ही बायको, आणि ते कलेक्टर तर त्यांच्या चांगल्याच ओळखीचे!

हा देखावा दृष्टीस पडल्यानंतर ते म्हणाले कीं, ही आमच्या कलेक्टरची बायको! हिचा नवरा कलेक्टरच्या अधिकारावर असतां भलत्या जागीं शरीरशोधनाची क्रिया केल्याबद्दल त्यांनीं शिक्षाहि ठोठावल्या असतील; आणि त्यांचींच मुलें आपल्या आईच्या प्रोत्साहनानें रस्ते खराब करावयाची क्रिया करतात, तर यास म्हणावें तरी काय? पण याबरोबर दुसराहि एक विचार आला तो हा कीं, जर या गोष्टी त्या इंग्लंडांत राहिलेल्या व शिक्षण झालेल्या कलेक्टरला समजत नाहींत, तर आपण बिचाऱ्या शार्दूलकारांवर तरी कां रागवावें? शार्दूलकारांचें वागणें व बोलणें, त्यांचें बौद्धिक शिक्षण, आचार-शिक्षण हें विशिष्ट मर्यादेपलीकडे गेलें नाहीं, त्याचें द्योतक नव्हे काय? शार्दूलपत्रकारांनीं आपल्यावर जो कोरडा ओढला आहे, याचें कारण आपण त्यांचे पैसे चोरले आहेत अशापैकीं थोडेंच आहे. त्यांचे कांहीं पूर्वग्रह आहेत त्या पूर्वग्रहांविरुद्ध आपलें व्याख्यान असलें पाहिजे, आणि त्यामुळेंच आपल्या विरुद्ध त्यांनीं हें वेडें टीकास्त्र सुरू केलें असलें पाहिजे. तर आपण शार्दूलकारांविषयीं क्रोध न बाळगतां आज विरुद्ध असलेला पण उद्यां आपल्या तर्फेचाच होणारा मनुष्य अशाच अपेक्षेनें त्याकडे पाहिलें पाहिजे. शार्दूलकारांनीं आजचा विरुद्ध

लिहिलेला लेख सातवा किंवा आठवा आहे, नववा दहावा लेख आपणांस सहाय-कहि येईल. ”

येणेंप्रमाणें भाष्य केल्यानंतर डॉ. घैसास पुण्यांतील वातावरणास मी अगदींच अपरिचित आहें असें समजून तें मला समजावून देण्यासाठीं पुढील प्रकारचीं वाक्यें बोलते झाले. ते म्हणाले, “ या शहरांत स्थानिक राजकारण समजण्यासाठीं, कांहीं गोष्टींचा उलगडा केला पाहिजे. या गांवामध्यें कांहीं शिकलेल्या मंडळींनीं जुन्या काळांत एक कॉलेज काढलें. आणि त्या कॉलेजांतील मंडळी आपण विधायक कामगिरी करणारे, आणि दुसरे सार्वजनिक चळवळींतले लोक विघातक कामगिरी करणारे, असें ते साभिमान वर्गीकरण करीत असतात. त्या कॉलेजाविरुद्ध जो पक्ष आहे त्यांत शार्दूलकार प्रमुख होत. या “ शार्दूल ” पक्षांतील मंडळी म्हणत कीं, कॉलेजवाल्या लोकांस ज्या गोष्टींचें महत्त्व वाटे, त्या गोष्टी कोणत्या म्हणाल तर बायकांमधील चळवळी, अस्पृश्यांसाठीं व्याख्यानें, इत्यादि. शार्दूलकारांच्या मतें “ विधायक ” पक्षाची अस्पृश्यप्रीति, मतें मिळविण्याच्या वेळेस प्रज्वलित होते, पण ती व्याख्यानांच्या पलीकडे क्वचितच आहे, व या मंडळीच्या कक्षेंतील संस्था व वर्तमानपत्रें हीं सरकारी आश्रयासाठीं नेहमीं हपापलेलीं आहेत, आणि युनिव्हर्सिटीमधल्या परीक्षकांच्या जागा पटकावण्यासाठीं ज्या खटपटी करावयाच्या त्या ते करतात, आणि त्यांत ते तरबेजहि झाले आहेत; त्या पक्षांतील मंडळींचें कार्यतत्त्व असें आहे कीं चळवळ अशी करावी कीं, जिच्या योगानें सरकारी अधिकाऱ्यांशीं तरी ओळखी होतील, किंवा निदान बायकांशीं तरी ओळखी होतील.” हे प्रतिपक्षाचे आक्षेप “ विधायक ” पक्षाविषयीं अंशतः खरे असतीलहि. अर्थात् ही अल्पस्वार्थी भावना त्यांच्या संस्थेंतील जी वरच्या योग्यतेची मंडळी असे, तींत नसून या संस्थेंत शिरून थोडे पैसे मिळवावे, थोडा सन्मान मिळवावा, बायकांत जरा जास्त मिसळावयास सांपडावें, इतपतच आकांक्षा असलेल्या दुय्यम मंडळींत आहे. या पक्षाच्या हातीं बऱ्याचशा संस्था असल्यामुळें दहावीस सुशिक्षित मंडळीचा योगक्षेम सुखासमाधानानें चाले. कांहीं बाबतींत दोन्ही पक्षांचें ऐक्यही होतें. आपापसांतल्या धुसफुशीचें महत्त्व दोघांसही मान्य होतें.

प्रत्येक पक्षाला मधून मधून दुसऱ्या पक्षाशीं भांडणें उत्पन्न करून, त्यांचा वर्तमानपत्रांत गाजावाजा करून लोकांची करमणूक करतां येत असे. त्यांना हें ठाऊक होतें कीं, मुंबईपासून भंडाऱ्यापर्यंतच्या सर्व महाराष्ट्रांत ज्या वकील–कोट्या

(बार रूम्स) आहेत, त्यांमध्यें वकीलांना सक्तीनें बसावेंच लागतें, व त्यांच्या चर्चेला विषय कांहीं नसतो, आणि एका टोंकांपासून दुसऱ्या टोंकापर्यंत सर्व ठिकाणच्या वकिलांना जर वादांत गुंतवावयाचें असेल, आणि आपली आठवण त्यांस वारंवार द्यावयाची असेल, तर उच्च विचार वर्तमानपत्रांतून व्यक्त करणें वगैरे गोष्टींत अर्थ नाहीं. एकमेकांच्या विरुद्ध उखाळ्यापाखाळ्यांच्या गोष्टी लिहिल्या पाहिजेत, म्हणजे लोकांचें लक्ष आपल्या वादाकडे जाईल; आणि आपल्याला पाठीराखे पक्षपाती उत्पन्न होतील. आपापसांतल्या भांडणाची खुमारी जाणण्याच्या बाबतींत दोन्ही पक्षांमध्यें एकवाक्यता होती. दोघांचेंही तत्त्व असें होतें कीं, आपल्या गांवांतल्या लोकांचें मुख्य कर्तव्य आपल्या गांवांत कांहींतरी चळवळ काढून तिच्यासाठीं बाहेरचा पैसा आणणें हें आहे, व आपल्यांतील कोणत्याही पक्षाविषयीं बाहेर गांवीं प्रेम उत्पन्न झालें तरी तें पाहिजेच आहे. प्रत्येक गांवांत भांडणें हीं असावयाचींच, आपल्या विरुद्ध पक्षाला बाहेरगांवीं अमुक एका विशिष्ट बाजूची मंडळी मिळाली, तर त्यांच्या विरुद्ध असलेली मंडळी आपल्याला मिळतील; तर आपल्या गांवांतील भांडणें नेहमीं चवाठ्यावर मांडावींत, तीं भांडणें तत्त्वयुक्त आहेत असें भासवावें, त्या भांडणांत आपली बाजू घेण्यासंबंधानें लोकांत आवेश उत्पन्न करावा, आपण उत्पन्न केलेल्या फंडास बाहेर गांवाहून पैसे मिळावेत म्हणून योग्य वातावरण उत्पन्न करावें. इत्यादि. दोन्ही पक्षांना स्थानिक सुधारणेची फारशी फिकीर नसे. आणि ती त्यांनीं कां बाळगावी हा प्रश्नच होता. कां कीं खुद्द स्थानिक प्रश्नाकडे लक्ष देणारी जी संस्था म्युनिसिपालिटी तींतील माणसें निवडून येतांना कोणत्याहि स्थानिक प्रश्नासंबंधानें मत बनून निवडून येत नसत, तर कांहीं अंशीं धंदेवाईक चळवळ्यांच्या मदतीनें, तर कांहीं अंशीं हा मनुष्य गांधींना चांगला म्हणतो कीं, वाईट म्हणतो, पृथ्वी सपाट कीं वाटोळी याविषयीं त्याचें काय मत आहे, अशा स्थानिक प्रश्नांशीं असंबद्ध तत्वाच्या अनुयायित्त्वावर निवडून येत आहेत.

या गांवांतील जो अधिक लोकप्रिय पक्ष आहे, म्हणजे ज्या पक्षास कॉलेजवाले विध्वंसक पक्ष म्हणतात, त्या लोकप्रिय पक्षाची घटना चांगल्या तऱ्हेनें समजली म्हणजे हा व गांवांतला "विधायक" पक्ष हे दोन्ही मिळून काय कामगिरी करणार हें कोणासही स्पष्ट होईल. पक्षाची जूट कशी होत असते हें सर्वपरिचित आहेच. पक्ष उत्पन्न होण्यास केवळ मतें चालत नाहींत, तर डबोल्याचा वास अवश्य आहे.

ज्याप्रमाणें मधाच्या भांड्याचें तोंड घट्ट बांधलेलें असलें, तरी मधाच्या भांड्या-भोंवतीं मुंगळे घोटाळतात, त्याप्रमाणेंच जेथें कांहीं डबोलें दिसेल, तें आपल्या तावडींत आणण्यासाठीं मनुष्यसंघ जमा होतात, व त्यांत आणखी भांडणतंटे होऊन निरनिराळे पक्ष पडतात. वैयक्तिक भांडणें असतील तीं एकत्र करून त्यांस पक्षस्वरूप देण्यासाठीं जे लोक खटपट करतात, ते गांवांतील पॉलिटिशिअन होत. या लोकप्रिय पक्षापाशीं कांहीं दिवस पैसे नव्हते, तथापि त्यांना अधिक पैसेवाल्या पक्षाबरोबर संग्राम करावा लागे. त्यामुळें त्यांनीं आपल्या पक्षाची रचना व कार्य-पद्धति मोठ्या चातुर्यानें बसविली आहे. त्यांच्यापाशीं निवडणूक भांडावयास पैसे नाहींत. सगळेच उमेदवार तत्त्वें बोलणारे आणि पैहि खर्च करण्यास कुर-कुरणारे; अशा वेळेस आपला विशिष्ट पक्ष पुढें येईल, अशी युक्ति काय योजावी अशी विवंचना त्या पक्षाच्या पुढारी मंडळीस नेहमींच असे. स्वतः पैसे खर्च न करतां म्युनिसिपालिटीचे कारभारी म्हणून निवडून येण्याची शक्यता नव्हती असें मात्र नाहीं. म्युनिसिपालिटीस अनेक कंत्राटें द्यावयाचीं असतात. त्या कंत्राटांपैकीं कांहीं फारच किफायतीचीं असतात. तीं जर एखाद्या व्यक्तीस मिळालीं तर त्या व्यक्तीला या पक्षासाठीं लागणारा पैसा खर्च करण्यास हरकत वाटत नाहीं, व कंत्राट मिळण्याचें अभिवचन दिलें, तर भावी कंत्राटदार म्युनि-सिपालटीच्या निवडणुकीसाठीं उमेदवारांप्रीत्यर्थ निवडणुकीचा खर्च करीत, इत-केंच नव्हे तर प्रसंगीं उमेदवारांस निवडून आल्यानंतर कोणास कोट, कोणास फर्निचर असें बक्षीस देत. त्यामुळें लोकांस जरी वरवर असें दिसे कीं दोन पक्ष कांहीं तत्त्वाकरितां भांडत आहेत, तरी वस्तुस्थिति अशी होती कीं, कांहीं कंत्राट-मागू लोक, आपणांस अनुकूल असलेले उमेदवार निवडून आणण्याची खटपट करीत, आणि वर्तमानपत्रांतून मात्र तात्त्विक कज्जा चाललेला दिसे. खरोखर कांहीं सुधारणेची गोष्ट आली, तर तिला दोन्ही पक्ष उदासीनच.

याप्रमाणें डॉ. घैसास माझ्यापुढें स्थानिक राजकारणाचीं रहस्यें मांडीत होते. हीं रहस्यें मांडतांना कैझरची व जर्मनपद्धतीची स्तुति करून लोकराज्य या कल्पनेचा उपहास ते करीत असत. राज्य लोकहितासाठींच हवें पण लोकांस काय पाहिजे हें तज्ज्ञांनीं ठरवावें असें ते म्हणत असत.

—×—

प्रकरण १० वें.

## डॉ. घैसासांच्या प्रयत्नांचें वैयर्थ्य.

डॉ. घैसास यांचे प्रयत्न लोक सुधारणेसाठीं आपणास वाव मिळावा अशा तऱ्हेचे होते, तथापि आपणांस ज्या गोष्टी करावयाच्या आहेत त्या करण्यासाठीं वरून दपटशा आणून म्युनिसिपालिटीकडून करून घ्याव्यात या मताचे ते नव्हते. ते म्हणत असत कीं, लोकांकडून आदेश मिळवूनच आपण कामास लागूं; तथापि त्यांना त्या कामांत यश आलें नाहीं. शेवटीं ते पुणें सोडून एका संस्थानिकाकडे नोकरीस गेले. आणि त्यांच्या राजधानीचें आरोग्य सुधारण्यासाठीं त्यांनीं अत्यंत परिश्रम केले, म्हणून त्यांचें नांव त्या राज्यांत झालेंच आहे. त्या राज्यांत त्यांची जी प्रशंसा होते ती स्वीकारतांना त्यांना अजूनही एक तऱ्हेची खेदाची प्रतीति येते. ते माझ्याशीं अजून पत्रव्यवहार करितात. एका पत्रांत ते मला लिहितात कीं, "मला ज्या लोकांविषयीं अत्यंत आपुलकीची भावना वाटते, त्यांचें आरोग्य सुधारण्याची संधि मला मिळाली नाहीं. इतर जनतेचीच सेवा मी करीत आहें." स्वजनांनीं सहकारिता नाकारल्यानेंच विश्वकुटुंबी भावना मनुष्याच्या मनांत उत्पन्न होत असाव्यात. त्यांच्या निराशेच्या भावनांनादेखील इतिहास आहे. त्यांतील कांहीं गोष्टी माझ्यासमक्ष झालेल्या आहेत.

डॉ. घैसास यांना प्रिय असलेल्या त्या नगरींत लोकराज्य हळूहळू डोकावूं लागलें. त्याचीं फळें लोकांस चाखावयास मिळत होतीं. आणि लोकांस त्यामुळें असा संदेह उत्पन्न होऊं लागला होता कीं, सैतानी नोकरशाही जाऊन जर संपूर्ण लोकशाही आली तर लोकांचें कल्याण होईल कीं अकल्याण होईल? लोकांना या बाबतींत लोकराज्याची जरी भीति वाटूं लागली असली, तरी ती व्यक्त करण्याचें धैर्य नव्हतें. कां कीं, कोणी जर असें केलें तर त्यास लोकराज्याचा द्वेष्टा, नोकरशाहीचा गुलाम इत्यादि विशेषणें द्यावयास दोन्ही पक्षांचे लोक तयार होतेच व यामुळें जर कोणास कांहीं चांगलें काम घडवून आणण्यासाठीं चळवळ करावयाची असली तर त्याचा पुढील मार्ग बराचसा कठिण होता. लोकराज्यामध्यें ज्या लोकांचीं मतें मिळवावयाचीं त्यानें 'तुम्हांला सगळ्या गोष्टी समजतात' इत्यादि मोहक वाक्यें लोकांस सांगणें अवश्य

होतें; आणि त्यामुळें जास्त कांहीं नवीन सुधारणा घडवून आणावयाची असेल तर त्याच्यापुढें असा प्रश्न पडे कीं, जें आहे तें जर चांगलें म्हटलें नाहीं तर लोक मूर्ख ठरतात आणि लोकांस जर मूर्ख म्हटलें तर आपणांस मतें कशीं मिळतील ?

डॉ. घैसास हे या गांवांतलेच; पण चार पांच वर्षें युरोपांत राहून त्यांनीं त्या ठिकाणीं सूक्ष्मजीवशास्त्राचा चांगला अभ्यास केला होता. आणि तो अभ्यास आपल्या शहराच्या चांगला उपयोगी पडेल, व आपण आपल्या गांवाच्या आरोग्य-विषयक सुधारणेसाठीं जाऊन चांगली खटपट करावी, इत्यादि भावना त्यांच्या मनांत वागत होत्या, व ते मोठ्या उत्साहानें हिंदुस्थानांत परत आले. चांगल्या गोष्टीला विरोधक कांहीं माणसें असतील अशी त्यांच्या मनांत कल्पनाहि नव्हती. आपल्या गांवांतील कांहीं पुढारी मंडळीकडे जाऊन आपण आपली विद्या आपल्या शहराला समर्पण करण्यासाठीं त्यांनीं खटपट केली, पण त्या वेळेस परिस्थिति अनेक बाजूंनीं विरोधकारकच होती. गांवांतलें राजकारण अर्धवट शिकलेल्या कांहीं लोकांच्या टोळीच्या हातीं आलें होतें. त्या टोळीचे शार्दूलकार प्रमुख होते. त्यांच्या पुढ्यांत अशीं माणसें होतीं कीं अधिक सुविद्यतेनें नव्हे तर केवळ लटपटी करून अर्धवट विद्येनें आपण समाजाचें प्रामुख्य आपल्या हातीं ठेवावें, आणि अशांची मुत्सद्दीगिरी यासाठीं चळवळी करण्यांतच खर्च होत असे. त्यांत एक वैद्य होता, व एक भटारी होता. या भटाऱ्याच्या खाणावळीमध्यें विद्यार्थी बरेच जेवीत. त्यामुळें तो आपल्याला केवळ खाणावळवाला असें म्हणवून न घेतां विद्यार्थ्यांच्या बोर्डिंगचा सुपरिंटेंडेंट असें प्रतिष्ठित नांव घेऊन लोकांत वावरे. त्या पक्षांत कांहीं वकीलहि होते. आणि कांहीं त्या शार्दूलपत्राचेच कारकून, वर्तमानपत्रविके इत्यादि माणसें होतीं. डॉ. घैसास यांस प्रथम अडचण पडली ती अशी: या पक्षांतील लोक, तुम्ही आपल्या सूक्ष्मजीवशास्त्राचा बडेजाव गाऊन आर्यवैद्यकाला कमी ठरविणार कीं काय, असा प्रश्न त्या पक्षांतील प्रमुख मंडळींनीं केला. त्या पक्षांत जास्त शिकलेले लोक होते, ते म्हणाले कीं, तुम्ही या लहानशा गांवांत राहून आपल्या आयुष्याचा खराबा करून घेऊं नका. तुमच्या कार्याला आमचें गांव हें चांगलें क्षेत्र नाहीं, आमचें गांव गरीब आहे. तुमच्या विद्येचा आमच्या म्युनिसिपालिटीनें स्वीकार करावयाचा, म्हणजे एक लॅबोरेटरी काढावी लागणार, आणि त्या खर्चांत म्युनिसिपालिटीला पडावें लागणार, आणि पडून पुढें काय करणार, तर या गांवांतल्या विहिरींचें पाणी तुम्ही तपासणार, आणि तें पाणी तपासल्यानंतर पिण्यास नालायक

ठरवणार, आणि तें पिण्यास नालायक ठरलें म्हणजे त्या विहिरी बंद करण्याची सक्ति तुम्ही आम्हांस करावयास लावणार, आणि ती सक्ति आम्ही करावयास लागलों, म्हणजे त्या विहिरींच्या आसपासच्या घरांचीं भाडीं कमी होणार, आणि तीं कमी झालीं, म्हणजे घरवाले आमच्यावर उलटणार. म्हणजे तुम्हांस आम्ही उत्तेजन द्यावयाचें म्हणजे लोक आमच्या विरुद्ध करून घ्यावयाची तयारी करावयाची. तर हा खटाटोप कोणाला पाहिजे ? शिवाय तुमची डिग्री ब्रिटिशराज्यांतली नसून जर्मनींतली आहे. तुम्हांला पुढें सारावयाचें म्हणजे आम्ही जर्मन डिग्रींना मानतों असें सरकारला दाखवावें लागणार. आणि तसें झालें म्हणजे सरकारचा विनाकारण विरोध होणार; तो आम्हांस कशास पाहिजे ? आणि तो विरोध मिळवून आम्ही लोकांचें हित काय करणार ? इत्यादि गोष्टी डॉ. घैसास यांस सांगून, त्यांस म्युनिसिपालिटींतल्या मंडळींनीं त्यांच्या विद्येची शहरास अनुपयुक्तता सप्रमाण सिद्ध करून दिली.

डॉ. घैसास यांनीं स्थानिक स्वराज्याची नोकरी करण्याचा विचार सोडून दिला. त्यांनीं आय्. एम्. एस्. मध्यें शिरण्यासाठीं मुळीं खटपटच केली नाहीं. जिकडे नोकरी मिळेल तिकडे जावें, आणि आपल्या विद्येचें चीज होईल तेथें होऊं द्यावें, अशी त्यांची भावना नव्हती. आणि त्यांना आपली विद्या ज्या समाजांत आपण वाढलों, ज्या समाजाशीं आपला जिव्हाळ्याचा संबंध आहे, त्या समाजासच द्यावयाची असल्यामुळें ते विशेषेंकरून शहराच्या आरोग्यखात्यांत नोकरीसाठीं खटपट करीत होते; पण त्याचा स्थानिक मंडळींनीं निराळा अर्थ केला. त्यांस असें वाटे कीं, जो आय्. एम्. एस्. च्या योग्यतेचा मनुष्य आहे, तो शहराकडे नोकरीसाठीं येईलच कशासाठीं ? शहराच्या आरोग्यखात्याला सब असिस्टंट सर्जनच्या योग्यतेचीं माणसें असलीं म्हणजे पुष्कळ आहे. तीं साठ-सत्तर रुपयांत मिळतात. आणि त्यांना दीडशें-पर्यंत वाढ मिळाली म्हणजे पुष्कळ झालें. गांवांतलें शार्दूलपत्र होतें त्यानें बॅक्टिरिआलॉजिस्ट म्हणजे काय, तो चांगल्या योग्यतेच्या प्रयोगशाळेंत काम करून तयार झाला म्हणजे त्याचें महत्त्व काय, इत्यादि कल्पना आपल्या डोक्यांत येऊं दिल्या नाहींत आणि उलट आपल्या गांवांतल्या एका मनुष्याकडून असा पत्रव्यवहार प्रसिद्ध करविला कीं, येथच्या येथें डॉक्टर व्हावयाचा म्हणजे तो दरमहा २५ रुपये महिना खर्च करून ४ वर्षांत होऊं शकतो. त्याला मुंबईच्या मेडिकल कॉलेजांतहि जावयाला नको. असें असतां परक्या देशांत जाऊन पंचवीस तीस हजार

रुपये उडवून डॉक्टरी सर्टिफिकेट घेऊन येणें या मूर्खपणास काय म्हणावें? हे पंचवीस हजार रुपये हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नतीस लागले असते तर देशाचें कल्याण तरी झालें असतें, इत्यादि. एवंच चांगली विद्या संपादून आलेल्यांस उत्तेजन देण्याचें सोडून परक्या देशांत जाऊन २५ हजार रुपये खर्च करून कागदी चिटोरें घेऊन येणाऱ्या मूर्खांत डॉ. घैसास यांची गणना करण्यास त्या गांवठी पत्रकारानें सुरवात केली. गांवांतल्या १०।१५ डॉक्टरांना त्या तऱ्हेचा पत्रव्यवहार वाचून मौज वाटत असावी. पण त्या कल्पनांचें दूरीकरण करण्याची खटपट मात्र कोणीं केली नाहीं.

डॉ. घैसास यांच्या व्यासंगाचा विषय सूक्ष्मजीवनशास्त्र हा जरी होता, तरी त्यांचें अभ्यासध्येय सामाजिक होतें. हिंदुस्थानामध्यें जो एकसारखा रोगामुळें संहार होत आहे तो फार भयंकर आहे, याची जाणीव लोकांस, ज्या देशांत असा लोकसंहार नाहीं त्या देशांत चार पांच वर्षें घालविल्यानें जशी होणार, तशी नुसत्या फरक दाखविणाऱ्या आंकड्यांनीं होत नाहीं. यावद्दलची तीव्र जाणीव युरोपदेशांत केलेल्या निवासामुळें डॉ. घैसास यांस झाली. त्यांस असेंहि दिसून आलें कीं, अप-मृत्यूवर जय मिळविणें हें मनुष्यशक्तीबाहेरचें नाहीं. सतराव्या शतकापासून स्वित्झर्लंडचे मृत्युसंख्येचे आंकडे उपलब्ध आहेत. तेथील जिनिव्हा शहरांत सत-राव्या शतकांत मृत्यूचें प्रमाण दर हजारीं ३६ म्हणजे आजच्या हिंदुस्थानसारखें होतें; पण आरोग्यविषयक सुधारणांमुळें अर्वाचीन युरोपांत मृत्यूचें प्रमाण दर हजारीं १६।१७ इतकें झालें आहे. या गोष्टीकडे त्यांचें स्वतःचें लक्ष वेधलें, आणि आरोग्यविषयक सुधारणेकडे हिंदुस्थाननें अधिक लक्ष देण्याचें महत्त्व त्यांस भासूं लागलें. हिंदुस्थानांत काम करण्याचीं वर्षें मनुष्यास कमी मिळत. त्यामुळें देशाच्या सांपत्तिक स्थितीवर अनिष्ट परिणाम होतो हें त्यांस दिसूं लागलें. युरोपियन मध्यम वर्गांत शिक्षणासाठीं मनुष्यास २७ पासून तीस वर्षांचें वय होईपर्यंतहि काळ घालवावा लागतो. तितका काळ घालविला तरच शास्त्रांत प्राविण्य उत्पन्न होतें. त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांत स्थिति होऊं लागली आहे. पंचवीस वर्षेंपर्यंत तर शिक्षणाची वयोमर्यादा हिंदुस्थानांत आजच वाढत चालली आहे. युरोपांतला सुशिक्षित मनुष्य ७४ वर्षें जगतो तर हिंदुस्थानांतील वहुतेक सुशिक्षित लोक चाळिसाच्या आंत मृत्यु पावतात. म्हणजे पंचवीस वर्षें तयारीचीं तर ४०।५० वर्षें द्रव्य मिळविण्याचीं, ही युरोपांत स्थिति आहे; तर हिंदुस्थानांत २५ वर्षें

तयारीचीं तर १५ वर्षें मिळविण्याचीं, आणि आपल्याकडील विधवा तर शिक्षणाभावामुळें आणि लोकरूढीमुळें द्रव्योत्पादनास असमर्थ आहेत, त्यामुळें मुलांच्या पोषणाचा भार चुलत्यांवर वगैरे पडतो, व मुलें चांगलीं पोसलीं जात नाहींत अशी स्थिति आहे. अशा स्थितींत मध्यम वर्ग खालावत चालला आहे. अशिक्षित वर्गाची स्थिति तर याहून वाईट आहे. इत्यादि गोष्टी डॉ. घैसास यांस दिसूं लागल्या. युरोपांतील लोकांना जास्त दिवस जगण्याचा नैसर्गिक हक्क नाहीं. ते देखील आपल्यासारखेच पूर्वी अल्पायुषी होते आणि आपणांसहि आयुष्य वाढविणें शक्य आहे, पण त्यासंबंधानें कळकळ पाहिजे, तिकडे लक्ष गेलें पाहिजे, तिकडे समाजाचें तीव्रतेनें लक्ष गेलें पाहिजे. आपल्याकडे लोकांनीं शहरांतील घाण काढून हवा स्वच्छ करण्याकडे, आणि संसर्गजन्य दोष कमी करण्याकडे, आणि स्वच्छ पाणी पिण्याकडे, लक्ष दिलें पाहिजे. म्युनिसिपालिट्यांसारख्या शासनसंस्थांनीं या बाबतींत अत्यंत मेहनतीनें काम केलें पाहिजे; कांहीं आरोग्यविषयक सुधारणा सरकारनें योजिल्या म्हणजे तींत सरकारचा हेतु प्रत्येक वेळेस वाईट धरून त्याला विरोध करणें, म्युनिसिपालिटीवर कराचें ओझें आणखी सरकार लादीत आहे, म्हणून ओरड करणें या गोष्टी शहाणपणाच्या नाहींत. गरीब म्हणून सुधारणा नकोत ही ओरड पुष्कळ प्रसंगीं अजाणपणाची आहे. आरोग्य सुधारण्यासाठीं आपणांवर व आपल्या कुटुंबावर जो खर्च पडेल त्यापेक्षां कर्ती माणसें व स्त्रिया यांच्या अपमृत्यूनें तो अधिक पडतो. ज्या स्वराज्याच्या राजकारणासाठीं आपण धडपडतों त्या स्वराज्याचें कारणहि नीट साधत नाहीं. आपल्यांतील माणसें विशेष अनुभव येण्यापूर्वीच मृत्युमुखीं पडतात व प्रत्येक वेळेस नवशिक्या पोरांना इंग्रज अनुभविकांशीं झगडावें लागतें, इत्यादि विचार डॉ. घैसास यांच्या मनांत घोळूं लागले आणि यासंबंधानें लोकजागृतीची आवश्यकता भासूं लागली व हिंदुस्थानांत आल्यानंतर त्यासंबंधानें चळवळ करण्यास सुरवात केली.

ही चळवळ मात्र सोपी नव्हती. या चळवळीस सरकारचा विरोध नसला तरी सहकार्य खात्रीनें नाहीं. सरकारची वृत्ति अशी कीं क्यांप किंवा लष्करी क्यानटोनमेंट जेथें असेल तेथें फारसे लोकराज्याचे प्रकार चालूं द्यावयाचे नाहींत; तेथें पाणी, खाण्याचे पदार्थ या सर्वांची सक्तीनें तपासणी करावयाची, रस्ते जर लोकांनीं मलमूत्रविसर्जनानें खराब केले तर त्यांस कडक शासन करावयाचें आणि उलटपक्षीं जेथें युरोपियन वस्ती नाहीं तेथें म्हणजे नेटिव्ह वस्तींत मात्र, घाणेरडेपणाच्या

बाबतींत सर्व प्रकारचें स्वातंत्र्य लोकांना दिलेलें दृष्टीस पडे. सरकारनें आरोग्यविषयक बाबतींत सक्ती करावयाची नाहीं आणि लोकांना आपण होऊन स्वच्छतेसाठीं सक्ती करण्याचें धैर्य नव्हतें. गांवांत जे दोन पक्ष होते त्यांचीं मतें अगदीं ठरल्यासारखीं होतीं. दोघांनाही राजकारण आणि समाजसुधारणा या गोष्टी अगदीं सोप्या, ज्यांत डोकें बिलकूल चालवावयाची गरज नाहीं, कांहीं ठरींव तत्त्वें पुटपुटलीं म्हणजे झालें अशाच विचारपद्धती आणि आचारपद्धती बनवावयाच्या होत्या; म्हणजे शास्त्रीयज्ञान नको, केवळ काव्य आणि तर्कशास्त्र यांच्या बळावर दोघांसहि राजकारणाचे व समाजसुधारणेचे डाव खेळावयाचे होते. लोकांच्या अपमृत्यूचें कारण लोकाभिमानी पक्षांपैकीं, इंग्रजानें लोकांच्या पदरीं बांधलेलें दारिद्र्य होय, असें एक पक्ष म्हणे तर दुसरा पक्ष अपमृत्यूंचा दोष बालविवाहास देई. आरोग्यविषयक सुधारणांविषयीं दोघेहि उदासीनच होते. एवढेंच नव्हे तर आपापल्या आवडीच्या कारणांखेरीज अन्य कारणांनीं अपमृत्यूचें स्पष्टीकरण केल्याबद्दल दोन्ही पक्षांस राग येत होता. विधायक पक्षास चीड आणणारें वर्तन एकदां खरोखरच डॉ. घैसास यांच्या हातून घडलें. डॉ. घैसास हे व्याख्यान देत असतां एका विधायक प्रोफेसरानें "हिंदुस्थानाच्या शारीरिक दुर्गतीचें, अपमृत्यूचें आणि लोकक्षयाचें कारण बालविवाह नाहीं काय" असा प्रश्न केला. तेव्हां याबद्दल मला कांहींच माहिती नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें, व असेंहि सांगितलें कीं, भोंवतालची स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य कमी असतां जो चालूच राहणार, त्या लोकसंख्याक्षयास बालविवाहाच्या चालीमुळें अडथळा उत्पन्न झाला आहे हें ऐकून विधायकांनीं डॉ. घैसास बालविवाहाची तरफदारी करून लोकप्रिय होऊं पहात आहेत, अशी विधायक ओरड सुरू केली.

डॉ. घैसास यांनीं साध्या गोष्टीसंबंधानें लोकमत जागृत करावयास सुरवात केली तेव्हां शार्दूलकारांस त्यांचें मोठें वैषम्य वाटलें. पाणी आधण आल्यानंतर थंड करून पीत जा, या अर्थाचा उपदेश करण्यासाठीं जेव्हां त्यांनीं पाण्यांतील जंतूंविषयीं व्याख्यान दिलें, तेव्हां त्यांतील कांहीं वाक्यें घेऊन शार्दूलकारांनीं एक मोठी खोंचदार भाषेंत टीका केली. त्यांच्या मतें पाण्यांत जंतू आहेत हा शोध कांहीं नवीन नव्हे. तो सांगावयास जर्मनींतील डॉक्टरच कशास पाहिजेत.

"पाण्यांत जंतू आहेत म्हणून आक्रोशानें सांगण्याचा आणि त्या संबंधानें गाजावाजा करण्याचा हेतु ब्राह्मण लोकांच्या शाकाहारी बाण्यावर टोमणा देणें हा होय.

पाणी कढविलेलें प्यावयाचें ही काय नवीन गोष्ट आहे ? मद्रासकडे तर गरम पाणी पिण्याची चाल नेहमींची आहे. शिवाय शार्दूलकारांनीं असेंहि बजावलें कीं, गंगोदकामध्यें जंतुनाशकद्रव्यें आहेत असें जें शार्दूलकरांनीं पूर्वी प्रसिद्ध केलें होतें, त्याविरुद्ध नवशिक्या डॉ. घैसासांनीं मत प्रदर्शित केलें आहे; पण डॉ. घैसास यांस शार्दूलकार असा इशारा देऊं इच्छितात कीं, ज्या गोऱ्या लोकांस डॉ. घैसास हे देव मानतात, त्या गोऱ्यांपैकींच कांहीं लोकांनीं गंगोदकाची तारीफ केलेली आहे."

डॉ. घैसास यांनीं एकदां "कोंकणस्थ ब्राह्मणांचा होत असलेला कुलक्षय" या विषयावर गणपति उत्सवांत व्याख्यान दिलें. तेव्हां त्यांना वाटलें कीं या व्याख्यानाकडे तरी बऱ्याचशा "देशाभिमानी" मंडळीचें लक्ष जाईल. त्या व्याख्यानांत त्यांनीं असें दाखविलें होतें कीं कोंकणस्थ ब्राह्मणांची संख्या दरसाल सुमारें तीनशें व्यक्तींनीं कमी होत आहे. जननापेक्षां मृत्यु जास्त आहेत; आणि चालू आहे तो संख्याक्षय त्याच प्रमाणांत चालू राहिला तर ३०० वर्षांनीं कोंकणस्थांची जातच नष्ट होईल.

त्या व्याख्यानांत असेंहि दाखविलें होतें कीं कोंकणस्थ ब्राह्मणांमध्यें स्त्रियांच्या मृत्युसंख्येचें प्रमाण मोठें आहे. व पुढें असें दाखविलें होतें कीं पारशांमध्यें बालविवाह जसजसा कमी होत चालला, तसतसें स्त्रियांच्या मृत्यूचें प्रमाण कमी होत चाललें आहे. तथापि त्यांनीं हेंहि सांगितलें कीं यासंबंधानें निश्चयात्मक मत सुमारें दहा हजार मृत्यूंचा अभ्यास करून दिलें पाहिजे.

याप्रमाणें डॉ. घैसास यांचें व्याख्यान झाल्यानंतर त्याकडे लक्ष फारच थोड्या पत्रांनी दिलें. एक विधायक पत्र मात्र म्हणालें कीं, बालविवाह हाच देशघातास कारण आहे ही गोष्ट डॉ. घैसास यांस शेवटीं मान्य झाली, हें पाहून आनंद वाटतो. दुसऱ्या एका पत्रानें आंकडेशास्त्राचीच टर उडविली. तें म्हणालें "आंकडेशास्त्र म्हणजे सरकारी लबाडीचा एक भाग आहे. आंकड्यांनीं वाटेल ती गोष्ट सिद्ध करतां येते. खऱ्याचें खोटें करतां येतें व खोट्याचें खरें करतां येतें. आंकडेशास्त्रानें हिंदुस्थान गरीब असतांना श्रीमंत आहे असें दाखवितां येतें" येणेंप्रमाणें त्यांच्या आंकडेशास्त्राची संभावना करण्यांत आली.

डॉ. घैसास यांनीं ज्या गोष्टी पुढें मांडाव्यात त्यामुळें जर कांहीं लोकांचे पूर्वग्रह दुखविले गेले तर त्यांच्या हातीं डॉ. घैसास यांस हाणून पाडण्यासाठीं अनेक युक्त्या

होत्या. त्यांत पाश्चात्य वैद्यकशास्त्राचें तुच्छताप्रदर्शन, डॉ. घैसास यांच्या हेतूविषयीं शंका घेणें, त्यांना नोकरी नाहीं म्हणून ते भकतात असें दाखविणें, देशाची दुःस्थिती कशामुळें झाली आहे, याविषयीं जे पूर्वीचे लेखक, व्याख्याते, किंवा पुढारी बोलले असतील त्यांच्याविषयीं अनादर डॉ. घैसास यांच्या पदरीं बांधणें इत्यादि प्रमुख होत्या. मागें दिलेलें अवतरण तसल्याच एका प्रकारचें होय.

आपल्या प्रयत्नास एकसारखें अपयश येत आहे व लोकसुधारणेसाठीं आपण चळवळ करावी तर सुशिक्षित लोक विनाकारण आपल्या विरुद्ध जातात, याबद्दल डॉ. घैसास यांस वाईट वाटे. आपलें सरळ म्हणणें या लोकांना पटत नाहीं याचें कारण तरी काय ? त्यांस राष्ट्रप्रेमच नाहीं काय, इत्यादि विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले. लोकराज्य सुरळीतपणें चालण्यास नवीन नवीन शास्त्रीय उपाय योजून सर्वप्रकारें लोकस्थिति सुधारली पाहिजे; शास्त्रीय ज्ञानाची तर ते इंग्रजांचे पोर अशा समजुतीनेंच कीं काय, चेष्टाच होत आहे. जोंपर्यंत लोकशाहींतील हीं माणसें शास्त्रीय ज्ञानाचीं अभिमानी बनलीं नाहींत, तोंपर्यंत नोकरशाही सैतान नसून लोकाग्रणीच सैतान होत. कां कीं लोकसंहार त्यांच्यामुळेंच होत आहे. पायखाने सुधारण्यासाठीं ज्यांस पैसा खर्च करावयास नको, आणि विषमज्वराची सांथ आली म्हणजे ती इंग्रजांनीं आणली असें जे म्हणतात, त्यांस सैतान म्हणूं नये तर काय म्हणावें ? स्वातंत्र्यासाठीं आयुष्य नाहीं, तर स्वातंत्र्य जें पाहिजे तें आयुष्यासाठीं होय. जर लोकांचें कल्याण व्हावयास पाहिजे असेल तर हें लोकराज्य नको. सध्यांचें लोकराज्य आयुष्यघातकी आहे. म्युनिसिपालिटी बंद करून ती युरोपियन अधिकाऱ्यांच्या ताब्यांत दिली पाहिजे आणि लोकमताला बिलकुल क्षेत्र देतां कामा नये. शास्त्रज्ञांनीं शहरासाठीं काय केलें पाहिजे तें सांगावें, आणि सरकारनें लोकांस न विचारतां हुकूम करावा, आणि लोक ऐकणार नाहींत तर त्यांस सपाटून चोप द्यावा. ड्रेनेजसारख्या सुधारणा सरकारनें लोकांस न विचारतां कराव्यात, आणि त्या पार पाडण्यासाठीं लागणारें द्रव्य लोकांस न विचारतां कर लादून खर्च करावें आणि आरोग्यविषयक कायदे लोकांस न विचारतां करावेत आणि जो कोणी गृहस्थ "लोकमत" किंवा लोकांचे हक्क याविषयीं विनाकारण वाच्यता करील, त्याचें तोंड बांधण्यासाठीं, व्याख्यान देण्यासाठीं देखील पोलीस परवान्याची आवश्यकता ठेवावी; इत्यादि विचार त्याचे मनांत पक्के भरले. त्यांना असें वाटूं लगलें कीं लोकराज्य झालें म्हणजे घाण वाढेल; म्युनिसिपालिटी प्रत्येक

सुधारणा तिचे पैसे सरकार देईल तर करूं असें म्हणूं लागेल व त्यामुळें देशांत मृत्युसंख्या वाढत जाईल. डॉ० घैसास यांना पुढें असेंही वाटूं लागलें कीं, आम्हांस स्वराज्य अजीबात बंद करावें. लोकराज्य अजीबात बंद करण्यासाठीं कांहीं कांहीं सुशिक्षित माणसांनीं सरकारास अर्ज करण्याचें ठरविलें पाहिजे. तथापि तीप्रमाणें आचरण झालें नाहीं; कारण डॉ० घैसास पुणें सोडून एका संस्थानाचे वैद्यकीय सल्लागार म्हणून बाहेर गेले.

—×—

प्रकरण ११ वें.

## डॉ. घैसास कसे वळले.

डॉ. घैसास यांचा पुण्यास जम बसत होता, म्हणून मागें सांगितलें आहे. तथापि ते संस्थानांत गेले ही गोष्ट अनेक लोकांप्रमाणें मला पटली नाहीं. ते गेल्यामुळें माझी नोकरी सुटली हें माझें पुण्यभूमित्यागास आक्षेप घेण्याचें कारण नव्हतें. मला असें वाटे कीं, स्वतंत्र नागरिक म्हणून वाढलेला मनुष्य आपल्या इच्छेप्रमाणें गोष्टी घडून येत नाहींत म्हणून संस्थानांत जातो तो शेवटीं फसणारच. आपल्या राजेलोकांच्या हातीं सत्ता आहे तिचा उपयोग लोककल्याणकडे ते करतील आणि त्यामुळें आपल्या कल्पनांस अधिक वाव मिळेल ही त्यांची आशा निष्फळ ठरेल असेंच मला वाटत होतें. त्या संस्थानिकांकडून डॉ. घैसास यांना आमंत्रण तरी कसें आलें याबद्दल मला प्रथम अचंबा वाटला; कारण प्रस्तुत संस्थानिक पुण्यास येत ते केवळ घोड-दौड करण्यासाठीं व घोडजुगार खेळण्यासाठीं. यांचीं लफडीं अनेक असत. डॉ. घैसास यांना त्या राजांकडून जेव्हां नौकरीस याल काय अशी विचारणा करण्यासाठीं त्यांचे दिवाणजी आले तेव्हां त्या राजाविषयीं जे कांहीं आक्षेप ऐकले होते नव्हते ते त्यांनीं सरळ मनानें दिवाणांपुढें मांडले. आणि दिवाणांनीं त्या सर्व गप्पा आहेत आणि गप्पा उठविणारे लोकच संस्थानांत उपटेगिरी चालविण्यास असमर्थ झाल्यामुळें त्यांनीं या अफवा सुरू केल्या आहेत, आणि पुण्यास जे राजेसाहेब येतात त्यांत त्यांचा हेतु खरोखर राजकीय म्हणजे प्रजेच्या कल्याणाचा असतो

घोडदौडीचे आमचे राजे खरोखर शौकी नाहींतच; पण गव्हर्नरसाहेब घोडदौडीचे शौकी असल्यामुळें घोडदौडीमध्यें देखील राजेलोकांना लक्ष घालावें लागतें. त्या खेरीज त्यांची मित्रता साध्य होत नाहीं. आणि राजेलोक आणि गव्हर्नर यांची वैयक्तिक मित्रता असली तर राज्यव्यवहार अधिक सोपा होतो. नाहींतर पोलिटिकल डिपार्टमेंट विनाकारण खुसपटें काढतें. हलक्या लोकांच्या तक्रारींची चौकशी करूं पाहातें, कोणतेंही चांगलें काम करावयाचें झालें म्हणजे त्या सुधारणामुळें ज्यांची चोरी अगर पोळी बंद होईल ते लोक विरुद्ध होणारच. आणि ते लोक यापुढें ब्रिटिशांकडे जाणार. ब्रिटिश सरकार दरबारच्या चुका काढणार. याप्रमाणें प्रकार होत असत. आणि यामुळें ब्रिटिश कारभाराचा मुख्य जो गव्हर्नर त्याच्याशीं आम्हांला संधान ठेवलेंच पाहिजे. व यासाठीं ज्या खुळांत गव्हर्नरसारखे लोक पडतील त्या खुळांत आम्हांला समाविष्ट झालेंच पाहिजे. तुम्ही घोडदौडीविषयीं आस्था दाखवा, बक्षीस लावा, असें आम्हीच राजेसाहेबांना सांगतों. वगैरे गोष्टी दिवाणांनीं सांगितल्या. तेव्हां राजेसाहेब फार चांगले आहेत अशी डॉ. घैसास यांची खात्री पटली. चांगल्या कामाला लोक विरोध करतात हें डॉ. घैसासांना ठाऊकच होतें. आणि त्यामुळें सत्कार्य करण्यासाठीं देखील ब्रिटिश सरकारचा अविरोध संपादन करणें अवश्य आहे हें ओघानें आलेंच, आणि त्या गोष्टी मान्य झाल्यानंतर ब्रिटिश सरकारचा स्नेह जोडण्यासाठीं पोलिटिकल एजंट, पोलिटिकल सेक्रेटरी आणि गव्हर्नर यांस खूष करणेंहि आलेंच. ही सर्व मंडळी केवळ आमच्या चांगल्या वागणुकीनें खूष होण्याइतकी साधु वृत्तीची आहे काय? हा प्रश्न उत्पन्न केल्यानंतर "होय" असें उत्तर डॉ. घैसास तरी कसें देतील. एवंच शेवटीं राजेसाहेब चांगले ठरले आणि डॉ. घैसास वळले.

डॉ. घैसासांची माहिती राजेसाहेबांना कशी झाली याविषयीं डॉ. घैसास यांनीं चौकशी केली असतां त्यांस पुढील प्रकारचें उत्तर मिळालें. डॉ. घैसास यांची एका प्रसिद्ध खुनाच्या खटल्यांत कोर्टापुढें जी साक्ष झाली, ती बरीच गाजली होती. त्या खटल्यांत ज्या व्यक्तीचा खून झाला त्या व्यक्तीच्या त्या अस्थि नाहींत. खून बाईचा झालेला आहे आणि अस्थि सोळा वर्षांच्या मुलाच्या आहेत, असें डॉ. घैसास यांनीं कोर्टास सप्रमाण दाखविलें होतें. त्यामुळें डॉ. घैसास यांची कीर्ति पुण्यास वाढली त्याप्रमाणें आसपासहि पसरली. डॉ. घैसास यांना आमंत्रण करण्यांत आलें याचा हेतु कांहींतरी वेडावांकडा असावा, राजेलोकांच्या दुष्कृत्यांवर

पांघरूण घालण्यासाठीं कोर्टाची दिशाभूल होईल, अशी हुषारीची साक्ष देणारा डॉक्टर राजेसाहेबांस हवा आहे, असें आम्हांस पटलें तर दिवाणसाहेबांनीं डॉ. साहेबांस असें सांगितलें कीं, आपल्यासारखा डॉक्टर आमच्या पोलिसांनीं बनावट पुरावे केले, तर त्यावर कडक तपासणी करून प्रजेचें संरक्षण व्हावें यासाठींच हवा आहे. शिवाय आपली डिग्री जर्मन पडली, जर्मन डिग्रीचा मनुष्य आमच्या संस्थानांत आणावयास पोलिटिकल डिपार्टमेंट आक्षेपच घेणार. त्यांचें म्हणणें असें कीं, ब्रिटिश डिग्री हेंच खरें नाणें. तर केवळ प्रयोग म्हणून आम्ही आपणांस घेण्याची खटपट करूच. आपल्या नेमणुकीस आम्ही हरकत घेणार नाहीं, म्हणून पोलिटिकल सेक्रेटरींनीं सांगितलें आहे. ते आपणांस ओळखतात. तर आपल्या आगमनानें जर्मन किंवा अमेरिकन शिक्षणाचा डॉक्टर नेमण्याची प्रथा पडण्यास मदत होणार आहे. डॉ. घैसास यांना हेंहि विधान पटलें.

डॉ. साहेबांच्या मागें उल्लेखिलेल्या साक्षीच्या प्रसंगामुळें आरोपी व त्यांचे वकील यांच्याशीं माझा संबंध आलाच. पण पोलिसच्या लोकांशीं देखील ओळखी झाल्या. त्यावेळचे अनेक इन्स्पेक्टर बऱ्यांपैकीं मनुष्य असले तरी ते आपल्यापुढें पुरावा जीं खालचीं माणसें आणून देत त्याच्या परिक्षणांत डोकें घालणारे नव्हते, असें दिसून आलें. एका इन्स्पेक्टराची पुढें माझी चांगलीच ओळख झाली. कारण पोलीस केस ज्या हुशार डॉक्टरांनीं फजीत केली त्या डॉक्टरपाशीं ओळख वाढवून चार गोष्टी अधिक शिकाव्यात अशा वृत्तीचे ते झाले. त्यांनीं डॉक्टरांकडे खासगी गप्पा मारावयास येण्याची परवानगी मागून घेतली आणि ते मधून मधून आमच्याकडे येऊं लागले. मी देखील त्यांना भेटण्यासाठीं कधीं कधीं फरासखान्यांत जात असें.

—×—

प्रकरण १२ वें.

## नर्मदाबाई सरवटे.

नर्मदाबाई सरवटे यांची आणि डॉ. घैसासांची ओळख कोणत्या केसमुळें झाली हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. नर्मदाबाईचा पुष्कळदां डिस्पेन्सरींत बसण्याचा योगायोग मात्र त्यामुळें आला. आणि मला देखील नर्मदाबाईच्या घरीं जाण्याचा

प्रसंग आला. नर्मदाबाईंच्या घरीं गेलों म्हणजे त्या सर्व प्रकारें अगत्य दाखवीत असत. डॉक्टर त्यांच्या घरीं कधीं गेले नव्हतेच. ते आणि नर्मदाबाई एका केसवर अनेकदां एका टांग्यांत बसून गेल्या असल्याकारणानें, बुधवार चौकाच्या प्रत्येक दुकानांत जे संध्याकाळीं निनावी क्लब भरतात, त्या क्लबांतून बरीच चर्चा होत असे. नर्मदाबाईंच्या कपाळावर कुंकूं असल्यामुळें चर्चा बरीच होत असे. कुंकूं असलेली आणि नर्स झालेली बाई म्हणजे नवऱ्यास टाकून देणारी किंवा नवऱ्यानें टाकून दिलेली अशीच असली पाहिजे. आणि नर्मदाबाई खरोखर अशांचपैकीं होती. अर्थात् नर्मदाबाईंचा पुनर्विवाह डॉ. घैसास यांच्याशीं लागणार असल्याची बातमी तयार करणें शक्य नव्हतें. अर्थात् अयोग्य संबंधाच्या बातम्याच उठवावयाच्या. त्या तशा उठलेल्याही होत्या. या बातम्यांत कांहीं एक अर्थ नाहीं हें मला तितकेंच माहीत होतें. मीं एकदां दोनदां लोकांना तसें सांगितलेंहि; पण माझें ऐकतो कोण ? लोकांना सत्य नकोच असतें. ज्या कथेला दररोज कांहीं तरी तिखट–मीठ लावतां येईल, अशाच तऱ्हेच्या गोष्टींवर विश्वास ठेवावयाचा, अशीच लोकांची वृत्ति असते. लोकांनीं डॉक्टर रात्रीं कसे चोरून नर्मदाबाईंच्या घरीं जातात हें पाहावयाचें, अशी त्यांची वृत्ति असते.

नर्मदाबाईंना आपल्या पूर्वायुष्याच्या कथा सांगाव्यात असें वाटत असे. आणि त्यांना आपल्याविषयीं सहानुभूति लोकांत जागृत व्हावी, असेंहि वाटत असे. डॉक्टरांनीं मि. सरवटे काय करतात असें एकदां विचारतांच नर्मदाबाईंनीं पुढीलप्रमाणें हकीकत सांगितली.

“ स्वामि विशिखानंद ” या नांवाचे जे स्वामी धर्मप्रचार करीत आहेत तेच माझे पति होत. आमचें लग्न झाल्यानंतर चारपांच वर्षांनीं आमचे श्वशुर निवर्तले आणि संसार आमच्या पतींवरच पडला. पति सरकारी नौकरी पहाण्याच्या नेहमीं खटपटींत असत; पण त्यांना सरकारी नौकरी मिळालीच नाहीं. पुढें त्यांनीं एका व्यापाऱ्याची एजन्सी घेतली, आणि मध्यप्रांताभर प्रवास केला. मध्यप्रांतांत प्रवास करतां त्यांच्या कांहीं ओळखी झाल्या. त्यांतच त्यांची एका मास्तरणीशीं ओळख झाली. तिला साठ रुपये पगार मिळत होता. ती विधवा होती आणि ती व तिची आई अशा दोघीजणी जबलपूरला रहात असत. आमच्या पतीचा तिच्याशीं स्नेह वाढण्यास तिच्या आईनें उत्तेजनच दिलें. माझे पति तिच्या

कडेच वारंवार उतरूं लागले. आणि ती सत्कारपर असल्यामुळें महिन्यांचे महिने काम न करतां माझे पति तेथेंच पडून असत. त्यांचा स्वतःच्या घराशीं संबंध कमी होऊं लागला. मी आणि सासूबाई दोघीजणी सागरला रहात होतों. आम्हांला घरखर्चाला अनेक अडचणी पडूं लागल्या. पतींना लिहावें तर त्यांनीं उत्तरच देऊं नये, असें होऊं लागलें तेव्हां शेवटीं मी कोठेंतरी नौकरी धरावी, अशा हेतूनें तेथील एका इस्पितळांत नर्सचें काम शिकण्यासाठीं म्हणून मीं नौकरी धरली. प्रथमतः आठ रुपये मिळत असत, पण मी आणि सासूबाई कशातरी त्यांत रहात होतों. मी चार वर्षांनीं मिड वाईफ् आणि नर्स म्हणून पंचवीस रुपये पगारावर काम करीत होतें. माझें मूळचें राहाणें इंदूरचें आणि त्यामुळें माझें लग्नदेखील उत्तरेकडेसच झालें. मी जरी तीस रुपये मिळवीत होतें तरीदेखील माझ्या पतींचें लक्ष माझ्याकडे लागेना. त्यांना त्या विधवा मास्तरणीचीच संगति अधिक आवडत होती. मला पतींचा पुष्कळ राग येई. तथापि तरीदेखील त्यांस टाकून न देतां त्यांस आकर्षण करण्यासाठीं आपण पराकाष्टेचा प्रयत्न करावा असें मला वाटे. त्यांचें मजवर प्रेम नव्हतें. पण माझें प्रेम त्यांजवर घट्ट होतें. त्यांनीं कांहीं जरी अपराध केले तरी देखील त्यांनीं मला एक कार्ड घालून पाताळांत बोलावलें असतें तरी मी तेथें गेलें असतें. तथापि माझ्या प्रेमाची त्यांस किंमतच नव्हती.

त्या मास्तरणीचा मला राग येत असे. एकदां जबलपुरास जाऊन मी तिला न-कळत पाहूनही आलें. तेव्हां तिचें सौंदर्य मला नवऱ्यापासून कायमचें दुरावूं शकेल असें वाटलें नाहीं. असें असतां नवरा तिच्याकडे कां आकर्षिला जातो याचा विचार पडला. मी परत सागरला आलें, आणि कांहींतरी विचार केल्यानंतर मला असें वाटलें कीं, नवऱ्यास निरुद्योगीपणा हवा असून देखील अधिक सुखानें आयुष्य-क्रमण करण्याची इच्छा आहे. सासूबाईंबरोबर माझा विचारविनिमय झाला. सासू-बाईंनीं सांगितलें कीं "ती मास्तरीण आहे; तेव्हां ती दुसऱ्या बाईच्या नवऱ्याला नादीं लावणारी आहे आणि वाईट वागणुकीची आहे असें तिच्या अधिकाऱ्यांना कळलें तर तिची नोकरी जाईल असें तिला सांगावें आणि तिच्यापासून तूं आपल्या नवऱ्याला येणेंप्रमाणें सोडीव."

सासूबाईंचें म्हणणें मला बरोबर वाटलें आणि ती युक्ति अंमलांत आणण्याच्या इच्छेनें मी पुन्हा जबलपुरास गेलें. आणि तेथें एकदम त्या बाईच्या शाळेंत गेलें. त्या

बाईचें नांव लक्ष्मीबाई अभ्यंकर होतें. म्याट्रिक पास झाली होती. मास्तरणीचें सर्टि-फिकिट तिनें मिळवलें होतें. आणि त्यामुळें तिला साठ रुपये पगार असून तो सवाशें दीडशेंपर्यंत चढण्याचा संभव होता. लक्ष्मीबाई अभ्यंकरला शाळेंतच गांठावें आणि तिची चांगली भंबेरी उडवावी असें माझ्या मनांत होतें. पण तो हेतु सिद्धीस गेला नाहीं. मी शाळेंत गेलें. लक्ष्मीबाईस भेटलें; मी कोण याची चौकशी केल्यानंतर "मी नर्मदाबाई सरवटे. तुमच्याकडे जे पाहुणे उतरतात त्यांची पत्नी." असा जवाब दिला. तेव्हां लक्ष्मीबाई घाबरली नाहीं, तर स्मितयुक्त तऱ्हेनें आणि मर्जींतून उतरलेल्या स्त्रीपुढें नवऱ्याच्या मर्जींतली बायको ज्याप्रमाणें आढ्यतेच्या औदार्यानें वागते त्याप्रमाणें ती बोलूं लागली. ती मला म्हणाली "आपण येथें येऊन मला भेटलां हें चांगलें केलें. थोडक्या वेळानें शाळा सुटणार आहे मग आपण घरींच जाऊं. आम्हां सर्व मंडळींना तुम्ही आल्यानें आनंद होणार आहे. आपले यजमान आज घरीं नाहींत ही गोष्टदेखील एक तऱ्हेनें बरीच आहे." लक्ष्मीबाईच्या स्मितयुक्ततेनें आणि औदार्याच्या भाषणानें मला किती राग आला म्हणून तुम्हांला सांगूं ! पण मी निमूटपणें तिच्या घरीं गेलें. माझ्या मनांत तिच्या झिंजोट्या धरून ओढावयाच्या होत्या. पण तिच्या शाळेंत अनेक मंडळीच्या समक्ष झिंजोट्या ओढण्याचें धैर्य मला झालें नाहीं. आम्हीं घरीं गेलों, आणि परिणाम एकदम सांगावयाचा झाल्यास असें सांगतां येईल कीं, भांडण थोडका वेळ करून शेवटीं तहनामा केला.

"तहनामा ?" डॉक्टरांनीं आश्चर्ययुक्त शब्दांनीं म्हटलें.

"होय" त्याला तहनामाच म्हटलें पाहिजे. जी गोष्ट होत होती तीस मला संमती द्यावी लागली."

"म्हणजे ?" नोकरी जाण्याची भीतीची मात्रा लागू पडली नाहीं काय ?"

"मुळींच नाहीं. ती चांगली शिकलेली बायको. कायदे जाणणारी पडली. दुसऱ्या बायकोच्या नवऱ्याचा अपहार करून देखील तो कायदेशीर करणारी आहे असें मला दिसून आलें."

"तें कसें ?"

आम्ही दोघीजणी तांग्यांतून घरीं गेलों. तांग्यांतच संभाषण चाललें होतें. आणि " माझे यजमान मनोहरपंत यांस आपण थारा देऊं नये. त्यांना घरीं जाऊं द्यावें. पाहुणे म्हणून राहण्याचा आग्रह करूं नये.' एवढ्याच बोलण्यानें सुरवात झाली. तिच्यावर नीतिभ्रष्टतेचा आरोप मीं प्रथम केलाच नाहीं."

लक्ष्मीबाईनीं उत्तरादाखल सांगितलें कीं, " मी त्यांना राहाण्याचा आग्रह करीत नाहीं. तेच रहातात त्याला मी काय करूं. तुम्हींच त्यांना सांगावयास हवें होतें. त्यांना सर्व कुटुंब पोषण करण्याचें सामर्थ्य नाहीं, म्हणून तुम्हांला कांहींतरी पैसे पाठवावे आणि आपला स्वतःचा खर्च बाहेरच्या बाहेर काढावा अशी त्यांची इच्छा आहे असें दिसतें." लक्ष्मीबाई उत्तरल्या.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तांग्यांतलें संभाषण अगदीं वरवर चाललें होतें. आपण एकेरीवर यावयाचें नाहीं, आणि तांगेवाल्याला तरी निदान तमाशा दाखवावयाचा नाहीं, असें मनास वाटत होतें.

घरीं पोंचल्यानंतर संभाषण जोरांत आलें. सर्व सांगण्यांत अर्थ नाहीं. " तुम्ही माझ्या नवऱ्याला भुलविलें आहे, त्यांच्याशीं तुमचा वाईट संबंध आहे आणि तुम्ही जर त्यांना सोडणार नाहीं, तर मी शाळाखात्यांत ही गोष्ट कळवीन आणि तुमची नाचक्की होईल." इत्यादि गोष्टी मीं तिला सांगितल्या. लक्ष्मीबाईनीं उलट उत्तर दिलें कीं, " तुम्ही आतां मजवर भलभलते आरोप करावयाला लागलां तर तुम्हांस सांगावयास हरकत नाहीं, कीं तुम्हीं खुशाल शाळाखात्याकडे तक्रार करावी. मी उलट माझी नालस्ती केल्याबद्दल तुमच्यावर फौजदारी करीन. तुझ्या नवऱ्याचा आणि माझा स्नेह आहे पण अनीतीचा संबंध नाहीं, हें सांगेन आणि त्यावरोबर हेंही सांगेन कीं आमचा लग्न करण्याचा उद्देश आहे. हिंदूस दोन बायका करावयाची मोकळीक आहेच तर माझें तें सांगणें गैर होणार नाहीं. पण तुम्हीच पंचाइतींत पडाल आणि तुमचीच फजिती होईल." लक्ष्मीबाई हें सर्व बोलणें अगदीं शांतपणें बोलली आणि मला चपापल्यासारखें झालें. या तऱ्हेचें तिचें उत्तर येईल अशी मला कल्पनाच नव्हती.

लक्ष्मीबाईचें हें उत्तर ऐकतांच मी एकदम स्तब्ध झालें, व पूर्ण पराभूत झाल्यासारखें मला वाटलें. तेथें एक आरामखुर्ची होती, तिच्यावरच मी पडलें. थोड्या वेळानें तिची आई ठमाबाई फणसे तेथें आली. आई मजकडे कौतुकानें पण सदय

वृत्तीनें पहात होती. ती मला म्हणाली, मुली मी बोलतें त्याचा राग मानूं नकोस. मी तुझ्या आई सारखी तुला आहें हें तूं समज. माझ्या मुलीचा संसार वैधव्यानें बिघडला तो पुन्हां नीट करावयाचा प्रयत्न ती करीत आहे. त्या प्रयत्नांत जरी तुझा संसार बिघडल्यासारखें तुला वाटत आहे, तरी मी तो बिघडूं देणार नाहीं. जें काय झालें आहे तें चांगल्यासाठींच आहे असें तूं समज. लग्नाचा बाजार विचित्र आहे. श्रीमंत आणि मिळवत्या वर्गांत नवऱ्या मुलाला शेंकडों मुली सांगून येतात तर गरीब तरुणांचीं लग्नेंच होत नाहींत! तुझें व तुझ्या नवऱ्याचें लहानपणीं लग्न झालें तें झालें. त्यानें या परिस्थितींत लग्न करावयाचें म्हटलें तर तें जमायचें नाहीं. फार काय तूं जर लग्नाशिवाय असतीस आणि तुला नवरा पसंत करावयाचा असता, तर तूं या परिस्थितींतला नवरा पसंत केला नसतास! आज ज्यांना सरकारी नोकरी नाहीं असे कितीतरी तरुण लग्नाशिवाय हिंडत आहेत! त्यांच्याशीं लग्न लावायला विधवादेखील तयार होत नाहींत. त्या म्हणतात कीं, त्यांच्यापाशीं आहे काय? विधवा जर मिळवत्या असल्या तर त्या म्हणतात कीं, मी स्वतंत्रता कां घालवावी? आतां नोकरीशिवाय जे पुरुष असतात ते शरीरानें धडधाकट नसतात असें नाहीं; पण त्यांची परीक्षा पास झालेली नसते म्हणून म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा त्यांना नोकरी लागत नाहीं. कांहीं धंदा करून ते बायकोचें पोट भरूं शकतात. पण पुष्कळ तरुणमंडळी आपलें कर्तव्य चुकविणारी असते. अशांपाशीं कसें वागायचें हा बायकांना प्रश्नच असतो. बायका दृष्टिआड झाल्या म्हणजे बायकोचें पोट भरण्याची जबाबदारी त्यांस भासत नाहीं. तुझ्या नवऱ्याची गोष्ट तशीच आहे. त्याला नोकरी लागली नाहीं तर त्याचा निभाव सागरमध्यें कसा लागणार? आतां तूं मिळवती झालीस तर त्याच्या मागची तीही फिकीर गेली. बायकोनें मिळवती होणें म्हणजे नवऱ्याला नालायक बनण्याला संधि देणें आहे. ती संधि तूं आतां दिली आहेस. आतां तूं हें पक्कें समज कीं नवरा इतःपर धंदा उद्योग करण्याची फिकीर करणार नाहीं. येथून घालवून देण्याचा प्रयत्न तूं करशील तर तो दुसरीकडे कोठें जाईल आणि मधून मधून तो सागरला परत येईल. त्यानें कांहीं उद्योगधंदा करावा म्हणून तूं पिरपीर लावलीस तर तो होय म्हणेल आणि उद्योग पहाण्याच्या निमित्तानें घराबाहेर पडेल. दुसऱ्या कोणाच्याकडे पाहुणा राहील आणि तूं परत बोलावलेंस म्हणजे परत येईल. म्हणजे तुला भटकणारा नवरा पोसावा लागेल! आणि अशा नवऱ्याला पोसावयाचें म्हटलें म्हणजे तुझा पगार तुला पुरावयाचा नाहीं. तर आतां

मी तुला असें सांगतें कीं आपल्या घरखर्चाला नवऱ्याकडून एक दिडकीही मिळेल अशी अपेक्षा करूं नकोस. तुझे पैसे तो फार उडवीत नाहीं एवढ्याकडेसच तूं लक्ष दे. नवरा जर पोसावयाची जबाबदारी बायकोवर कायमची पडणार असेल, तर बायकोनें विचार करावा कीं नवऱ्याला पोसण्याचा खर्च एकाच बायकोनें करावा कीं दुसरी एक बायको मदतीला असलेली बरी; तूं या दृष्टीनें पहा. सर्वच पुरुष पैसे मिळविणारे नसतात; आणि जे पैसे मिळविणारे असतात त्यांच्या बायका सुखानें संसार करतात असें नाहीं. ब्राह्मणांची गोष्ट सोडून दे. इतर जातींत बायकोच्याच कमाईनें संसार चालला आहे आणि नवऱ्याचा पैसा घरखर्चाकडे येत नाहीं, तर तो दारूंत जात आहे, असें वारंवार दिसून येतें. आणि अशा बायका देखील सुखानें संसार करतात.

या फणसे बाईचें हें व्याख्यान ऐकून मी थक्क झालें आणि जगाच्या खऱ्याखुऱ्या व्यवहाराशीं या बाईला पुस्तकें लिहिणारे, व्याख्यानें देणारे जे तत्त्ववेत्ते असतात त्यापेक्षां कांहीं तरी जास्त माहिती आहे असें वाटूं लागलें. आणि ती जें बोलली तें म्हणणें स्वीकारावें आणि तिच्या मुलीला माझ्या नवऱ्याशीं लग्न लावण्यास मुभा द्यावी असेंही वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. थोडक्यांत सांगायचें म्हटलें म्हणजे मीं तिचें म्हणणें कबूल केलें आणि थोडक्याच दिवसांनीं लक्ष्मीबाई अभ्यंकर हिचा माझ्या नवऱ्याशीं पुनर्विवाह झाला. लक्ष्मीबाईसंबंधानें एवढें सांगितलें पाहिजे कीं, तिनें मजकडे नवऱ्यानें यावें याबद्दल आक्षेप कधींच घेतला नाहीं. उलट त्यानें नियमानें आमच्या गांवीं यावें याबद्दल तिची आई व ती या दोघीजणी दक्ष असत.

कांहीं दिवसांनंतर मीं सागर सोडलें आणि इंदूरला येऊन राहिलें. तेथें माझा भाऊ संस्थानी नोकरींत असल्यामुळें माझ्या बऱ्याच ओळखी झाल्या आणि माझी प्रॅक्टिसही चांगली जमली. पुढें कांहीं दिवसांनंतर लक्ष्मीबाई वारल्या. आणि त्यानंतर असें कळलें कीं, माझ्या नवऱ्यानें संन्यास घेतला. आज ते स्वामी "विशिखानन्द" या नांवानेंच वावरत आहेत. ते इंग्लंडमध्यें किंवा अमेरिकेंत जाण्याच्या गोष्टी बोलत आहेत. परंतु आज त्यांच्याभोंवतीं शिष्य व शिष्यणी यांचा समुदाय बराच जमलेला आहे. आणि तेव्हांपासून ते मजकडे कधींच आले नाहींत. मी इंदुरास असतां तेथें एका विधुरानें मीं आतां कुंकूं पुसून टाकावें असा सल्ला दिला होता.

"नष्टे मृते" या श्लोकांतला तिसराच शब्द "प्रव्रजिते असा आहे; म्हणजे नवरा संन्यासी बनला तरी देखील त्याच्या बायकोनें दुसरा नवरा करावा" अशी शास्त्राची परवानगी आहे, असें त्यानें सांगितलें; परंतु आम्हां बायकांमध्यें तशी समजूत असलेली दिसत नाहीं. उलट नवरा जर संन्यासी झाला तर बायकोला आजन्म कुंकू लावण्याचा अधिकार आहे, अशी समजूत बायकांत पसरलेली आहे. तिला काय आधार असेल तो असो.

इंदुरास आल्यानंतर कांहीं दिवसांनीं बरींचशीं इंदूरकडचीं घराणीं पुण्यास येतात असें दिसून आलें. व त्यावेळेस असेंही दिसून आलें कीं पुण्यास जी इंदूर ग्वाल्हेरची मंडळी येतात, त्यांच्या बायकांस आपली नर्स इंदूरकडचीच असलेली बरी असें वाटतें. तेव्हां मीं असें ठरविलें कीं आपणही पुण्यास जाऊन राहावें, तेथें धंदा करावा, व महाराष्ट्र पहाण्याची संधी मिळवावी. अशा वेळेसच एक संधि देवानें व दैवानें आणून दिली. इंदूरचे सरदार तोफखाने यांची बायको बाळंतपणासाठीं पुण्यास जाणार होती, ती मला पुण्यास घेऊन आली, आणि यामुळें मी आज पुण्यास दिसत आहें."

तिचें कथानक संपल्यानंतर डॉक्टर म्हणाले कीं, "शिकल्यासवरलेल्या बायका देखील ज्याची पहिली बायको जिवंत आहे असा नवरा कसा पसंत करतात, याचें एक तऱ्हेचें मला गूढच होतें. तथापि आपण सांगितलेल्या कथानकावरून तें गूढ उकलणें थोडेंसें शक्य झालें आहे."

—×—

प्रकरण १३ वें.

## इन्स्पेक्टर खच्चे.

"समाजसुधारणेच्या गोष्टी जे लोक बोलतात, त्यांनीं आपलें आद्यशिक्षण फरास-खान्यांत येऊन घेतलें पाहिजे," असें रावबहादूर खच्चे पोलीस इन्स्पेक्टर हे वारंवार बोलत असत. त्या बोलण्याची सत्यता ज्यांना फरासखान्यांतील कांहीं देखावे पहा-

वयास मिळतील त्यांना सहज पटेल, आणि आपल्या सिद्धान्तांत कांहीं आलट-पालट करावी लागेल. ज्यांस ते देखावे पहावयास मिळाले नसतील त्यांस पुढें वर्णन केलेल्या देखाव्यांचें वर्णन मनोरंजक होईल. डॉ. घैसास यांच्या मतांत देखील रावबहादूर खच्चे यांच्या सान्निध्यानें बरीच पालट पडली.

कांट्यानें कांटा काढावा, "It takes a thief to catch a thief"—अशीं वाक्यें चोहोंकडे ऐकूं येतात. जे चोर चोरी करण्यांत हुषारी दाखवितात त्यांसच पोलीस-मध्यें नोकरी करण्यास उत्तेजन द्यावें; तसें केलें असतां त्यांची वागणूक सुधारेल, आणि लोकांचाही फायदा होईल, अशी इतर लोकांच्याप्रमाणें माझी देखील समजूत होती. पण या समजुतीवर विठू घोमण यानें मोठाच घाव घातला आणि माझ्या समजुतींत वेडेपणा किती आहे तें माझ्या नजरेस आणून दिलें.

विठू घोमण याची ओळख रावबहादूर खच्चे यांच्या मार्फतच झाली. विठू घोमण यानें मला दाखविलें कीं हुषार चोर म्हणून पोलीसला ठाऊक झाल्यानें, पोलीसमध्यें नोकरी मिळते अशी समजूत चोऱ्या करणाऱ्यांची होत आहे. तशी समजूत होणें हें समाजाला किती फायदेशीर आहे याचाहि लोकांनीं विचार करावा. विठूचें इन्स्पेक्टर खच्चे यांच्याशीं जें बोलणें झालें तें माझ्या समक्ष झालें आणि तें बोलणें माझ्या चांगलेंच लक्षांत राहिलें व तें बोधप्रदहि होतें. नोटा चोरणारा विठू घोमण याची ओळख ज्या रावबहादुरांनीं करून दिली त्या रावबहादुरांचीच वाचकवर्गाशीं प्रथम ओळख करून दिली पाहिजे.

रावबहादूर इन्स्पेक्टर खच्चे ही एक मोठी मनोरंजक व्यक्ति होती. निव्वळ मराठी शिक्षणाचा तात्त्विक ग्रंथांशीं अपरिचय असलेला तथापि व्यावहारिक माहितीनें भरलेला असें रावबहादुरांचें थोडक्यांत वर्णन होईल. माझी आणि इन्स्पेक्टर खच्चे यांची ओळख थोडीच होती. पुष्कळदां आगगाडींत आम्हीं बरोबरच प्रवास केला होता. ते स्पेशल ड्यूटीवर वारंवार जात होते. ते बोलके होते; त्यांना पुष्कळ गोष्टी सांगाव्याशा वाटत, आणि त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी माझ्या परिचयाच्या क्षेत्राच्या बाहेरच्या कथा म्हणून मी मोठ्या उत्सुकतेनें ऐकत होतों. माझ्या या सहानुभूतीच्या श्रोतृत्वामुळें त्यांना आपल्या गोष्टी आणखी सांगाव्याशा वाटत. त्यांनीं अभिमानानें सांगण्याजोग्या पुष्कळ गोष्टी होत्या यांत शंका नाहीं. त्यांना माझें श्रोतृत्व मिळे तें त्यांच्या कथांच्या मनोरंजकतेमुळेंच मिळे. आणि त्यांच्या

कथानकांत दुसरा एक गुण असा होता कीं, ते आपल्या हुषारीची कथा जितक्या मौजेनें आणि आनंदानें सांगत तितक्याच मौजेनें आपली चोरांनीं केलेली फजिती देखील वर्णन करीत.

पुण्यास मी फरासखान्यांत कधीं कांहीं कामानिमित्त गेलों तर त्यांची गांठ मधून मधून पडे. त्यांची गांठ पडली म्हणजे केवळ काम विचारून रवानगी न करतां ते बोलण्यांत गुंतवीत असत. सर्व प्रकारच्या मंडळीशीं आपली ओळख असावी असें त्यांसहि वाटत होतें. व याचें कारण मी लेखक आहें हें त्यांस ठाऊक होतें व हौशी लेखकांमध्यें ते स्वतःची गणना करीत. त्यांनीं कांहीं लावण्याहि केल्या होत्या. आणि त्यांची वही त्यांनीं एकदां मजजवळ दिली होती. त्यांनीं तयार केलेल्या लावण्या आज तमाशांतून शिरल्या आहेत असें समजतें. ते वाङ्मयाच्या धंद्यांत नव्हते पोलीसच्या धंद्यांत होते. तथापि त्यांच्या लावण्यांची "चहा" झाली असें जर त्यांना कळलें तर त्यांना मोठा आनंद वाटे. त्यांच्या एक दोन लावण्या जेव्हां तमाशांत प्रथम शिरल्या तेव्हां त्यांना बढती मिळाल्यासारखा आनंद झाला.

मी केवळ श्रोता नव्हतों. मधून मधून मी माझ्या अनुभवाच्या गोष्टी त्याच-प्रमाणें आपलें ग्रांथिक ज्ञान प्रगट करीत असें. व त्यामुळें ते माझें बोलणें लक्षपूर्वक ऐकत असत. रावबहादुरांनीं "क्रिमिनॉलजी" वरील इंग्रजी पुस्तकें वाचलीं नव्हतीं. आणि मीं डॉ. घैसास यांस वाचून दाखविण्याच्या प्रयोजनामुळें वाचलीं होतीं. त्यामुळें माझ्याशीं बोलणें कदाचित् त्यांस उपयुक्त वाटत असावें.

इन्स्पेक्टर खचे हे केवळ मराठी जाणणारे पण हुशार पोलीस अधिकारी होते. त्यांस आपल्या चोरी पकडण्याच्या कौशल्याबद्दल मोठा अभिमान वाटत असे. एवढेंच नव्हे तर पोलीस अधिकाऱ्यांत त्यांची याबद्दल ख्याती होती. पण त्याबरोबरच आपण आपलें कर्तव्यकर्म पूर्ण प्रामाणिकपणें करीत नाहीं, असें ते म्हणत. आपल्या हातून अगदीं प्रामाणिकपणें नोकरी होत नाहीं; कारण आपणांस जिवंत रहावयाचें आहे असें ते बजावीत. अगदीं प्रामाणिकपणें राहून पोलीसची नोकरी व्हावयाची नाहीं असें ते सांगत. आपण पैसे खावयाचे नाहींत एवढेंच होईल, पण जो मोठा अधिकारी पैसे खातो असें आपणांस ठाऊक असेल त्याच्याकडेच कानाडोळा करावा लागतो असें ते म्हणत. खाजगी बोलण्यांत मोठमोठी मंडळी देखील सुटत नसे.

पोलीस अधिकारी म्हणून आपला जो लौकिक झाला त्याची ते अशी मीमांसा करीत कीं, हा लौकिक चोरी पकडण्याच्या कौशल्यापेक्षां वरिष्ठांची चोरी आपल्या नजरेला पडली असतां ती पडलीच नाहीं असें दाखविण्यास जें औदार्य आणि आत्म-संयमन लागतें त्यामुळेंच झाला. "मी बेताबातानें प्रामाणिक होतों, म्हणूनच माझी प्रसिद्धि झाली, आणि मी नोकरींत टिकलों. जर मी अगदीं प्रामाणिकपणें वागलों असतों तर मी वेडा ठरून बाहेर पडलों असतों."

"सदावर्ते प्रकरण" म्हणून एका कोणत्यातरी प्रकरणाचा ते उल्लेख करीत. ते म्हणत कीं, पोलीस अधिकाऱ्यानें आपल्यापेक्षां वरचे अधिकारी मनुष्यच आहेत आणि त्यांना देखील पैसे खाण्याची आणि चालू असलेल्या चोरींत आपला भाग ठेवण्याची इच्छा असते; हें लक्षांत ठेवावें आणि त्यांसच जर पकडावयाचा आपण प्रयत्न केला तर आपण आपल्यापेक्षां फार मोठ्या शक्तिविरुद्ध संग्राम करीत आहों हें ओळखावें. प्रत्येक नेटिव्ह पोलीस अधिकाऱ्यास हें समजलें पाहिजे कीं आपलें काम आपली नोकरी संभाळणें हें आहे. लोकांचें संरक्षण हें दुय्यम प्रतीचें काम आहे. जो फार प्रामाणिक होईल त्याचा बैल रिकामा राहील आणि हें जो समजेल तोच नांवालौकिकास येईल. मोठे अधिकारी काय व्यवहार करतात हें समजून चालावें. त्याचें आपणास ज्ञान आहे याचा देखील आपण कोणास पत्ता लागूं देऊं नये. कारण हें ज्ञान ज्या छोट्या अधिकाऱ्याला झालें म्हणून वरिष्ठास समजेल त्याची उचलबांगडी होण्यास वेळ लागणार नाहीं असें रावबहादूर सांगत. आणखी असेंहि सांगत कीं, आपल्यापेक्षां मोठे अधिकारी पैसे कसकसे खातात हें ज्यांस ठाऊक असेल त्यांनीं हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, त्यांस पैसे चारणारी मंडळी देखील आपले वरिष्ठ आहेत, आणि हें जो विसरेल तो खास गोत्यांत पडेल. या गोष्टी त्यांना ज्या अनुभवानें समजल्या त्या तुमच्या इंग्रजी "क्रिमिनॉलजीच्या" पुस्तकांत लिहिल्या आहेत काय? म्हणून विचारीत आणि लिहिल्या नाहींत असें सांगितलें; म्हणजे ते म्हणत कीं, "त्या कशा लिहिल्या जातील?" तीं पुस्तकें पोलीसच्या अधिकाऱ्यांनींच लिहिलीं असणार! ते कशाला आपलीं खरीं रहस्यें जगापुढें मांडतील?"

आपण बेताबेतानें प्रामाणिक आहोंत असेंच ते सांगत. रावबहादुरांची गुन्हेगारवर्गासंबंधानें वृत्ति कशी होती हें सांगतां येत नाहीं. ती सामान्य लोकांपेक्षां निराळी होती हें मात्र खचित. गुन्हेगार म्हणजे कोणी दुष्ट लोक अशी त्यांची कल्पना नव्हती. रोज त्यांच्यांतच वागावयाचें, त्यांच्याशींच संबंध यावयाचा,

त्यामुळें रावबहादुरांची गुन्हेगारांविषयीं जुगुप्सा नाहींशी झाली होती. उलट दुकानदार ज्याप्रमाणें सामान्य जनता आपलें गिऱ्हाईक समजतो, त्याप्रमाणें ते गुन्हेगारवर्ग आपला जणूं काय दोस्तांतला पोटवर्गच आहे असें समजत असत. गुन्हेगारी म्हणजे काय याचें पृथक्करण केलें म्हणजे तिच्याविषयीं चिळस नाहींशी होते असें ते म्हणत. कायद्यांत फट असते, ती फट पाहून आणि बरोबर ओळखून जो डल्ला मारतो तो अर्थात् गुन्हेगार नाहीं. आणि जो ओळखीत नाहीं तो फसतो, म्हणजे गुन्हेगार ठरतो. त्याअर्थीं गुन्हेगारवर्ग म्हणजे व्यवहार करणाऱ्या मंडळींतील कमी सुशिक्षित वर्ग आहे एवढेंच, असेंहि ते म्हणत. गैरसावध मनुष्याशीं व्यवहार करतांना अधिक भाव लावून जास्त पैसे काढणारा व्यापारी, आणि तुम्ही गैरसावध पाहून तुमच्या खिशांतून दोन पैसे काढून नेणारा चोर, यांत फरक तो काय? यांत खरोखर फरक नाहीं. पण समाज फरक करतो. आणि याचें कारण आपण काय करतों याचा विचार समाज करीत नाहीं हेंच होय, दुसरें कांहीं नाहीं, असें रावबहादुरांचें मत होतें. त्यांना गुन्हेगार-वर्गाविषयीं नेहमीं सहानुभूति वाटावयाची. गुन्हेगार-वर्ग आपला खेळगडी वर्ग आहे आणि पोलीसखातें आणि गुन्हेगार मिळून एक लपंडावीचा खेळ खेळत आहों. गुन्हेगारानें पोलीसच्या हातावर टाळी देऊन पळावें आणि त्याच्यावर हार आली म्हणजे कांहीं दिवस येरवड्याला जाऊन बसावें, असा हा खेळ आहे. या खेळांतला एक पक्ष पोलीस आहे तर दुसऱ्या पक्षाला "गुन्हेगार" म्हणण्याची पद्धत आहे. आम्ही पोलीस जर संभावीत आहोंत तर आमच्याशीं खेळ खेळणारे उचले, भामटे इत्यादि मंडळी काय वाईट झाली? चोरांनीं चोरी करावी, चोरीच्या मालापैकीं कांहीं माल विकून त्याचे पैसे करून खावे व उरलेला माल सांपडून देण्यासाठीं आम्हीं बक्षीस हबकावें. अशा तऱ्हेनें पोलीस आणि चोर हे दोघे मिळून लोकांपासून पैसे काढण्याचा धंदा करावयाचा आहे. दोघांनाहि गाफील मंडळीकडून पैसे खावयाचे आहेत.

**गाफिलका जो जो माल**
**अकलमंदका खुराक आहे**

हें वाक्य देखील त्यांच्या तोंडानें गुणगुणलेलं ऐकूं येई. अर्थात् गुन्हेगारवर्गामध्यें अधिकाधिक ओळखी ते करीत असत. त्यांनीं सजा झालेल्या पुष्कळशा गुन्हे-

गारांशीं दोस्तीच ठेवली होती. त्यांना ते स्वतःच्या खर्चानें देखील चहा व सिगारेटस् देत असत. अमुक जातीचे लोक दिवाळींत काय पक्वान्नें करतात, मुसलमान लोकांचे सण कोणते, पारशांचे सण कोणते हें ज्याप्रमाणें वाण्यांना ठाऊक होत असतें, त्याप्रमाणें गुन्हेगार जातीच्या मंडळींना केव्हां पैसे लागतात आणि त्या-करितां गाडून ठेवलेला माल ते पुन्हां काढतात, तें पोलीसला समजावून घ्यावें लागतें.

—×—

प्रकरण १४ वें.

## माझा शिक्षक विठू घोमण.

एके दिवशीं मी कांहीं तक्रार करण्यासाठीं फरासखान्यांत गेलों. इन्स्पेक्टर खच्चे जरा खुषींत होते. आणि त्याचें कारण त्यांस एक शेरास सव्वाशेर भेटला होता, त्याची त्यांना आठवण होत होती हें होय. त्यांच्याच टेबलांत दोनशें रुपये होते. त्यांची एका पोरानें चोरी केली होती. तो पोरगा सांपडला होता आणि त्यास फरासखान्यांत आणलें होतें. त्या पोराची आणि इन्स्पेक्टर खच्चे यांची मुलाखत होणार होती. त्या पोरानें चोरी केली पण ती मोठ्या अक्कल हुशारीनें केली, असें इन्स्पेक्टर खच्चे म्हणाले. चोरी केली ती त्यांच्या पैशाची नव्हती; ती सरकारी पैशाची होती, आणि त्यामुळें आपलें स्वतःचें कांहीं नुकसान झालें नाहीं. पण पोरानें आपली हुषारी दाखविली आणि आपल्यावरही मात केली, असें त्यांस वाटत होतें.

तो मुलगा इन्स्पेक्टर खच्चे यांच्यापुढें येण्यापूर्वींच त्याची थोडीशी गोष्ट त्यांनीं मला सांगितली ती अशी :—

हा मुलगा सतरा-अठरा वर्षांचा आहे. याचा बाप पोलीसमध्यें कॉन्स्टेबल आहे. मुलगा इंग्रजी तीन इयत्ता शिकून उनाडकी करावयास लागला; फरासखान्यांत कधीं

कधीं येतो. त्यानें प्रत्यक्ष फरासखान्यांत माझ्या टेबलांतील नोटांची चोरी केली. मीं ज्या टेबलांत नोटा ठेवल्या होत्या त्याला आंगचें कुलूप आहे. मी पांच मिनिटेंच खोलीच्या बाहेर गेलों होतों. त्या पांच मिनिटांत कुलूप लावून गेलों होतों, कीं उघडें ठेवून गेलों होतों तें आठवत नाहीं. पांच मिनिटांनीं आंत आलों. टेबलांतून कांहीं वस्तू हरवली असेल अशी मला कल्पनाही नव्हती. आणि मी तसाच पुढें दोनतीन तास काम करीत बसलों. दोन तीन तासांनीं टेबल उघडण्याचा प्रयत्न केला पण तें उघडेचना. त्या टेबलाला कुलूप लावलें होतें. आणि त्या कुलुपाच्या तोंडाला एका किल्लीचा पुढला तुटका भाग बसविलेला होता. त्यामुळें मीं किल्ली लाविली तेव्हां तो तुटका भाग आंत ढोंसला गेला, आणि माझी किल्ली आंत शिरेना. त्या दिवशीं मला टेबल उघडतां आलें नाहीं. पण काय झालें हेंदेखील समजलें नाहीं. मला असें वाटलें कीं, आपणच कुलुप लावलें आणि तें कुलुप आंत कांहींतरी अडकल्यामुळें उघडत नाहीं. तेवढ्या वेळांत कोणी येऊन गेलें असावें, अशी मला कल्पना देखील झाली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सुतार आणून तें टेबल उघडविलें, तेव्हां कुलुपाच्या तोंडाला किल्लीचा एक तुकडा अडकविलेला होता तो निघाला, आणि कुलुप उघडल्यावर खण उघडून पहातों तों आंत नोटा नाहींत; तेव्हां मात्र चोरी झाली आहे असें माझ्या लक्षांत आलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कॉन्स्टेबल घोमण यानें आपला मुलगा नापत्ता झाला आहे असें सांगितलें. तेव्हां त्यानेंच ते पैसे लांबवले अशी माझी खात्री झाली. लगेच मुंबईला तार केली. चार दिवसांत मुलगा सांपडला. तो ऐटीनें विठ्ठलराव घोमण हें नांव देऊन अनंताश्रमांत राहिला होता. त्यानें ते दोनशें रुपये जवळ जवळ उडवलेच होते. कपडे, नाटकें, आणि कांदेवाडींतल्या बायका यांवर पैसा खर्च केला. त्याला आतां पकडून आणलें आहे.

"पैसे कुणाचे होते?" मीं विचारलें.

"पैसे सरकारी होते, आणि सरकारी कामासाठीं त्या दिवशींच मुद्दाम आणले होते." रावबहादुरांनीं उत्तर दिलें.

"तुम्ही या मुलाला काय करणार?"

"काय करावें लागेल तें लागेल."

आमचें हें बोलणें चाललें आहे तों विठ्ठल घोमण यांस रावबहादुरांपुढें आणलें. विठ्ठल घोमण तेथें आला तेव्हां त्यानें आम्हां दोघांना सलाम केला.

विठ्ठल घोमणच्या तोंडावर भीतीचा लवलेशही दिसत नव्हता. उलट हास्यमुख दिसत होतें. आपण जी कांहीं कामगिरी केली तिचे अगदीं स्वाभाविक आणि अपेक्षित असेच परिणाम घडत आहेत आणि ते परिणाम देखील आपण मौजेनें पहावे या प्रकारची त्याची वृत्ति झालेली दिसत होती.

रावबहादुरांना त्याची ती आनंदी वृत्ति पाहून काय बोलावें हें समजेना. हंसू दाबण्याचा प्रयत्न त्यांना जरासा कठीण वाटूं लागला, म्हणून ते कांहीं वेळपर्यंत बोललेच नाहींत. शेवटीं आत्मसंयमन करून त्यांनीं रागावण्याचा आव घातला आणि म्हटलें, "कायरे, तुझा बाप पोलीसांत नोकर आणि तूं चोरी केलीस त्याचें तुला कांहीं वाटत नाहीं?"

"कांहींएक वाटत नाहीं." विठू शांतपणें म्हणाला.

"पण यानें तुझ्या बापाची नोकरी जाईल ना?"

"मीं चोरी केली तर बापाची नोकरी काय म्हणून जाईल? चांगला न्याय!"

"अरे मुलगा चोर होतो यावरून बापाची घरची शिकवणूकच वाईट आहे असें धरलें जाईल."

"मला कांहीं सांगूं नका. माझ्या बापाची नोकरी माझ्यामुळें जात नाहीं, हें मला ठाऊक आहे; आणि माझी चोरीदेखील सिद्ध व्हावयास पाहिजे."

"पण तुझी चोरी सहजच सिद्ध होईल."

"तुम्हीं कशी सिद्ध करणार? ज्या नोटा मीं वटवल्या त्या कोणत्या ठिकाणीं वटवल्या हें तुम्हांस ठाऊक नाहीं. आणि त्या नोटांचे नंबर देखील तुमच्यापाशीं होते कीं नाहीं कोण जाणे. मला वाटतें कीं तुम्हांला त्या नोटांचे नंबर घ्यावयाला वेळच मिळाला नसावा. तुमच्या नोटा मजजवळ आल्या हीच गोष्ट तुम्हांला सिद्ध करतां येणार नाहीं."

"चोरी सिद्ध करतां येईल किंवा नाहीं ही गोष्ट निराळी, पण ही गोष्ट चांगली आहे काय?"

"गरीब लोकांच्या पैशाची चोरी करूं नये." असें मी समजतों.

"अरे गरीब श्रीमंत ही गोष्ट विचाराची नाहीं. तुला चोरी करण्याचें कांहीं वाटतच नाहीं काय?"

" मीं गरीब रयतेची कोठें चोरी केली ? सरकारची चोरी केली, एवढेंच तुम्ही म्हणतां; पण केली असली तर त्यांत वाईट काय केलें ! तुम्ही अधिकारी लोक रयतेची चोरी करतां, रयत गरीब असते. मीं सरकारची चोरी केली. सरकार श्रीमंत आहे. सरकारला पैसे कमी पडले तर रयतेला चोप देऊन सरकार पैसे काढतें. तर मीं सरकारची चोरी केली यांत वाईट काय झालें ?"

" पण अशानें तुरुंगांत जाशील ना ! "

" मग त्यांत माझें काय बिघडेल ? माझ्या बापाचा पैसा वांचेल. आणि मला स्वच्छ हवा मिळेल. मी येरवडा पाहिला आहे. सरकार जेवढी कैद्याची काळजी घेतें तेवढी रयतेची कोठें घेतें ? "

हें त्याचें वाक्य ऐकल्यानंतर रावबहादूर मजकडे वळून म्हणाले, " पहा पोरगा काय म्हणतो तें ! उत्तर आहे का तुमचें त्यावर कांहीं ! "

मीं त्यांस म्हटलें कीं " तुरुंगाची हवा चांगलीच असावयाची. तुरुंग स्वच्छ ठिकाणीं असले पाहिजेत. हवेचा प्रश्न नाहीं. पण तुरुंगांत जें अन्न असतें...... "

रावबहादूर खर्चे यांनीं मला बोलूं दिलें नाहीं. ते म्हणाले " कैद्यांना जें अन्न मिळतें तितकें तरी हिंदुस्थानच्या गरीब रयतेला मिळतें असें वाटत असेल तर तो तुमचा भ्रम आहे."

" तुरुंगाच्या लोकांना जें मिळतें तितकें हिंदुस्थानच्या रयतेला मिळत नाहीं ? " मीं विचारलें.

" अगदीं खरें आणि जर कागदी हिशेब पाहिला तर खरोखरच कैदी मंडळी सरकारची लाडकी असें म्हटलें पाहिजे. येरवड्याच्या तुरुंगांत प्रत्येक माणसागणिक दूध किती खर्च झालें आणि एकंदर खर्च काय झाला, याची चौकशी करा आणि तें वर्तमानपत्रांत छापा, आम्ही सरकारी नोकर आहोंत आम्हांला बोलतां येत नाहीं."

" काय तुरुंगांतील राहाणी सामान्य नागरिकांच्या राहाणीपेक्षां अधिक सुखकर असते ? "

" तें या मुलाला विचारा. " असें म्हणून ते पुन्हां विठू घोमणकडे वळले.

" काय रे तुला पोलीस खात्याची आणि तुरुंगाची माहिती तरी किती आहे ? "

" मला लट्ठ पगार खाणाऱ्या दिवाणांपेक्षां जास्ती आहे. तुरुंग म्हणजे पैसे खाण्याचें एक स्थान आहे. त्यांतले ढेंकूण मारायला देखील पांच पांच हजार रुपये

मंजुर होण्यासाठीं कौन्सिलापुढें येतात. तुरुंगाच्या पैशांची चोरी कशी होत आहे हें मी जाणतों. मला तुरुंगावरचे अधिकारी कांहीं करूं शकणार नाहींत. त्यांचीं बिंगें मला माहित आहेत. मी तुरुंगांत गेलों तरी आंतल्या आंत मी शिरापुरीचें जेवण जेवीन; आणि मला तें निमूटपणें मिळेल."

"मग तुला आम्हीं तुरुंगांत पाठवावें?"

"तुरुंगांत जावें कीं नाहीं हा माझा विचार अजून ठरला नाहीं, पण तुम्हीं तुरुंगाची भीति आम्हांला दाखवूं नये."

याप्रमाणें आपण दाखवावी ती कोणतीच भीति लागू पडत नाहीं असें जेव्हां रावबहादुरांच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्याला त्याच्या भवितव्याची भीति घालून तरी घावरवावें हा विचार त्यांच्या मनांत आला. ते म्हणाले, "तर मग तुरुंगाची भीति तुला मुळींच वाटत नाहीं?"

"त्यांत भीति काय वाटावयाची? दोन महिने तुरुंगाबाहेर तर दोन महिने तुरुंगांत."

"पण अशानें तुझें आयुष्य अगदीं खराब होऊन जाईल. तुला कोणी नोकरीला ठेवणार नाहीं. मग तूं पोट कसें भरशील? जन्मभर तूं काय चोरीच करणार?"

"मला कांहीं जन्मभर चोऱ्या कराव्या लागत नाहींत. मला पोलिसांत नोकरी तेव्हांच मिळेल. मी पोलीस खात्यांत चोरी केली तर माझ्या हुशारीचा पुरावा पोलीसच्या दप्तरीं राहील."

रावबहादूर खचे हे त्याच्याकडे पाहात असतां गंभीर मुद्रा धारण करून बोलत होते. पण 'दप्तरी पुराव्याचें' त्यांना देखील हसूं आल्याशिवाय राहिलें नाहीं. ते म्हणाले, "चोरी सिद्ध झाली तर तुला चोर म्हणून नोकरीला कुणीं ठेवणार नाहीं. आणि चोरी सिद्ध झाली नाहीं तर तुझी चोरीची हुषारीच सिद्ध होणार नाहीं. तर मग पोलीसची नोकरी कशी मिळेल?"

"मीं चोरी केली याबद्दल पोलीसची खात्री झाली आणि मॅजिस्ट्रेटची झाली नाहीं तर ती नकोच व्हायला असें मी म्हणेन. नोकरी मॅजिस्ट्रेटकडे मागायला जात नाहीं पोलीसकडेच जाणार. मीं चोरी केली याबद्दल तुमची खात्री जितकी आहे तितकीच तुम्हांला ती सिद्ध करतां येणार नाहीं, याबद्दल माझी खात्री आहे." विठू म्हणाला.

"अरे, आम्हांला सिद्ध करतां येणार नाहीं काय? आणि पुरावा सांपडणार नाहीं काय? तुला चौदावें रत्न दाखवलें म्हणजे पुरावा पुरा बाहेर पडेल."

इतक्यांत विठू घोमण माझ्याकडे वळून म्हणाला "फौजदार साहेब काय म्हणतात तें ऐका. हे मला मार देऊन माझ्याकडून पुरावा काढणार. त्यांनीं मला मार देऊन माझ्याकडून वाटेल तें लिहून घेतलें किंवा कबूल करून घेतलें तर तुम्हांला साक्षीला यावें लागेल. मला मार देण्याचा यांचा इरादा तुमच्या समक्ष यांनीं कबूल केला आहे. मार चुकविण्यासाठीं मीं चोरीची खोटी कबुली दिली असें मी मॅजिस्ट्रेटला सांगणार. मार देण्याची यांनीं मला तुमच्या समक्ष धमकी दिली आहे. तुम्ही मात्र पोलीसची मेहेरबानी होण्यासाठीं हें नाकारूं नका, आणि खोटी साक्ष देऊं नका."

रावबहादूर खचे यांना आपणांसच या पोरानें पकडलें असें वाटलें असें दिसलें. ते माझ्याकडे पहातच राहिले. जणूं काय तुम्ही असली साक्ष कांहीं देऊं नका असेंच त्यांचे डोळे म्हणत आहेत, असें मला वाटलें.

"अरे चैनीनें मुंबईच्या हॉटेलांत राहण्यास व नवे सूट करण्यासाठीं तुझ्यापाशीं पैसे कसे आले हें तुला सांगावें लागेल."

"मीं सांगितलें नाहीं तर?"

"तर तूं चोरी केलीस हें सिद्ध होईल!"

"तें कसें?"

"तूं पैसे वाईट मार्गानें जर मिळवले नाहींस तर मग लपविण्याचें काय कारण?"

"अहो, जे पैसे कसे आले हें सांगण्याची चोरी असते ते पैसे चोरीनेंच आलेले नसतात. आणि समजा, मीं दोन चोऱ्या केल्या असल्या आणि दुसऱ्या चोरीची तुम्हाला महितीच नसली म्हणजे त्या चोरींत पैसे मिळाले म्हणून सांगावें म्हणजे एक चोरी सिद्ध होणार नाहीं आणि दुसऱ्या चोरीबद्दल शिक्षा व्हावयाची भीतीच नाहीं; कारण तो कबुलीजबाब आपखुषीनें चालू खटल्यांत न्याय व्हावा म्हणून दिला असें होईल."

"रावबहादूर खचे यांनीं कबूल केलें कीं पंचवीस वर्षे नोकरी केली पण असा बिलंदर पाहिला नाहीं."

मला तेथें बसण्यास वेळ नव्हता, पण तीनचार दिवसांनीं मी नाटकाला गेलों तेव्हां विठू घोमण ऐटीचा पोषाख करून नाटक कंपनीचें नाटक पहाण्यास आलेला दिसला. आणि नाटक कंपनी ज्याप्रमाणें अगदीं फाटक्या पोलीसच्या मनुष्याला सन्मान्य जागेवर बसूं देते, त्याप्रमाणें विठू घोमण हा पोलीसचा मनुष्य म्हणून अत्यंत सन्मान्य जागेवर बसला होता. आणि मला तेथें पाहून उठून उभें राहून त्यानें स्मितपूर्वक सलाम केला.

—×—

प्रकरण १५ वें.

## नाशिकची सफर.

रिकामपणाच्या दिवसांमध्यें चार गांवें हिंडून यावीं अशी इच्छा झाली. त्या वेळेस आपण कोठें जावें असा विचार करतां करतां नाशीक येथें जावें असा विचार ठरला. कारण येथें जाण्यायेण्याचें तिकिट बऱ्याच स्वस्त दरांत त्यावेळीं रेल्वे कंपनी देत होती. त्यांत उन्हाळ्याचे दिवस होते. उन्हाळ्याचे दिवसांत नाशिकची हवा थंड म्हणून कित्येक मंडळी नाशकास जात. नाशकास जावयाचें म्हणजे उतरावें कोठें हा प्रश्नच नको. फॅशनेबल लोकांची गोष्ट निराळी. पण आमच्यासारख्या लोकांस गांवांत उतरणें गैरसोईचें होत नव्हतें. नाशकास येणाऱ्यास उतरून घेऊन त्याची सोय लावणारा असा वर्ग तेथें असतो. तो म्हटला म्हणजे क्षेत्रोपाध्यांचा होय. तुम्ही नाशकास जाण्याची मेहरबानी केलीत एवढ्याबद्दल तुमचा हस्तलेख जपून ठेवणारा, आणि तुमचा संबंध तुमच्या पूर्वजांशीं दाखवून तुमची आणि तुमच्या नातेवाइकांची माहिती पुढच्या पिढीसाठीं राखून ठेवणारा वर्ग हाच. यामुळें या वर्गाविषयीं मला अत्यंत सहानुभूति वाटते. मी नाशकास गेलों. क्षौर केलें. वडिलांचें श्राद्ध आणि ब्राह्मणभोजन हीं सर्व दहा रुपयांत केलीं. आणि त्या उपाध्यायांच्या वह्यांवर माझा हस्तलेख दाखल केला. आणि उपाध्येबुवांपासून आपली सात पिढ्यांची माहिती घेतली. याशिवाय दीड दोन दिवस उपाध्यायांच्याकडे जेवण्याराहाण्याची सोय झाली ती निराळीच. या सर्व गोष्टी दहाबारा रुपयांत झाल्या. आणि तेव्हांपासून मनाला असें वाटूं लागलें कीं आपण कोठें

क्षेत्राला गेलों तर तेथील क्षेत्रोपाध्यायांच्या तावडींत हटकून सांपडावें. या क्षेत्रोपाध्यायांच्या उपयुक्ततेविषयीं माझ्या मनांत फार आदर असे. तो नाशकास गेल्यानें कमी झाला नाहीं. तथापि त्याबरोबर असेंहि दिसून आलें कीं वरेच क्षेत्रोपाध्याय आपला धंदा सोडून देत आहेत, व दुसऱ्यास आपली वृत्ति विकून मोकळे होत आहेत. क्षेत्रोपाध्यायांची गरिबी दृष्टीस पडली. त्याप्रमाणेंच कांहींची श्रीमंतीहि दृष्टीस पडली. पैशानें श्रीमंती पण रहाणें गरीबीचें असाच प्रकार दिसला. तेथील गर्गे, गायधनी वगैरे अनेक यजुर्वेदी क्षेत्रोपाध्यायांची माहिती झाली. आमचे क्षेत्रोपाध्याय उपासनी हे देखील यजुर्वेदीच होते. त्यांच्याकडे असतां एक मजेदार प्रकार नजरेस आला. आमच्या उपाध्यायांचा बाबुराव नांवाचा एक पुतण्या निम्म्या उत्पन्नाचा मालक होता, पण त्यानें उपाध्येपणाची कारवाई आपल्या चुलत्याकडे सोंपविली. आपण त्या भानगडींत पडतच नसे. आपल्या वांटणीस आलेल्या कुळांची वृत्ति देखील आपल्या चुलत्यानें करावी व निम्मे पैसे आपणांस द्यावे अशी त्याची व्यवहारपद्धति असे. हा पुतण्या इंग्रजी शिकलेला, कॉलर, टॉय घालणारा आणि पाटलोणीच्या खिशांत हात घालून सिगारेट ओढतांना दृष्टीस पडत असे. हा कुळें गांठीत असे. याची वही नेण्यास एक परिचारक लागत असे; आणि तोच परिचारक त्याच्या गैरहजेरींत कुळें गांठी. बाबुराव उपासनी कुळें गांठल्यावर पैशांचा ठराव करी आणि मग तीं कुळें आपल्या चुलत्याच्या हवालीं करी. व मग गांवांतून 'जंटलमन' म्हणून हिंडे. हा मधून मधून मुंबईस जावयाचा; परंतु हा मुंबईस जाऊन काय काम करी हें मात्र कोणास ठाऊक होत नसे. मुंबईस जाऊन पुष्कळ पैसे घेऊन येत असे. त्यानें आपल्या मुंबईच्या खेपांत शंभर, दोनशें रुपये आणावेत आणि त्यांचे दागिने करून बायकोच्या अंगावर घालावेत, अशी बहादुरी केल्याचा लौकिक होता. पैशाबरोबर मतस्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणा आलीच. मुंबईच्या स्त्रियांसारखा पोषाख करावयाला आपल्या बायकोला शिकवून तो बायकोसह इकडे तिकडे हिंडतही असे. कधीं कधीं बायकोलाहि मुंबईला घेऊन जाई. एकदां बायकोसाठीं 'उंच टांचेचे बूट' घेऊन आला. एवंच क्षेत्रोपाध्याय मंडळींत तो अगदीं निराळ्या तऱ्हेनें रहाणारा म्हणूनच त्याच्या गैरहजेरींत त्याची बरीच चेष्टा होई. मला प्रथम त्याविषयीं मौज वाटली. पण कांहींतरी कारणामुळें याची एकंदर वागणूक सरळ नसावी, हा कांहीं वेड्यावांकड्या गोष्टी करीत असावा असें वाटूं लागलें. कारण लोक त्याला भीत असत. भिण्याचें कारण स्पष्ट झालें नव्हतें. एवढें बरीक खरें. पोलीसचे बरेचसे नोकर याचे मित्र आणि हा

कोणाला कसा खड्यांत घालील याविषयीं लोकांस भीति वाटत असे. कोणी कोणी बाबारे तूं पैसा कसा मिळवतोस? असा प्रश्न करीत, तेव्हां आपलीं इतकीं कुळें असतां आणि त्यांच्या बापजाद्यांची माहिती असतां, आपण जर दारिद्र्यांत राहूं तर आपल्या-सारखे गाढव आपणच, असें मोघमच तो सांगत असे. एवंच सांगावयाची गोष्ट एवढीच कीं बाबूराव उपासनींच्या आयुष्यक्रमासंबंधानें लोकांना बरेंच गूढ होतें. पुढें तें गूढ कांहीं अंशीं मला सुटलें; तथापि पुरें सुटलें नाहीं. कारण याचीं जरी श्रीमंत कुळें असलीं तरी दोन दिवस पाहुणा म्हणून सत्कार करण्यास व दक्षिणा म्हणून दहा रुपयांची नोट हातावर ठेवण्यास तयार, इतकेच श्रद्धाळु लोक सांपडतात. तथापि हा शंभराच्या व पांचशेंच्या नोटा कोठून आणी, हें गूढ होतेंच. तथापि तें कालान्तरानें नाहींसें झालें.

नाशिकच्या ज्या अनेक मौजा माझ्या दृष्टीस पडल्या, त्यांमध्यें तांतडीनें जेव-णाला ब्राह्मण बोलावणें व जेवण तयार करणें, या गोष्टी किती झटपट होऊं शकतात यासंबंधाच्या होत. तसेंच दान घेणारे भिक्षुक काय लटपटी करतात, त्याहि दृष्टीस पडल्या. तेथें एक गृहस्थ गोप्रदान करण्यास आला होता. नाशकास गोप्रदान चार आण्यांत होतें. चार आणे भटजींच्या हातांत द्यावे व गोप्रदान दिल्याचें उदक सोडावें. आणि घराबाहेर असलेली गाय भटजीला देण्याचा विधि करावा. कोठली तरी गाय आणून दान करण्याचा विधि चार आण्यांत होऊं शकतो; तथापि जर कोणी खरोखरच गोप्रदान करावयास तयार झाला आणि दिलेली गाय आपण पाळिली पाहिजे, विकतां कामा नये अशी अट घालूं लागला, तर तें खरोखरीचें गोप्रदान घ्यावयास एकहि भिक्षुक तयार होईना. त्यामुळें खरेंखुरें गोप्रदान द्याव-यास जर कोणी आला तर तें द्यावयास ब्राह्मणच मिळत नाहीं, अशा तऱ्हेचा देखावाहि तेथें माझ्या दृष्टीस पडला. ही परिस्थिति जेव्हां लक्षांत आली, तेव्हां गोरक्षण धर्माची आजची कठिणता माझ्या मनांत चांगलीच ठसली.

—×—

प्रकरण १६ वें.

## डॉ. घैसास यांचा संस्थानांतील अनुभव.

डॉ. घैसास दोन वर्षांत पुन्हां संस्थान सोडून बाहेर पडले, तथापि त्यांनीं पुण्यास आपली प्रॅक्टिस सुरू न करतां मुंबईस केली. दोन वर्षांत संस्थानांत त्यांची उत्तम सर्जन म्हणून ख्याती झाली होती, व ते कोठेंही गेले तरी त्या भागां-तील रोगी त्यांस शोधीत तेथें येतील अशी त्यांची खात्री झाली होती. तथापि त्यांची सार्वजनिक हितासाठीं धडपड करण्याची हौस फिटली होती. आणि आतां आपण आपल्या वैयक्तिक हिताच्या मागें लागावें अशा मताचे ते झालेले होते. संस्थानांत जातांना त्यांनीं सर्वप्रकारें खबरदारी घेतली होती; तथापि ते बोलून चालून डॉक्टर; त्यांना सपाटून सत्ता ज्याच्या हातीं आहे अशा राजाची हुषारी कोठून येणार ? ते फसले आणि तेव्हांपासून " वेश्यांगनेव नृपनीतिरनेकरूपा " हें भर्तृहरी वाक्य त्यांच्या तोंडून वारंवार येऊं लागलें. मुंबईस आल्यानंतर मी त्यांच्या-कडे गेलों होतों. तेव्हां त्यांनीं आपला संस्थानीं नोकरीचा साग्र इतिहास सांगितला तो थोडक्यांत येणेंप्रमाणें :—

माझी नेमणूक संस्थानाचे सर्जन, आरोग्यखात्याचा मुख्य आणि " राजप्रसाद-भिषक्" या नात्यानें होती; "राजप्रसाद भिषक्" म्हणजे मी कोणाचा नोकर हें मात्र निश्चित नव्हतें. प्रासादांतील हुजरे वगैरे लोकांनाहि असें वाटे कीं, मी त्यांच्या घरीं यावें हा त्यांचा हक्क आहे. मी त्यांच्याकडे गेलों नाहीं, तेव्हां या मंडळींनीं माझ्या-विरुद्ध राजेसाहेबांच्याकडे कानगोष्टी करण्यास सुरवात केली. महाराजांच्या नोकरांना मी अप्रिय झालों या गोष्टीची मीं पर्वा केली नाहीं; जेथें सर्व सत्तेचें स्थान एक व्यक्ति आहे, तेथें त्या व्यक्तीला खूष केलें म्हणजे झालें एवढेंच मीं धोरण ठेविलें होतें. पण त्या व्यक्तीला देखील पूर्णपणें खूष करणें हें माझ्या हातीं नव्हतें, हें मला समजत नव्हतें. अयोग्य गोष्टी महाराजांसाठीं करण्यास मी तयार नव्हतों. ज्या नीतिकल्पना मीं उराशीं बाळगल्या त्या महाराजांच्या इच्छांशीं विसंगत होत्या. तथापि अन्यायाच्या गोष्टी कराव्या लागतील अशी माझ्या मनांत कल्पनाच नव्हती. पण कांहीं दिवसांनीं माझा भ्रम दूर झाला. राजेलोकांना ज्या गोष्टी करावयाच्या असतात त्या ते मला अमुक एक गोष्ट करावयाची आहे, तुम्ही निमूटपणें ऐका असें सांगून

कधीं करीत नाहींत. त्या गोष्टी राजेलोकांना कराव्या लागल्या, किंवा राजे लोकांनीं अत्यंत नाखुषीनें मंजुरी दिली अशाच तऱ्हेनें त्यांना कराव्या लागतात. एखाद्या मनुष्याला नोकरीवरून काढावयाचें झाल्यास त्याला प्रकृतीमुळें काम करण्यास नालायक असा शेरा मेडिकल खात्याकडून आला म्हणून त्याला काढलें असें दाखवावें लागतें. असे दरबारी पद्धतीचे शेरे देणें हें काम मुख्य डॉक्टरचें असतें. प्रथम मला तसा शेरा देणें मनाला बरें वाटलें नाहीं; तथापि मला असें दिसून आलें कीं तसा शेरा द्या असा त्या परीक्षेस आलेल्या मनुष्याचाहि आग्रह दिसूं लागला. याचें मला आश्चर्य वाटलें. मला प्रश्न असा पडला कीं, या मनुष्याच्या मनांत नोकरी सोडावयाची नाहीं, हा नोकरीला नालायक झालेला नाहीं, असें असतां हा नोकरीला नालायक ठरवून कां घेत आहे? मी संस्थानांत नवा असल्यामुळें मला हा घोंटाळा पडला; पण माझ्या हाताखालच्या डाक्टरना तो मुळींच पडला नाहीं. ते म्हणाले कीं याला नोकरीच्या नालायकीचें सर्टिफिकेट दिलेंच पाहिजे. कारण याला आतां पेन्शनींत काढावयाचा आहे. याला नोकरी हवी आहे हें खरें आहे, पण महाराजांना जर हा नको आहे तर याची नोकरी जाणार आणि कांहींतरी ठपका येऊन जाणार, हें याला ठाऊक आहे; तर अब्रूनें नोकरी सोडून जावें यांतच शहाणपणा आहे हें हा ओळखत आहे आणि याच्यासाठींच प्रकृतीमुळें नोकरीस नालायक झाला आहे काय अशी जी त्याच्या खात्याकडून पृच्छा झाली आहे ती याच्याच इच्छेमुळें आहे कीं अधिकारी मंडळीच्या इच्छेमुळें आहे हें पाहून आपण सर्टिफिकेट द्यावें. हाच जर नोकरी सोडण्याच्या गोष्टी बोलत असेल आणि वरच्या मंडळीस तें नको असेल तरच यास सर्टिफिकेट नाकारावें, एरव्हीं नाकारूं नये, असें आमच्या असिस्टंट सर्जननें सांगितलें.

एके दिवशीं दिवाणांनीं मला घरीं बोलावलें. मी गेलों तेव्हां चहा, सिगार वगैरेचें स्वागत झालें. आदल्या दिवशींच्या नाटकासंबंधानें व इतर औपचारिक बोलणीं पांच मिनिटांतच आटपलीं. त्यानंतर दिवाणांनीं सांगितलें कीं, आपण आज— "आपल्या खुषीनें दिलेला राजीनामा आपणांपासून घ्यावा" अशी महाराजांची मला आज्ञा झालेली आहे. मीं आश्चर्यानें म्हटलें कीं, "मीं कोठें राजीनामा दिला आहे?"

"दिला नसला तर आतां द्यालच." दिवाणांनीं स्मितयुक्त उत्तर दिलें. "मी राजीनामा देऊं इच्छित नाहीं, मला नोकरीवरून काढावयाचें असल्यास संस्थानास त्याची मोकळीक आहे; मीं म्हटलें.

"आमच्या मनांत तुम्हांला काढावयाचें नाहीं, तर तुम्ही राजीखुषीनें राजीनामा द्यावा अशी माझी सूचना आहे." दिवाण अगदीं मोजक्या शब्दांनीं बोलत आहों असें दाखवीत म्हणाले.

"म्हणजे ?" एवढेच माझ्या तोंडून उद्गार निघाले.

"म्हणजे काय ? ही संस्थानची नोकरी आहे. जेव्हां संस्थानास एखादा मनुष्य नको असेल तेव्हां त्याला काढलें नाहीं, त्यानें राजीखुषीनें नोकरी सोडली असें सांगितलें तर तें दोन्ही पक्षांना हितावह असतें."

"पण मला हितावह नाहींना."

"तुम्हांलाहि ही गोष्ट हितावह आहे."

"ती कशी ? मी आपण होऊन नोकरी सोडली तर माझी नुकसानभरपाई बुडेल आणि ती रक्कम कांहीं लहानसहान नाहीं."

"तुमचे पंचवीस हजार रुपये लागूच नाहींत."

"म्हणजे प्रत्यक्ष महाराजांचें मजजवळ पत्र आहे."

"तें पत्र बेकायदेशीर आहे. तें पत्र तुम्हीं त्यांच्यापासून पुण्यास घेतलें. संस्थानचा शिरस्ता असा आहे कीं जेव्हां संस्थानाला बांधणारे करारमदार व्हावयाचे असतील, तेव्हां ते संस्थानाच्या दप्तरदारानें लिहिले पाहिजेत. त्यांवर दप्तरदाराचा नंबर पाहिजे आणि दिवाणाची सही पाहिजे. तसें नसलें तर कोणतेहि करारमदार संस्थानास बांधूं शकत नाहींत. यासंबंधाचा आमच्या कौन्सिलाचा ठराव आहे. त्याला संस्थानिकांची संमति मिळाली आहे आणि हा ठराव पोलिटिकल एजंटना कळविला आहे. आणि तो पोंचल्याचें त्यांचें पत्रहि आमच्या जवळ आहे.

"खुद्द महाराजांचें पत्र महाराजांना बंधनकारक होत नाहीं काय ?"

"अर्थात् नाहीं."

"म्हणजे"

"महाराजांचा शब्द म्हणजे 'राजशब्द' आहे. राजा कोणाचें वाईट करूं शकत नाहीं. म्हणजे राजानें सर्वांशीं गोड राहिलें पाहिजे. राजाला शोभेल असेंच औदार्य दाखविलें पाहिजे. त्यांनीं दिलेलीं अभिवचनें सर्व खरीं धरलीं तर संस्थानचा वसूल कधींच पुरा पडावयाचा नाहीं. यासाठीं राजाला औदार्याचा अभाव दाखवि-

ण्याचें कारण तर पडूं नये आणि राजाच्या औदार्याच्या शब्दांमुळें संस्थानास नुकसान पोहोंचूं नये म्हणून महाराजांच्याच इच्छेनें वरील प्रकारचा शिरस्ता पाडण्यांत आला आहे. तुम्ही कोर्टांत गेलां तरी त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. दरबारी पद्धत एक ठराविक असतां तुम्ही तिला सोडून करार केला म्हणजे ब्रिटिश कोर्टामार्फत देखील तुम्हांला पैसे मिळणार नाहींत" दिवाणांनीं हास्ययुक्त उत्तर दिलें व पुढें म्हणाले, "राजशब्दाची हुशारी आमचे महाराज दक्षिणेंतल्या एका ब्राह्मण संस्थानिकापासून शिकले आहेत. त्यांनीं एका विद्वान ब्राह्मणाला ठकवून त्यांच्या जवळून हस्तलिखितें कशीं उपटलीं आणि त्यांच्यासाठीं किती मोठी रक्कम खर्च केली, या प्रकारच्या गव्हर्नरापाशीं थापा कशा मारल्या याचें रसभरीत वर्णन त्यांनीं महाराजांपाशीं प्रत्यक्ष केलेलें आहे."

"तुम्हांला या सर्व गोष्टी ठाऊक असून तुम्ही येथें नोकरी करतां?"

"आम्ही सर्व गोष्टी गृहीत धरूनच चालतों. संस्थानची नोकरी म्हणजे अळवावरचें पाणी आहे."

"आणि आपला शब्द मोडण्यासाठीं जे नियम दरबारी मंडळींनीं तयार केले त्याला महाराजांनीं संमति तरी कशी दिली?"

"अहो, आम्ही दरबारी मंडळी खुद्द महाराजांची इच्छा असल्याशिवाय त्यांचा नियम मोडण्याची छाती कशी करूं? जे नियम झाले ते त्यांच्याच इच्छेनें झाले. आम्हीं कारकुनी मात्र केली."

"मला नोकरीवरून काढण्यांत जर संस्थानचें नुकसान कांहीं नाहीं तर मला राजीनामा देण्यास सांगण्यांत हेतु काय? संस्थान काढूनच कां टाकीत नाहीं?"

"हेतु एवढाच कीं आपलें नुकसान होऊं नये म्हणून. आम्हा दरबारी मंडळींना असें वाटतें कीं, तुम्हीं येथून जावयाचें तें उजळ माथ्यानें जावें; 'डिसमिस' होऊन जाऊं नये. अर्थात् राजीनामा देण्यास आम्ही आपणास सूचना करतों ती आपल्याच कल्याणासाठीं आहे." दिवाणांनीं आपलें स्मित कायम ठेवून उत्तर दिलें.

"डिसमिस झालें तर काय बिघडलें? मला त्यांत कांहीं कमीपणा वाटत नाहीं."

"डिसमिस करण्याची क्रिया पुढीलप्रमाणें असते. ज्या कोणाला डिसमिस करावयाचें त्याच्या विरुद्ध रिपोर्ट त्या खात्याकडून जावा लागतो. आणि तो रिपोर्ट

व त्याबरोबर आलेली शिफारस दिवाणानें मंजुर करावी लागते. महाराजांची सही देखील त्यास लागत नाहीं. तें अपेश दिवाणानेंच घ्यावयाचें असतें. जेव्हां डिसमिस करावयाची शिफारस असते, तेव्हां कारण द्यावें लागतेंच."

"मग माझ्याविरुद्ध आपणांस कारण सांपडलें नाहीं ना?"

"अजून सांपडलें नाहीं पण उद्यां सांपडेल." असें म्हणून दिवाणांनीं घंटा वाजविली, तेव्हां दोन बाया पुढें आल्या. तेव्हां दिवाणांनीं सांगितलें कीं, या दोन बायका उद्यां तुमच्याकडे प्रकृति दाखवायला येतील. एक मजवर तुम्हीं बलात्कार करण्याचा प्रयत्न केला म्हणून ओरडणार आहे, आणि दुसरी तिला साक्षीदार रहाणार आहे. आणि हिचा नवरा महाराजांचा हुजऱ्या, आपल्या बायकोकडे तुम्ही वाईट नजरेनें पहातां अशी बायकोनें आपल्याकडे पूर्वी तक्रार केली होती, पण मीं तिकडे लक्ष दिलें नाहीं अशी साक्ष देणार आहे. असें म्हणून दिवाणसाहेबांनीं पुन्हां दोनदां घंटी वाजविली. तो हुजऱ्याहि तेथें आला. मागें आपण ज्याच्या घरीं जावयाचें नाकारलें तोच हा हुजऱ्या अशी आठवण झाली. व पुढें आपणाला दोन वर्षांची सजा होणार असें ठरलें आहे. व कोणचाहि संस्थानचा नोकर फौजदारी गुन्ह्यांत सांपडला म्हणजे त्याला नाखुषीनें डिसमिस करावेंच लागतें. व तें तसें करावयाचें दिवाणाकडून लिहून गेलें म्हणजे महाराजांची संमति येते. आपणास दोन वर्षें सजा झाल्यानंतर आपण महाराजांकडे दयेसाठीं अर्ज केला तर महाराज सजा कमीहि करतील."

येणेंप्रमाणें दिवाणांनीं या सर्व गोष्टी अगदीं साध्या भाषेंत सांगितल्या. त्या सांगतांना त्यांनीं आपली स्मितयुक्तता सोडली नव्हती.

"तर मग मीं काय करावें असें आपलें म्हणणें आहे?"

"आमचें म्हणणें सांगितलेंच आहे. आपणांस येथें मिळणारा पगार पुरत नाहीं, पगार दुप्पट करावा नाहींतर आम्हांस रजा द्यावी, असा आपण मला केलेला अर्ज "टंकयंत्र" मुद्रित होऊन तयारच आहे. त्यावर आपण सही करा म्हणजे झालें. मी तावडतोब तो मंजूर करतों. आणि आपण बारा वाजतांच्या गाडीनें जाण्यास हरकत नाहीं. आपलें सर्व सामान आपल्या कंपौंडरनें बांधलेंच असेल. आमचा शोफर तुम्हांस तडक स्टेशनावर नेईल. आपणांस चांगल्या नोकरीचे आणि आपल्या उन्नतीच्या मार्गांत महाराज येऊं इच्छीत नाहींत आणि म्हणून महाराज आपला राजी-

नामा मंजूर करीत आहेत अशा अर्थाचें पत्र आपणांस आपण सांगाल त्या पत्त्यावर येईल. आपण आणखी एक दिवसहि राहूं नये असा आमचा आपणांस सल्ला आहे."

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मीं तो सल्ला घेतला आणि मुंबईस सात दिवसां-पूर्वींच दाखल झालों. ऋणानुबंध तुटल्याबद्दल महाराजांना किती दुःख होत आहे याबद्दल महाराजांच्या सेक्रेटरीचें पत्र आलें आहे तें हें पहा. असें म्हणून डॉ. घैसासांनीं एक महाराजांच्या स्टेशनरीवर लिहिलेलें पत्र दाखविलें.

—x—

प्रकरण १७ वें.

## डॉ. घैसास यांच्या अप्रियतेचीं कारणें.

डॉ. घैसासांना मीं म्हटलें कीं, तुम्ही निघण्याच्या वेळच्या गोष्टी सांगितल्या. राजेलोकांचा सेवकविसर्जन विधीचा उत्कृष्ट नमुना म्हणून जर आपण तो जाहीर केला तर वाङ्मयांत शिल्लक राहील. तथापि आपल्या अप्रियतेचीं खरीं कारणें काय होतीं हें आपण स्पष्ट केलें नाहीं. तीं जर आपण कराल तर चांगलें होईल.

डॉ. घैसास म्हणाले कीं मीं ज्या दिवशीं नोकरी पत्करल्याचें जाहीर झालें तेव्हां त्यांनीं आपल्या दरबार सर्जनला रजा दिली. कर्मधर्मसंयोग असा कीं अमदावादच्या स्टेशनावरील "डाइनिंग रूम" मध्यें मला तो भेटला. त्याच्या "सूटकेस"वर त्याचें नांव, त्याच्या पदव्या आणि संस्थानाचें नांव हें पहातांच मी चकित झालों. त्याच्या-सारखा मनुष्य संस्थानांत असतां मजसारख्या परक्यास आमंत्रण करण्याची क्रिया कशी झाली ? मीं त्याच्याशीं ओळख केली तेव्हां त्यास कळलें कीं, तो जी जागा सोडीत आहे त्याच जागेवर मी जात आहें. तो म्हणाला, डॉक्टर, तुम्ही संस्थानांत किती दिवस टिकाल याची मला खात्री नाहीं. संस्थानांतून बाहेर पडावें म्हणून माझी इच्छा होती पण नोकरी सोडून देण्याचें धैर्य मला नव्हतें. मला रजा देण्यांत आली ही परमेश्वरी कृपाच आहे असें मी समजतों. मला तुमच्याबद्दल मात्र सहानु-भूति वाटते. आणि वर्षा दोन वर्षांत आपणहि मुंबईला येऊन धंदा सुरू कराल असें मला वाटतें. तुम्ही संस्थान सोडून मुंबईस आलां म्हणजे मला जरूर भेटा. संस्था-नांत नोकरी करण्याचा फायदा मला झाला नाहीं असें नाहीं; फायदा झालाच आहे.

संस्थानांतील नोकरीमुळें पुष्कळ अनुभव आला. पुष्कळांशीं ओळखी झाल्या आणि संस्थानची प्रजा मुंबईत आहे तिच्यांत माझा धंदा चांगला चालेल असें वाटतें. मी आपल्याशीं कांहीं बोलत नाहीं. एवढेंच सांगतों कीं, संस्थानाची अवकृपा आहे असें कळल्याबरोबर संस्थानांतून जितका लवकर पळ काढाल तितकें चांगलें. ज्यांना नोकरीवरून कमी करावयाचें राजाच्या मनांत असेल त्याला गैरलायकीचें "प्रमाणपत्र" देणें ही गोष्ट माझ्या आंगवळणीं पडली होती. नोकरीवरून निघावयाची ती एक राजमान्य पद्धति ठरली होती. तीमुळें अधिक वाईट आरोपाची आवश्यकता नाहींशी झाली होती. आणि राजाच्या इच्छेच्या विरुद्ध जाण्यांत कांहीं फायदा नाहीं हें प्रत्येकास पटलें होतें. मी सर्टिफिकिटें देतांना स्वतःच्या मनाच्या समजुतीसाठीं अनेक खऱ्या खुऱ्या वैगुण्यांचें वर्णन करीत असें. आणि त्या वैगुण्यांमुळें कामावर ठेवतां येत नाहीं असें त्याच्या खात्यावरचा अधिकारी ठरवीत असे.

मी येणेंप्रमाणें सदसद्विवेक बुद्धीस जागणारा म्हणजे राजाच्या सेवेला नालायक अशी माझी थोडक्याच दिवसांत लोकांस माहिती झाली. दवाखान्यामध्यें विषें अनेक असत. कधीं कधीं असें होई कीं तेथील कांहीं विषांच्या बाटल्या नाहींशा झाल्या. कांहीं दिवसांनीं कांहीं मंडळींचे मृत्यूदेखील संशयास्पद तऱ्हेनें होऊं लागले. राजकुलाच्या भानगडी अनेक होत्या. राजानें कोणा लोकांना कांहीं मोठमोठ्या रकमा कबूल केलेल्या होत्या. ती मंडळी अचानक मृत्यु पावत असत. असें असतां "पोस्ट मार्टेम" परीक्षा रीतीप्रमाणें होई. त्यावेळेस दिवाणांनीं मला मुद्दाम कोठेंतरी बाहेर पाठविलेलें असे आणि असिस्टंट सर्जन जाऊन तपासणी करी आणि प्लीहा वृद्धि झाल्यानें, हृदयक्रिया बंद पडल्यानें, मृत्यु. अशा तऱ्हेचें सर्टिफिकेट देत असे. गांवामध्यें मात्र विषप्रयोग झाला असा बोभाटा होत असे. माझ्या हातून एक गर्भपातहि करविला. तो मीं जाणून बुजून केला असें मी कबूल करतों. तथापि मला असें सांगण्यांत आलें कीं, कुलीन घराण्यांतील मुलगी तिचें पाऊल वांकडें पडलें तर तिचा बचाव केला पाहिजे. तथापि खरी गोष्ट तशी नव्हती. ती स्त्री महाराजांच्यापासून गर्भवती झाली होती असें माझ्या लक्षांत आलें. पुढें पुढें असे कांहीं प्रसंग आले म्हणजे मी सांगत असें कीं, त्या स्त्रीला प्रसूत होऊं द्या. आणि कोणत्यातरी "अनाथ-बाल-संरक्षक" गृहांत मुलाची पाठवणी करा. माझी कल्पना मान्य झाली नाहीं असें नाहीं. माझी सूचना अमलांत आली, पण कापल्या करंगळीवर......ही मी उपयोगी पडणारा मनुष्य नाहीं म्हणून राजेसाहेबांची खात्री

झाली. त्या संस्थानिकाचा मला प्रथम राग येत असे. पण पुढें त्याच्याविषयीं खरोखर दया उत्पन्न होऊं लागली. त्या संस्थानामध्यें दुसऱ्या अनेक गडबडी होत्या. त्या संस्थानाची पहिली राणी एका थोर राजाची मुलगी होती. तिची वागणूक एखाद्या वेश्येच्या वागणुकीपेक्षां निराळी नव्हती. आणि त्यामुळें तिचा त्याग करणें महाराजांस अवश्य झालें. तिचा त्याग केला पण तिचा मुलगाहि तिच्या बरोबर आजोळीं गेला, आणि महाराजांनीं दुसरी बायको केली. पहिल्या बायकोचा मुलगा तो आपला आहे किंवा नाहीं असा महाराजांस संशय आणि त्यामुळें त्यास कांहीं एक जाऊं नये असें महाराजांस वाटत असे. पहिल्या बायकोच्या मुलास नाकारावें तर तेंहि शक्य नव्हतें. राजानें कोणत्या कोर्टात तक्रार न्यावयाची? आपल्याच कोर्टांत तक्रार नेऊन आपल्या तर्फेचा निकाल झाला तरी सासरा मोठ्या संस्थानचा अधिपति असल्यामुळें कोर्टाचा निकाल न मानतां, आपल्याविरुद्ध 'पोलिटिकल अपील' करणार. आणि पोलिटिकल खात्याकडे त्या प्रकारचा पत्रव्यवहारहि होता. पोलिटिकल खातें म्हणजे काय, त्यांत मूठदावीचे प्रयोग अनेक होत असतात. बलवान सासरा विरुद्ध गेला म्हणजे पोलिटिकल खात्याशीं राजाचें कांहीं एक चालूं देणार नाहीं. वेश्यातुल्य स्त्रीदेखील चांगल्या वर्तणुकीची त्या खात्यांतले "इंग्रज पोरगे" ठरविणार. अशा रीतीनें राजा बांधला गेला आहे. राजाला आपली बायको टाकतां येईल, पण आपल्या मुलाला नाकरतां येणार नाहीं. आपल्या बायकोच्या जाराचा मुलगा गादीवर येणार या गोष्टीपुढें राजाचा देखील निरुपाय झालेला. तेव्हां राजापुढें एकच मार्ग उरला. आणि तो म्हटला म्हणजे आपल्या दुसऱ्या राणीच्या मुलाला रोख पैसे पुष्कळ द्यावयाचे, आणि संस्थानाला खूप कर्ज करून ठेवावयाचें. तसेंच आमच्या संस्थानांत झालें आहे.

राजाच राजरोस पैसे खावयाला लागला तर संस्थान कसें श्रीमंत राहील? कंदील घेतला तर किंमत दहा रुपये लावावयाची. एक रुपया चार आणे कंदीलविक्यास द्यावयाचे, आणि उरलेली रकम आठ रुपये बारा आणे, महाराजांच्या खासगीकडे जमा व्हावयाची. आमच्या इस्पितळाकडे खर्च बराच दिसतो पण तितका तो खरोखर होत नसे. माल आणावयाचा म्हणजे खासगी खात्यामार्फतच आर्डर जावयाची. बिलें मुंबईंत रोख दिलीं जात. आणि रोखीच्या पावत्या दाखल होत. मला प्रथम भरमसाट किंमती संस्थान कसें देतें, याचें आश्चर्य वाटे, व मी मुंबईहून माल अधिक स्वस्त दरानें आणवीन असें मीं दिवाणांस सांगितलें. तेव्हां दिवाणांनीं ती व्यवहार-

पद्धति समजावून दिली. आणि खाजगी खात्याकडे किती रकम जमा झाली आहे ती वजा करून जेव्हां खरी किंमत काय पडली हें मला कळलें, तेव्हां मात्र असें दिसलें कीं खऱ्या किंमतीच्या फारतर सवापट किंमत आकारली आहे. माल शंभर रुपयांचा घेतला तर बिल चारशें रुपयांचें व्हावयाचें, आणि अडीचशें किंवा पावणे तीनशें रुपयांची "डिस्काउंट–नोट" पुन्हां निराळी त्या कंपनीनें द्यावयाची. आणि संस्थानाच्या मुंबईतील एजंटानें सवाशें किंवा दीडशें रुपये रोख भरावयाचे. आणि चारशें रुपयांची "पावती" आणि अडीचशेंची "डिस्काउंट नोट" दरबाराकडे पाठवावयाची. चारशें रुपये खर्चीं पडावयाचे आणि डिस्काउंट अडीचशें रुपये महाराजांचे खासगीकडे जमा व्हावयाचे ही सर्व पद्धति दिवाणांनीं मला समजावून दिली. अनेक संस्थानिकांची विलायतची यात्रा किंवा हिंदुस्तानांतील यात्रा, खर्च फुगवून दाखविण्यासाठींच असतात. ही गोष्ट आपल्या नजरेस आल्याशिवाय रहाणार नाहीं. जेव्हां राजाची या प्रकारची स्थिति आहे हें माझ्या लक्षांत आलें, तेव्हां सर्व प्रकारची दुर्गति या ठिकाणीं उत्पन्न होणार हें मला कळून चुकलें. अनीतीचें कारण दौर्बल्य होय. दुर्बल मनुष्य खोटें बोलतो, लबाड्या करतो आणि विश्वासघात करतो. "क्षीणा नरा निष्करुणा भवंति" या वाक्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. राजाच्या या परिस्थितीमुळें त्याच्याविषयीं रागापेक्षां अनुकंपाच उत्पन्न होत असे. फटका बसला म्हणजे तात्पुरता राग यावयाचाच, व तो तसा येई देखील. तथापि रागाचें स्थान अनुकंपेनें घेतलें जाई. मी संस्थान सोडून निघून आलों आहें. आणि राजाविरुद्ध कारवाई देखील करण्याची माझी इच्छा नाहीं. त्यानें ठकवाठकवी केली ती जगापुढें मांडली तर त्यानें काय होणार आहे? सामान्य लोक राजास वाईट म्हणतील एवढें खरें, पण प्रत्येक मनुष्याचा न्याय त्याच्या बरोबरीच्याकडून व्हावा हें तत्त्व जर अंगिकारलें, तर राजाला इतर राजे दोषी ठरवतील असें वाटत नाहीं. सर्वच राजे या बाबतींत एका माळेचे मणी आहेत.

"**उदंडामाजी काळेंगोरें । काय निवडावें निवडणारें**"॥

असेंच अनेक राजेलोकांचें अंतरंग पहातां म्हणावें लागेल.

"**वेश्यांगनेव नृपनीतिरनेक रूपा**"

असें प्राचीन नीतिशास्त्रज्ञ आपणांस सांगत नाहींत काय?

राज्याविषयीं असें सांगतां येईल कीं जितकें संस्थान मोठें तितकें चांगलें, त्यांत लबाड्यांचा प्रसंग रजवाड्यांना कमी येईल. संस्थानाची नोकरी म्हणजे बेभरंवशाची असा

आपल्याकडे बोलवा झाला आहे. तो खरा असला तरी त्याचें कारण राजे लोकांचें "नेटीव्हपण" नव्हे किंवा संस्थानाचा एकतंत्रीपणा नव्हे. खालच्या जागा नेहमीं सुरक्षित असतात. वरच्या जागांचेच अधिकारी वारंवार बदलतात. एकतंत्री राज्यांत राजाशीं कानगोष्टी करून म्हणजे ज्याला हुसकून द्यावयाचें असेल त्याच्याविरुद्ध राजापाशीं कानगोष्टी करून, दुसऱ्यास काढून टाकून आपण नोकरी पटकावण्याची क्रिया करावयाची; तर लोकराज्यामध्यें लोकांच्यापाशीं अस्तित्वांत असलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध कागाळी व त्यांची नालस्ती करून जागा उपटावयाची; "नेटिव्ह स्टेटांत" लबाडी अधिक असें मुळींच नाहीं. कान फुंकून दुसऱ्यास घालविण्याची क्रिया दोहोंकडे सारखीच. आपल्याकडे संस्थानी नोकरीविषयीं बोभाटा झाला आहे याचें कारण येथें आपले लोक नेहमीं दुय्यम जागेवर असतात ते संस्थानांत मोठे अधिकारी बनतात. जो आमच्याकडे "डेप्युटी कलेक्टर" किंवा "कलेक्टर" असतो तो संस्थानांत "दिवाण" होतो. व त्यामुळें त्या दोन जागांची तुलना होते. पण ही तुलना बरोबर नाहीं. संस्थानांतील दिवाणांच्या जागेची अस्थिरता इंग्लंडच्या प्रधानमंडळाच्या जागेपेक्षां अधिक नाहीं. मोठमोठ्या साम्राज्यांत खालची नोकरी लहानशा राज्यांतल्या अग्रस्थानी नोकरीपेक्षां अधिक पगार देणारी आणि अधिक स्थिर असते एवढें खरें. लहानशा राज्यांत लोकसत्ता आली तरी नोकरीची अस्थिरता कमी होण्याऐवजीं उलट वाढतच जाईल, असें माझें मत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करतां माझी नोकरी गेली त्याचें मला आश्चर्य वाटत नाहीं. मला संस्थानांतून पुन्हां बोलावणें आलें तर मी पुन्हां जाईन, कारण लोकहित साधण्याची संधि ब्रिटिश रियासतीपेक्षां संस्थानांत अधिक आहे असें मला वाटतें. मी उलट तुम्हांलाच म्हणेन कीं चला माझ्याबरोबर.

डॉ. घैसास यांच्यावरोबर हें जें बोलणें झालें त्यानें माझें समाधान झालें नाहीं. वैयक्तिक माहिती न देतां तात्त्विक चर्चा काढून बोलणें आडमार्गास त्यांनीं नेलें असें वाटलें. त्यांच्या नोकरीच्या समाप्तीचीं खरीं कारणें कळलीं असें मला वाटलें नाहीं. साधारण कारणें समजलीं पण असाधारण कारणें समजलीं नाहींत. त्याप्रमाणें निमित्तकारणेंही समजलीं नाहींत. तीं पुन्हां विचारावींत कीं देशी राज्याविषयीं आणखी व्याख्यान द्यावयास त्यांना लावावें हेंहि कळलें नाहीं. मी आणखी गप्पा मारावयास गेलों हें खरें.

—×—

प्रकरण १८ वें.

## "घट कर्पर" ची अर्वाचीन आवृत्ति.

पुणें सोडून हिंडत हिंडत मी एका लहानशा गांवीं आलों. त्या गांवांत गुजरात्यांची वस्ती पुष्कळच होती. आणि त्यामुळें तेथील राजकारणांत "गुजराती" आणि "मराठे" यांची चुरस होती. गुजराती वर्ग सारा असहकारितावादी आणि महात्मा गांधींचा कट्टा अभिमानी. सर्व लोक आणि बायका खादीमय झालेल्या! ते जोराचे देशाचे अभिमानी आणि बहिष्कारवादी! घरामध्यें बिलोरी आरसे, ड्रेसडेन चायनाचीं भांडीं युरोपांतून आणलेलीं, हंड्या, झुंबर यांचे जे जे विविध प्रकार विजेच्या दिव्याशीं संयुक्त करण्याजोगे ते ते सर्व केलेले. कोणी 'प्यारीस'हून तडक कलावतूचीं पार्सलें बोलावून व्यापार करणारा तर कोणी जपानांतून माल मागविणारा; तथापि सर्वच स्वदेशीचे कट्टे पुरस्कर्ते आणि खादीमय बनलेले! गिरणीचे कपडे देखील वापरणें म्हणजे अधर्म समजणारे, त्यांनीं गिरण्यांचे शेअर घेतलेले होते! कित्येक तर गिरण्यांचे शेअर काय पण ज्या सरकारला बहिष्कार घालावयाचा त्या सरकारचे शेअरची खरेदी-विक्री रोज करीत होते! तथापि ते सर्व कट्टे असहकारितावादी! त्यांनीं गांधीला पैसे दिले म्हणजे झालें! असें सर्वांचें वर्तन होतें. त्यांनीं या वेळेस दक्षिणी लोकांचा पाडाव करून ती म्युनिसिपालिटी काबीज केली होती. आणि जुनें छपाईचें कंत्राट रद्द करून तिप्पट किंमतीस तेंच कंत्राट काटकसरीसाठीं दिलें होतें. ज्यानें तें कंत्राट घेतलें त्याला ती जादा रकम पचूं दिली अशांतला भाग नाहीं; त्यांतील कांहीं रकम स्थानिक गुजराती स्त्री मंडळाला आणि गुजराती बंधुसमाजाला देवविली असें कळलें. अर्थात् ते महात्मा गांधींचे कट्टे अनुयायी होते यांत शंका नाहीं.

त्या गांवाचे नगराध्यक्ष जरी असहकारितावादी होते तरी त्या जिल्ह्याच्या "मॅजिस्ट्रेट"कडे ते वारंवार दिसत. "तुम्ही असहकारितावादी लोकांबरोबर कसे मिलाफ झाला" असा त्या शहराच्या मॅजिस्ट्रेटनें प्रश्न केला असतां शेटजींचें उत्तर पुढीलप्रमाणें असे. ज्या पक्षाचा जोर असेल त्या पक्षाचे आपण आहोंत असें सांगणें आम्हांस भाग आहे. मी सरकारचा बंदा आहें. मी जर उभा राहिलों नसतों

तर खराच कोणी 'असहकारितावादी' आला असता. सरकारला तें हवें आहे काय ? त्यापेक्षां मी सरकारचा बंदा निवडून आलों हें चांगलें झालें नाहीं काय ? असहकारिता ज्यांत व्यक्त होईल असें एक तरी काम आमच्या हातून झालें आहे काय ? सरकारची इच्छा ज्या लोकांना कंत्राट मिळावें अशी होती त्यालाच आम्हीं मिळवून दिलें नाहीं काय ? आम्हीं मध्यें गांधीला मानपत्र द्यावें, गांधींच्या उपासाचा दिवस पाळावा असे ठराव केले त्यांत सरकारचें काय नुकसान झालें ? त्याच्या योगानें आम्ही जोरदार लोक म्युनिसिपालिटी चालवीत आहों अशी लोकांची समजूत होते ! आणि सरकारला जें काय पाहिजे तें होतें. अशा प्रकारचें उत्तर शेटजींकडून मिळे. कधीं कधीं कलेक्टर किंवा असिस्टंट कलेक्टरच्या बायकोला गळ्यांतला कंठा, किंवा कानांतील कुडीं मिळत. तीं कल्चर्ड मोत्यांचीं असत. पण तशीं नाहींत म्हणून सांगण्यांत येई आणि त्यांची किंमत जरी पन्नास साठ रुपये असली तरी आम्हांला पांचशें, सहाशें रुपये पडले अशी त्या स्त्रियांची समजूत करून देण्यांत येई. तो प्रकार पाहिला म्हणजे पुष्कळशा ठिकाणीं स्थानिक स्वराज्याचे कारभारी कॉंग्रेसवाले कट्टर कसे आहेत हें कळून आलें.

या कट्टरांना वर्तमानपत्रें देखील उचलून धरीत होतीं. म्युनिसिपालिटीच्या जाहिराती हव्या असतील तर आमच्या पक्षांतील सर्व मंडळींची तारीफ करीत राहिलें पाहिजे अशी त्यांस ताकीद दिली होती. अर्थात हीं पत्रें त्यांच्या हुकुमाबाहेर नव्हतीं. एकदां एका कट्टरानें तर वर्तमानपत्रकारास मोठा चमत्कार दाखविला. त्यानें सरकारविरुद्ध एक लेख लिहविला आणि लेखामुळें अधिकारी वर्गास मोठा राग आला आहे अशी बतावणी करविली. त्या पत्रकाराला मॅजिस्ट्रेटनीं बोलाविलें, "सिक्युरिटी" मागितली जाईल म्हणून दम भरविला, त्या वेळेस तो लोकप्रिय पुढारी सहजगत्या आला आणि त्यानें रदबदली करून वर्तमानपत्रकारास सोडविलें. तेव्हांपासून जरी तो पुढारी असहकारितावादी आहे, तरी त्याचें व्यक्तिशः सरकारांत मोठें वजन आहे, सरकार याला भितें असा बोभाटा गांवांत करविला तो कांहीं अंशीं यशस्वी झाला असेंहि म्हटलें पाहिजे.

जे असहकारितावादी सरकारी अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर हर हमेश दिसत, त्यांच्यासंबंधानें लोकांस शंका आली नाहीं असें नाहीं; कांहींतरी लोकांस शंका आलीच. आणि त्यांनीं स्पष्टीकरण देखील विचारलें. तेव्हां आमच्या शेटजींचें स्पष्टीकरण तयार होतेंच. त्यांनीं सांगितलें कीं, आपण सरकारी बंगल्यावर जाणारे असलों

म्हणजे सरकारकडच्या बातम्या आम्हांस बिनचूक समजतात. कॉंग्रेस कमिट्यांच्या अध्यक्षांना तुम्ही जर स्थानिक अधिकारी झालांत तर सरकारी अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर गेलें पाहिजे असा महात्माजींचा हुकूम आहे. कॉंग्रेसचे पुष्कळ हुकूम वरून जे येतात ते अध्यक्षापलीकडे जावयाचे नसतात. शिवाय लोकांचीं कामें करून दिलीं पाहिजेत. आणि त्यासाठीं अधिकारी वर्ग खूष ठेविला पाहिजे. असहकारिता जी करावयाची ती लहान अधिकाऱ्याशीं नाहीं; नाहींतर तुम्ही म्हणाल कीं टपालच्या शिपायानें पत्रें आणलीं ती तुम्हीं घेतलीं कशीं ? मी तुमचा मनुष्य आहें. जर मी नसलों तर सरकारपक्षाचा कोणी रावबहादूर निवडून येईल आणि तो तुम्हांला बिलकूल विचारणार नाहीं. म्युनिसिपालिटीचें काम करणारा मनुष्य म्हणजे सरकार आणि लोक यांच्या मधला दुवा आहे. तो दुवा सरकारपक्षीय नसून लोकपक्षीयच रहाण्यासाठीं कॉंग्रेसच्या लोकांनीं त्या जागा काबीज करून आपल्याकडे ठेवल्या पाहिजेत.

स्थानिक स्वराज्याच्या शासनाचें "ग्रांथिक तत्त्वज्ञान" कसेंहि असो, प्रत्यक्ष व्यवहारांतलें तत्त्वज्ञान या शेटजींच्या तोंडून जें बाहेर पडलें तें जसेंच्या तसें सांगितलें आहे.

—x—

प्रकरण १९ वें.

## इलेक्शन-एजंटाचे थोर आचार्य.

सन १९२२ च्या ऑक्टोबर महिन्यांत वांद्र्याच्या रावबहादूर आपट्यांना एक इलेक्शन एजंट पाहिजे, हें ऐकून मी त्यांच्याकडे आपल्या शिफारसपत्रांसह कसा गेलों, हें सांगावयाचें म्हटलें म्हणजे माझ्या राजकारणांतील प्रवेशाचा एकंदर इतिहास व त्यांत भेटलेले थोर आचार्य यांची माहिती दिलीच पाहिजे. नाशकास मी कामाला लागलों होतों; नाशिकचे सुप्रसिद्ध नाफेरवाले वकील नानासाहेब वैद्य यांनीं वकिली सोडली, तेव्हां त्यांच्याबरोबर, त्यांच्या कारकुनाची म्हणजे माझीही प्रॅक्टिस नाहींशी झाली, व मीही त्यांच्याबरोबर चरख्याचा उपदेश करीत होतों. मला वकीलसाहेबांप्रमाणें स्वार्थत्याग करावा लागला नाहीं. कारण मी पूर्वीं तीस पस्तीस रुपयेच मिळवीत होतों व तितकेच रुपये मला चरख्याचा प्रचार करूनही मिळू

लागले. व पाहुणा म्हणून जेवण–खाण फुकटांत पडे तो फायदा निराळाच. तथापि मला पुढें त्याहि कामाचा कंटाळा आला व दुसरें कसलें तरी काम हातीं घ्यावेंसें वाटूं लागलें. तें काम सोडून देण्याचें कारण कांहीं अंशीं पगार वेळच्या वेळीं मिळेना हें होतें, तर कांहीं अंशीं धडपड करून, आक्रोश करून, चरख्याचा प्रचारच होईना हेंही होतें. कामकरी लोकांना रोज नियमित तास काम करून इतर कामांत दहा आणे मजूरी मिळे, तर कट्टर बनलेल्या वाण्याकडून कापसाचे पेळू विकत घेऊन त्याचें सूत काढावयाचें, दिवसभर काम करून निघालेलें सूत त्या वाण्यासच विकावयाचें असें करून रोजचे धड चार आणेदेखील सुटत नव्हते. अशावेळेस चरखे फिरवीत कोण बसणार? असें करतांना कंटाळून मीं चरखा प्रचार करण्याचें सोडून दिलें व पुढें कांहीं दुसरें काम पहावें या विचारांत होतों. याच सुमाराला महात्मा गांधींच्या पद्धतीविरुद्ध महाराष्ट्रांत जी चळवळ सुरू झाली, तिच्यांत मी सामील झालों व रावबहादूरांकडे नोकरी लागण्यापूर्वी कांहींतरी काम मिळावें या हेतूनें एक खेप पुण्यास केली. कांहीं काम मिळालें नाहीं. उपदेश खूप मिळाला. पण सर्टिफिकिटें देण्यांत अत्यंत "उदारधी" अशा पुण्यांतील एकदोन राष्ट्रीय पुढाऱ्यांस भेटून त्यांचीं सर्टिफिकिटें मागितलीं, आणि त्यांनीं मन थोर करून माझी किंवा माझ्या कामाची त्यांस बिलकुल माहिती नसतां केवळ राष्ट्रप्रेमासाठीं स्तुतीनें भरलेलीं सर्टिफिकिटें दिलीं. तीं सर्टिफिकीटें देण्यांत देखील त्यांची बाणेदार "राष्ट्रीय पॉलिसी" व्यक्त होत होती. त्यांना सरकारी अधिकाऱ्यांचा पाडाव करावयाचा होता. लोक सरकारी अधिकाऱ्यांपाशीं सर्टिफिकिटें मागतात, लोकाग्रणींपाशीं मागत नाहींत, ही जी लोकांची गुलाम मनोवृत्ति आहे, ती हाणून पाडावयाची होती. यासाठीं ते सर्टिफिकिट मागणारांस चांगलें "सर्टिफिकिट" देऊन उत्तेजन देत असत. आणि याबद्दल आमच्या सारख्या मंडळींना त्यांच्याकडे जावेंसेंही वाटे व त्यांच्या देशकल्याणाच्या प्रचंड योजनांस सहानुभूतीही दाखवावी लागे.

पुण्याच्या पुढाऱ्यांकडून सर्टिफिकिट मिळालें पण काम मिळालें नाहीं. तेव्हां काम कसें मिळवावें याचा विचार करीत एका चहाच्या दुकानांत बसलों होतों. साडे चार वाजतांची वेळ होती. दुकानांत गर्दी नव्हती. तो दुकानदार माझ्याशीं कांहींतरी कारणामुळें गप्पा मारण्यास प्रवृत्त झाला. तो महात्मा गांधींचा एकदां अनुयायी होऊन हात पोळून बसला होता. त्यानें माझ्या डोक्याची खादी टोपी पाहिल्याबरोबर प्रश्न विचारले होते व पुढें बोलण्यांत कांहींतरी गोष्ट

उत्पन्न झाली. आज ती आठवत नाहीं. तथापि मला गांधींचा उपदेशक समजून त्यानें माझ्यावरच तोंडसुख घेतलें. त्याच्या बोलण्यांत एक मुद्दा होता तो हा कीं, देशस्वातंत्र्यासाठीं प्रत्येकाला कांहींतरी आपण करावयास सांगितलें म्हणजे सर्व लोकांस आपण कांहींतरी करीत आहों व आपण एक पुढारी आहों अशी भावना होते. आणि ते आपली जाहिरात करीत बसतात. हें जाणूनच महात्माजींनीं " चहा बंद करा " म्हणून सांगावयास सुरवात केली. नाहींतर चहा बंद होणें आणि देश-स्वातंत्र्य याचा काय संबंध आहे? गांधीची लवाडी तुम्ही उपदेशकांनीं पोट जाळण्या-साठीं फैलावली आणि लोकांना भलभलत्या गोष्टी सांगून लोकांच्या आयुष्याचा आणि धंद्याचा खराबा केला. काय म्हणे, अमदाबादला चहा बंद झाला, सुरतेला बंद झाला, अशा तऱ्हेच्या खोट्या बातम्या ज्या कॉंग्रेसच्या भारलेल्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करवून त्या लफंग्यानें पुण्याच्या चहाच्या दुकानदारांनाही बनविलें, आणि आमच्या हातूनच आमचें नुकसान करविलें. असल्या त्या गांधींचे तुम्ही एजंट आहांत काय? चहावाल्यानें असें मला विचारलें. गांधींचे आम्ही एजंट नाहीं. तुमच्या सारखेच आम्ही हात पोळलेले आहों, असें त्यांस आम्हीं उत्तर दिलें. आम्हीं खादी प्रचार केला, तथापि आतां तो सोडून दिला आहे. आणि आतां पुढें काय करावयाचें या विचारांत आहों, असें जेव्हां त्यांना कळलें तेव्हां त्या चहावाल्यानें संध्याकाळीं आपण पुन्हां इकडे या. आमचें दुकान आम्ही ९ वाजतांच बंद करितों. आणि मग आमची मित्रमंडळी येथें जमा होते. तर आपण त्या वेळेसच यावें. "आतां पुढें काय करावें" हा प्रश्न तुमच्याही पुढें आहे तर आमची मंडळी काय मार्ग काढतील त्यांतच तुम्ही मिळा म्हणजे झालें असें त्यानें सांगितलें. मीं तें आनंदानें कबूल केलें.

संध्याकाळीं ९ वाजल्यानंतर चहाच्या हॉटेलचें बाहेरील दार बंद झालें व एका मोकळ्या ठेवलेल्या फळींतून निरनिराळी मंडळी येऊं लागली व संध्याकाळीं तें अर्थात सभागृह झालें. बसायला टेबल-खुर्च्या होत्याच, आणि चहाची सोय स्वाभा-विकपणें होतीच. त्यामुळें आमची सभा वकील मंडळीच्या घरच्या सभांपेक्षां अधिक सत्कारयुक्त आणि झोंकबाज आहे असा भास त्यावेळेस झाल्याशिवाय राहिला नाहीं. सभा खरी "राऊंड टेबल" पद्धतीचीच होती. अध्यक्ष नव्हताच. तथापि मंडळीमध्यें एका व्यक्तीस अनेकजण मान देतात असें दिसून येत होतें. भावी राजकारणांत भाग आपण काय घ्यावयाचा याविषयीं चर्चा करण्याकरतांच विचार-

विनिमय चालला होता. त्या सभेला कोण कोण मंडळी हजर होती त्यांचीं नांवें देण्यांत अर्थ नाहीं. कारण बहुतेकांचीं नांवें आज मी विसरून गेलों आहें. त्यांत जे एक इतरांस मान्य आणि वक्तृत्ववान् पुढारी गृहस्थ होते, त्यांस हरीभाऊ म्हणत, एवढेंच मला आठवतें. हरीभाऊंनीं शांतपणें अनेकांचें म्हणणें ऐकून घेतलें व शेवटीं आपलें मत सांगितलें. ते म्हणाले,

"माझा गांधींवर फार विश्वास नाहीं; पण माझा कोणत्याच पुढाऱ्यावर विश्वास नाहीं. गांधींच्या चळवळीमुळें आपण निदान हिंडून प्रचार करण्याचा धंदा तरी शिकलों. आतां आपलें कर्तव्य हें आहे कीं, मिळालेल्या शिक्षणापासून होणारा फायदा आतां आपण पदरांत पाडून घेतला पाहिजे. आपण आतां धंदेवाईक राजकारणी बनलें पाहिजे. 'नवरा मरो वा नवरी मरो' भटाला 'दक्षणा' मिळाली पाहिजे. त्याप्रमाणें हा पक्ष पुढें येवो किंवा तो येवो, आपली हस्तक म्हणून राजकारणाचें काम नित्य करणारांची, भाकरी शाबूत राहिली पाहिजे एवढेंच आपण पाहूं. स्वराज्य चहा सोडल्यानें मिळेल किंवा सूत कांतल्यानें मिळेल किंवा उपास केल्यानें मिळेल यांपैकीं कोणत्याहि गोष्टीवर आपला विश्वास नाहीं. तरीही वाहत्या गंगेंतच आपण हात धुऊन घेतले पाहिजेत. हे चहाचे दुकानदार हे एक बळी पडलेले गृहस्थ आहेत. तथापि तसे आपण नाहीं. आपल्यापैकीं पुष्कळांना कोणताच धंदा कायमचा नव्हता. आपल्याला जो कामाला ठेवील त्याचें तुणतुणें वाजवावयाचें हा आज तरी आपला धंदा झाला आहे. कोणच्या मताचें आपण व्हावयाचें हा प्रश्न वेळोवेळीं आपला रागरंग पाहून सोडविला पाहिजे. आपण सैनिक आहों, मुत्सद्दि नाहीं. आपणांस हुकमी काम करावयाचें असतें. कार्याची दिशा इतर वरचे लोक ठरवितात. सध्यां आपण मतप्रचारक आहोंत. मतप्रचार मतप्रचार म्हणजे काय? तर लोकांच्या-कडून वर्गणी काढण्यासाठीं लोकांना त्या मताचें बनविणें हा होय. ज्या मताचा प्रचार लवकर होईल व लोकांकडून वर्गणी मिळेल तें मत अधिक खरें अशी आपली दृष्टी असे. आपले प्रस्तुत चहावाले मित्र यांस आपण महात्मा गांधींच्या नादाला लागून खोटा उपदेश करून फसविलें हा यांचा आपल्यावर आक्षेप आहे. यांची झालेली नुकसानी आपण कोणत्या तरी तऱ्हेनें भरून काढूंच. कोणी रावबहादूर निवडणुकीला उभा राहिला तर आपण त्यांची किफायत करून देऊं. आतां निवड-णूक जवळ येणार आहे तर आपणांस तींत पडलेंच पाहिजे; तरच आपला कांहींतरी निभाव आहे. राजकारणांत प्रचारकाचा धंदा कधीं करावा तर कधीं मतें मिळवि-

ण्याचा धंदा करावा. म्हणजे कायमचा धंदा आपणांस मिळेल. विशेष व्यक्तीला मतें मिळावींत याबद्दल खटपट करावी लागणार. अमक्या रावसाहेबांना मतें द्या असें लोकांना सांगतांना कांहीं कारण दाखवावें लागतें. आपणच उमेदवारानें कसें बोलावें हें ठरविलें पाहिजे! अमूक गृहस्थ अमक्या मताचे आहेत असें सांगून जर निवडणूक जिंकतां येईल, तर आपण त्या मताचे तुम्ही व्हा म्हणून त्या उमेदवारास सांगावें. वारा कोणाच्या दिशेनें वाहात आहे हें लोकांशीं प्रत्यक्ष संबंध असल्यामुळें आपल्याला कळतें व लोक कोणत्या गोष्टींबद्दल ओरड करतात हेंहि आपल्याला कळतें. तर त्या ओरडीचें कारण नाहींसें करण्यासाठींच अमुक उमेदवार निवडणुकीला उभे आहेत असें आपण इकडे लोकांना सांगावें व त्या उमेदवार साहेबांच्या ( हस्तपत्रिकेंत ) ती गोष्ट आपणच घालावी. आणि आपण हस्तपत्रक तयार करून रावसाहेबांची केवळ सही घ्यावी. निवडणुकीच्या वेळेस पाहिजे तें अभिवचन कोणताहि उमेदवार बिनदिक्कत देतो. राष्ट्रीय पक्षानें खरी निवडणूक हीच लढवयाची आहे. मागच्या निवडणुकीच्या वेळेस आपण लोकांस मतें देऊंच नका, बहिष्कार घाला असें सांगत होतों. आतां आपण असें ठरवूं कीं वाटेल त्यानें वाटेल त्या उमेदवाराच्या मदतीस जावें, पैसे देईल त्याचें काम करावें व तुम्ही आम्ही जे खरे राजकारणी ते एकमेकांविरुद्ध जरी काम करीत असलों, तरी आपण व्यक्तिशः स्नेहीच राहिलें पाहिजे. राजकारण हा केवळ ' ठकवे ' आणि ' स्वार्थी ' लोकांचा बाजार आहे. त्या बाजारांत आपण आपल्या प्रामाणिक परिश्रमाची योग्य किंमत घेतली पाहिजे."

सांगावयाची गोष्ट एवढीच कीं हें हरीभाऊंचें भाषण सर्व लोकांस तंतोतंत पटलें. आणि बऱ्याच मंडळींनीं इलेक्शन एजंटचें काम करावयाचें असें ठरविलें. एक मोठा "कार्यकर्त्यांचा संघ" याच बैठकींत तयार झाला असें म्हणतां येईल. हरीभाऊंनीं इलेक्शन एजंटचा कायदा सांगणारें एक पुस्तक बरोबर आणलें होतें. आणि त्या पुस्तकांत काय आहे हेंहि त्यांनीं त्यानंतर अर्धा पाऊण तास व्याख्यान देऊन समजावून सांगितलें.

या दुकानांत जो संघ स्थापन झाला त्याच्याठायीं कर्तृत्व अनेक प्रकारचें वागत होतें. या संघानेंच स्वराज्यपक्षाला निवडून आणलें असें म्हणावें लागेल. या खऱ्या राजकारणी मंडळीचा इतिहास मी सांगत नाहीं. त्यांच्या खटपटीचा परिणाम सर्वांस ठाऊक आहेच.

—x—

प्रकरण २० वें.

## निवडणूकशास्त्रांत माझें शिक्षण.

मागच्या प्रकरणांत मीं सर्टिफिकिटें कशीं मिळविलीं तें सांगितलें आहेच. त्या संघामार्फतच मी वांद्यास रावबहादूर आपट्यांसंबंधी बातमी मिळविली व त्या सर्टिफिकिटांवर मला नोकरीहि मिळाली. पुढाऱ्यांच्या सर्टिफिकिटांप्रमाणें मी स्वराजिष्टच होतों तरी गांधीटोपी घालीत होतोंच, व त्यामुळें माझा फायदाहि होत होता. कां कीं, त्याच्या योगानें जरी मी कौन्सिल पक्षाचा आहें असें बोलून दाखवीं तरी माझें अंतःकरण गांधीपक्षांकडे आहे, असेंहि लोकांस भासविण्यास त्या टोपीचा उपयोग होई. विचारांत व आचारांत सुसंगतता हें कदाचित् वेड्या लोकांचें ध्येय असेल, परंतु व्यवहारज्ञांनीं असंगतीच ठेविली पाहिजे, हें "गनिमी काव्याचें तत्त्व" मी पुण्यास जाऊन देखील शिकलों नाहीं तर मला शहाणा कोण म्हणेल ? रावबहादूर आपट्यांनीं माझी नेमणूक केली, ती देखील त्याच तत्त्वावर होती. ते सरकार पक्षाचे आहेत म्हणून जरी बोभाटा होता, तरी त्यांस गांधीपक्षाचाच कारकून व इलेक्शन एजंट हवा होता. ते माझ्याशीं रावबहादुरीचा त्याग करण्याविषयीं बोलत आणि मी तें गांवांत जाऊन बोलत असें. त्यांनीं मला प्रथमतः इलेक्शन एजंट म्हणून नेमलें नाहीं तर कारकून म्हणून नेमलें. आणि मागाहून दोन तीन महिन्यांनंतर इलेक्शन एजंट केलें. असें करण्यांत त्यांचा हेतु असा होता कीं, इलेक्शन पुरता गांधीटोपीवाला जवळ केला असें लोकांस वाटूं नये. गांधीटोपीवाला वकिलाचा कारकून म्हणून घेतला व पुढें तो इलेक्शन एजंटचें काम करूं लागला, असें लोकांस वाटावें.

रावबहादुरांनीं आपण कोणत्या पक्षाचे हें अद्याप ठरविलें नव्हतें. त्यांनीं माझ्या मार्फत पुण्यांतील स्वराज्यपक्षाशीं पत्रव्यवहार ठेविला होता. व आपण "स्वराज्यपक्षाचे" आहोंत, निदान होण्याचा संभव आहे अशा तऱ्हेचीं पत्रें माझ्या सहीनें पुण्यांतील पुढाऱ्यांस जात. व मी "प्रागतिक" आहें असें कळविणारीं पत्रें ते इंग्रजींत स्वतःच पुण्याच्या प्रागतिक मंडळीस लिहीत असत. आणि गांवांत "मी कोणत्याच पक्षाचा नाहीं" असें बोलत. पुण्यांतील राजकारणी मंडळी आमच्या दुटप्पी पद्धतीवर विश्वास ठेवीत

असें नाहीं. तथापि ते विश्वास नाहीं असें मात्र दाखवीत नसत. मध्यवर्ती राजकारणी मंडळींची दृष्टी अशी असते कीं, जो निवडून येण्याची खात्री असेल त्यासच आपला उमेदवार म्हणून कबूल करावें. त्याचीं मतें कांहीं कां असतनां! तो निवडून येण्यासारखा असला, व त्यास आपला उमेदवार म्हटलें व तो निवडून आला म्हणजे आपला पक्ष यशस्वी झाला असाच गाजावाजा होणार! उलटपक्षीं रावबहादुरांनीं मात्र आपण कोणत्या पक्षाचे हें अजून नक्की केलें नव्हतें. कां कीं, कोणता पक्ष यशस्वी होणार हें त्यांस पहावयाचें होतें व जो यशस्वी होण्यासारखा पक्ष असेल त्या पक्षाचे आपण आहोंत असें ते म्हणवून घेणार होते.

रावबहादुरांची अर्थात्, विशिष्ट पक्षाच्या अनुयायित्वाच्या जोरावर आपण निवडून येऊं अशी वेडी आशा मुळींच नव्हती. आपण लोकप्रिय होत चाललों, आपणांस निवडून येण्याचा संभव अधिकाधिक दृढ होऊं लागला म्हणजेच "पक्षातर्फे उमेदवार" म्हणून आपण मानले जाऊं ही गोष्ट तें चांगल्या तऱ्हेनें ओळखून होते व त्यांनीं या गोष्टी मला फार उत्तम तऱ्हेनें स्पष्ट करून सांगितल्या व रावबहादूर प्रत्येक काम पद्धतशीर रीतीनें करीत असल्यामुळें, आपणांस एक महत्त्वाचा अनुभव मिळत आहे ही गोष्ट मला भासूं लागली. व निवडणुकीच्या युद्धांतील हत्यारांशीं माझा त्यांनीं चांगला परिचय करून दिला. रावबहादूर वांद्र्यास रहात पण त्यांची वकील कोठी मुंबईस होती. त्यांनीं मला इलेक्शन एजंट नेमलें तेव्हां मला त्यांनीं ठाणें येथें निराळें ऑफीस उघडून दिलें, व तेथें ते आठवड्यांतून दोन वेळ येत, व मीं काय काम केलें याचा आढावा घेत. ठाण्यांत त्यावेळेस "साष्टीवैभव" नांवाचा छापखाना होता व कोर्टांतील नोटीसा मिळविण्याकरितां त्यानें "साष्टीवैभव" पत्रहि कसेंबसें चालविलें होतें. या छापखान्याचा टाईप जुना झाला होता. या छापखान्याचीं बिलें थकलीं होतीं व त्यास उद्यांचा दिवस कसा जाईल ही मोठी अडचण पडली होती. त्या छापखान्यांत रावबहादुरांच्या सुचनेनें परंतु सहजगत्या तिऱ्हाईत मित्राबरोबर गेलों असें दाखवून त्याच्या मालकाशीं मीं ओळख करून घेतली व त्यानंतर दोनतीनदां त्यांच्याकडे जाऊन चहा पीत पीत ती ओळख स्नेहापर्यंत नेऊन भिडविली. त्यांस सांगितलें कीं तुम्हीं जर जिल्ह्यांतील लोकांचा पक्ष घ्याल तर तुमचें पत्र मी लोकप्रिय करून दाखवितों व तुमच्या छापखान्याला कामहि आणून देतों. तो अर्थात् कबूल झाला.

रावबहादुरांनीं कोणते प्रश्न उपस्थित केले असतां, आपली चळवळ लोकप्रिय होईल व आपण लोकप्रिय होऊं याची यादी तयार केली, आणि लोकहिताची कळकळ बाळगणारे आपण आहों, असें कोणत्या चळवळी हातीं घेतल्या असतां लोकांस भासेल हें मतदारांची यादी पाहून तपासून ठरविलें. ठाणें-कल्याणहून मुंबईला रोज जाणारे किती लोक आहेत हें त्यांनीं तपासून पाहिलें. मुंबईच्या उपनगर विकासाच्या योगानें किती लोकांच्या जमिनीवर गदा येणार आहे व त्यांतील मतदार किती आहेत हें पाहिलें; मिठागरावर व्यापार करणारे लोक किती आहेत व त्यांत मतदार किती आहेत हें अजमाविलें. व या तऱ्हेनें निरनिराळ्या वर्गांचें परीक्षण करून त्यांनीं आपल्या चळवळीची योजना तयार केली. या प्रत्येक वर्गांत त्यांचे कांहीं पक्षकार होतेच. व त्यांच्याकडून त्यांच्या तर्फेनें मांडणी करण्यास ज्या गोष्टी अवश्य होत्या त्याहि मिळविल्या. या सर्व गोष्टी रावबहादुरांनीं जरी केल्या तरी प्रत्यक्ष क्रिया माझ्याच हातून झाली होती. इकडे मी साष्टी वैभवकर्त्यास आपलेंसें करून घेतलें होतें. आणि एकदां त्याच्या कारखान्यांतील लोकांनीं पगारासाठीं जेव्हां संप केला, तेव्हां मी त्या दिवशीं त्याच्याकडे गेलों व आमचीं गाऱ्हाणीं जर छापाल तर त्या अंकाच्या हजार प्रती विकत घेऊं असें अभिवचन दिलें. तेव्हां मी "संकटांत तारणाराच आलों असें त्यास वाटलें." पुढें जेव्हां जेव्हां त्यांस नवा टाईप घेण्यास वगैरे पैशाची मदत लागूं लागली तेव्हां त्यांस पैशाचीहि मदत केली व त्याच्या-कडून प्रॉमिसरी नोटा लिहून घेतल्या, व येणेंप्रमाणें त्यांस पूर्णपणें आपला अंकित करून घेतलें. "डेव्हलप्मेंट" खात्याच्या जुलमाबद्दल मिठागराच्या लोकांस फायदा न होतां नुकसान कसें होत आहे याजबद्दल, तसेंच लोकल गाड्यांतून होणाऱ्या गैरसोईबद्दल, "साष्टी वैभवांत" रावबहादुरांचे वारंवार लेख येत गेले व त्यामुळें ठाणें, कुर्ला, वांद्रें येथें साष्टी वैभवाचा खप अधिक अधिक होत गेला व ज्या मतदारांपर्यंत रावबहादुरांस या खपानें पोंचतां येईना त्या मतदारांस साष्टी वैभवाचे किरकोळ अंक एका पैशांत पाठविण्याची व्यवस्था आम्हीं केली. साष्टी वैभवाच्या गरीब व कर्जबाजारी मालकांस वांद्र्यास आणून मुद्दाम पान-सुपारी करविली.

साष्टी वैभवाचें महत्त्व लोकांत वाढतच होतें व त्याजबरोबर रावबहादुरांची कीर्तीहि वाढतच होती. साष्टी वैभवांतील उतारे मुंबई-पुण्याच्या पत्रांत प्रसिद्ध होत जाऊन ही अन्यायाविरुद्ध जोरानें चळवळ करण्याबद्दल रावबहादुरांची तारीफ

करण्यांत येऊं लागली. व या रावबहादुरांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळें "तुम्ही आमच्या पक्षाचे उमेदवार म्हणून उभे रहा" म्हणून पुण्याहून पत्रेंही येऊं लागलीं. रावबहादूर नसतें विघ्न उपस्थित झालें नसतें तर खात्रीनें निवडून आले असते, असें मी खास म्हणूं शकतों.

सांगावयाचें म्हटल्यास निवडणुकीस उभे राहाणारे उमेदवार आणि त्यास उभे करणारे लोक यांत खरे संबंध कसे असतात आणि अमूक पक्षाचा किंवा मताचा आपण म्हणावयाचें आणि सरकारच्या भक्ष्यस्थानीं पडावयाचें हें कसें शक्य होतें याचें कारण मला स्पष्ट कळलें. डॉ. घैसास यांच्या घरीं कामाला असतां जी मला बरोबरीच्या नात्यानें वागण्याची संवय पडली होती ती माझ्या ठायीं अजूनहि होती. आणि यामुळें रावबहादुरांचें अंतरंग व त्याबरोबर साष्टींतील अनेक व्यक्तींच्या वृत्ती-संबंधानें रावबहादुरांचीं मतें त्यांच्याच स्पष्टीकरणानें मला स्पष्टपणें कळत असत.

—×—

प्रकरण २१ वें.

## रावबहादुरांचा खासगी आयुष्यक्रम.

रावबहादुरांची दिनचर्या व खासगी आयुष्यक्रमहि साधारणपणें कशा प्रकारचा होता याविषयीं थोडेंसें सांगितलें पाहिजे. रावबहादुर पाहांटे उठत. पांचपासून साडेसात वाजेपर्यंत त्यांचें वाचन होई; तें मात्र नियमानें होई. त्यावेळेस ते धंद्याव्यतिरिक्त दुसरें कांहीं निराळें वाचीत. वाचनामध्यें त्यांना "एफिशिअन्सी" वाढविणाऱ्या पुस्तकांचा नाद होता. धार्मिक पुस्तकें क्वचितच ते वाचीत. पण राजकारणावरील पुस्तकें वाचीत असत. ते कधींकधीं मला काम सांगण्यासाठीं बोलावीत व माझी निजण्याची सोयहि तेथेंच करीत. यामुळें त्यांचा घरचा आयुष्यक्रम माझ्या चांगलाच नजरेस पडला. त्यांचा वांद्र्याचा बंगला मोठा होता पण तो भाड्याचा होता. त्यांचें कुटुंब अगदीं जुन्या पद्धतीचें पण बालबोध वळणाचें होतें. सौ. बयाबाई या नेहमीं काळजींत दिसत असत. त्यांना कांहींतरी हृद्रोग लागल्यासारखें दिसत होतें. त्यांना दोघी मुली होत्या. त्यांच्या लग्नासाठीं चांगला हुंडा देऊन मोठ्या सर-

दार घराण्यांत त्यांस दिलें होतें. एक जांवई तर प्रत्यक्ष " फ्युडेटरी चीफ् " होते. त्यांच्या सहवासामुळें रावबहादुरांनाही थोडेसे सरदारी मूर्ख चाळे सुचले होते.

त्यांचे जावई जर कोठें जेवावयास गेले तर स्वतःसाठीं आपल्या घरून चांदीचें ताट बोलावीत. त्यांचेंच अनुकरण रावबहादुर करूं लागले. असें केल्यानें आपली उच्चता वाढते असें त्यांस वाटे. कधीं त्यांनीं दुसऱ्या कोणास घरीं जेवावयास बोलाविलें तर आपण चांदीच्या ताटांत जेवावयास बसून, पाहुण्यास जेवावयास साधें ताट द्यावयाचें असाहि प्रकार त्यांनीं चालू ठेविला होता. एकदां एका स्नेही वकिलानें मात्र त्यांची मौज केली. तो स्वतः केळीच्या पानावर जेवायला बसला, रावबहादुरांस चांदीचें ताट दिलें व अर्धें जेवण चालू असतां आपल्या कारकुनास जेवायला बसविलें व त्यालाहि चांदीचें ताट दिलें. असा प्रकार ज्या वकिलानें केला त्याविषयीं द्वेषबुद्धि रावबहादूर जन्मभर विसरले नाहींत. त्याला अराजनिष्ठ ठरविण्याचा रावबहादुरांनीं कसा प्रयत्न केला हें वांद्रांच्या मंडळींना अजून पक्कें आठवत असेल. रावबहादूर उदारहि होते. परंतु जें औदार्य लोकांस समजून येईल त्या कार्यासाठीं पैसे द्यावयाचे असा त्यांचा प्रकार होता.

घरीं सर्व प्रकारचीं धर्मकृत्यें ते अवश्य करवीत. घरीं एक उपाध्याय होता. तो वैश्वदेव व पूजा करीत असे. त्याची बायको सौ. बयाबाईस सर्वप्रकारें मदत करी. कांहीं निमित्तानें चार ब्राह्मण जेवावयास बोलवावेत असें सौ. बयाबाईच्या मनांत आलें तर त्यांस सर्वप्रकारें मोकळीक असे.

रावबहादुरांची एवढीच अट होती कीं आपल्या नित्य क्रमांत मुळींच विलंब होतां कामा नये. जे ब्राह्मण घरांत जेवावयास येत त्यांना " आम्ही पैशाच्या मागें लागलेलीं माणसें, आम्हांस, आपल्यासारख्या विद्वानांच्या पंक्तीचाहि लाभ घडत नाहीं. आम्ही जेवतांना अगोदरच उठून जाऊं किंवा अगोदरच जेवावयास बसूं, याबद्दल माफ करा. आपण आमच्या चिरंजीवाच्या बरोबर बसा, आणि स्वस्थ जेवा. आमच्या घरांत आमचे चिरंजीव आणि आमच्या सौभाग्यवती, या मालक आहेत, आणि आमचें फक्त एक काम आहे आणि तें म्हटलें म्हणजे घरांत लागणारा पैसा आणून द्यावयाचा. " एवढेच विनयाचे पण मोजके शब्द बोलण्यास रावबहादूर विसरत नसत. श्राद्धदेखील आचार्यद्वारा ते करीत. या गृहस्थाचा देवावरहि विश्वास आहे किंवा नाहीं अशी शंका येई. आपण पूर्ण नास्तिक आणि आपली बायको पक्की जुन्या समजुतीची व दोघांनाही आपआपल्या मताप्रमाणें

वागण्याचा हक्क आहे. पण दोघांमधील विचारविरोध आपण जगाच्या नजरेस येऊं द्यावयाचा नाहीं व उलट एकमेकांशीं पूर्ण सहकारिता आहे, असें दाखवावयाचें व आपल्या नित्यकामांत कोणतीहि अडचण उत्पन्न होऊं द्यावयाची नाहीं. बायकोच्या धार्मिक भावनांमुळें सालचा एक हजार रुपये खर्च करावा लागेल. लागला तर लागला. घरांत प्रत्येक खर्चावर लक्ष ठेवून आपल्या पैशाचें रक्षण करण्याचें काम बायकोनेंच उत्तम प्रकारें केलें कीं नाहीं? ती नसती तर आपण इतका संचय करूं शकलों असतों का? अर्थात् नाहीं. तर ती मिळवतीच आहे, आणि तिला वाटेल तितका पैसा स्वतःच्या इच्छेनें खर्च करण्याचा हक्क आहे. अशा प्रकारची त्यांची भावना होती, व ते या प्रकारचे विचार मधून मधून बोलूनहि दाखवीत असत. रावबहादुरांचे एकुलते एक चिरंजीव बारा तेरा वर्षांचे होते.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे माझ्या दृष्टीनें तरी रावबहादूर हे महाराष्ट्रीय सभ्य गृहस्थाचा नमुना होते. स्वार्थ आणि परार्थ यांची सांगड कशी घालावयाची, आपला रुबाब कसा राखावयाचा, याविषयीं त्यांचें पुष्कळ अंशीं अनुकरणच केलें पाहिजे असें वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. आदर्शवत् महाराष्ट्रीय कुटुंब कोणतें असें विचारलें असतें तर मीं रावबहादुरांचें असें उत्तर दिलें असतें. रावबहादुरांनीं एकपत्नीव्रत पाळलें होतें अशांतला भाग नाहीं. त्यांच्या परिचयाच्या मुंबईस कांहीं स्त्रीव्यक्ति असत हें मला ठाऊक आहे. तथापि त्यांच्या सर्व कृत्यांवर सभ्यतेचें आणि गोंडसपणाचें आवरण होतें. आणि त्यांनीं आपलें स्त्रीविषयक नियमबाह्य वर्तनदेखील इतक्या कडक नियमांनीं बांधलें होतें कीं त्यांच्या वागणुकीविषयीं आक्षेप घेणें त्यांच्या इतके पैसे मिळविणाऱ्या फार थोड्यांस शक्य होतें. ते मला नोकर म्हणून वागवीत नसून बरोबरीच्या नात्यानें वागवीत असें मागें सांगितलें; पण त्या विधानांत देखील सुधारणा केली पाहिजे. एखादा शिक्षक ज्याप्रमाणें विद्यार्थ्यांशीं वागतो त्याप्रमाणें माझ्याशीं रावबहादूर वागत. इलेक्शन एजंटचें काम जणूं काय मी त्यांना तें शिकविण्यास फी दिली आहे म्हणूनच ते मला शिकवीत आहेत. प्रत्येक गोष्ट "थरो" पाहिजे, आम्ही "एफिशिअंट" झालें पाहिजे, आपल्या पुढील प्रश्नाचा शास्त्रीय अभ्यास झाला पाहिजे, मग स्वराज्य आपल्या हातचेंच आहे असें ते वारंवार बोलत असत.

रावबहादुरांचा मी नकळत शिष्य झालों. त्यांचीं जशीं मतें होतीं तशींच माझीं बनलीं. आणि रावबहादूर निवडून येण्यांत राष्ट्राचें कल्याण आहे असें मलाच वाटूं

लागलें. मी कांहीं ठिकाणीं रावबहादुरांस नकळत त्यांची स्तुति करणारीं व्याख्यानें दिलीं. त्या व्याख्यानांची तारीफ त्यांना परस्परच ऐकूं गेली तेव्हां ते मजवर प्रसन्न झाले आणि म्हणाले कीं, मी खास निवडून येणार !

—×—

प्रकरण २२ वें.

## रावबहादुरांचें कौटुंबिक रहस्य आणि मानवी योजनांचें वैयर्थ्य

रावबहादुरांच्या घरीं जाणारे येणारे पाहुणे पुष्कळ होते. पण ते सगळे त्यांच्या कुटुंबाचे किंवा त्यांच्या जांवयांचे नातेवाईक होते. खुद्द त्यांचे नातेवाईक कोणी मला दिसले नाहींत. त्यामुळें त्यांचा आगापिछा मला कांहीं कळला नाहीं. त्यांचें "ब्रह्मावर्तचें घर" एका शाळेनें घेतल्याबद्दल आलेल्या बारा हजारांचा चेक त्यांच्या कारकुनानें पाहिला होता एवढेंच. घरीं येऊन उतरणाऱ्या मंडळींत एक मनुष्य नात्या-गोत्याचा नसलेला असा मीं पाहिला. तो रावबहादुरांच्या नातेवाईकांपैकीं नव्हता. उलट तो भिन्न शाखेचा देशस्थ ब्राह्मण होता. त्यावरून सहज कळून येई. तो गृहस्थ पाहुणा आला म्हणजे रावबहादूर फार घाबरल्यासारखे वागत असत, व तो गेला म्हणजे आपण मोठ्या पीडेंतून सुटलों असें वाटे. हा पाहुणा दुसरा कोणी नसून नाशिकचा मीं अनेकदां पाहिलेला बाबुराव उपासनी ऊर्फ चंदुशास्त्री. ही व्यक्ति मीं पुष्कळदां पाहिली होती. त्यांचा धंदा काय हें पुष्कळांना गूढ होतें. यांची त्यावर इस्टेट मात्र वाढत होती. हा स्वतःला शास्त्री म्हणवून घेत होता. पण याला एक मंत्रदेखील सांगण्याचें ज्ञान नव्हतें. यामुळें हा पोळपाट लाटणें हातीं घेणार म्हणून त्याच्या बापानें भविष्य केलें होतें असें म्हणतात. पण तो आपल्या बापाला "तुमच्या-सारखीं अनेक माणसें मी कामाला ठेवीन" म्हणून म्हणाला होता असेंहि लोक म्हणत. हें त्याचें म्हणणें तात्पुरतें तरी खरें होतें. यानें स्वतः भिक्षुकीस हातहि

लावला नाहीं. आपलीं कुळें त्यानें भिक्षुकांस खंडानें दिलीं व तो खंड मधून मधून वाढवीत राहिला. अशातऱ्हेनें कांहींएक न करितां कुटुंबनिर्वाहापुरते पैसे तो मिळवीत असे. बाहेर जाऊन येऊन कांहींतरी करून तो आपला पैसा वाढवी. तो काय करीत होता हें मात्र गूढ होतें.

एके दिवशीं मी रावबहादुरांकडेच राहिलों होतों. रात्रीच्या वेळेस ९ वाजतां रावबहादूर मोठ मोठ्यानें बोलत होते. आणि तिकडे काय झालें म्हणून पहावयास मी गेलों तों चंदूशास्त्री खोलीच्या बाहेर स्मितमुद्रेनें पडत होता. तो गेल्यानंतर शांत सामसूम झालें. मी दाराच्या फटींतून पहात होतों. तों रावबहादुरांच्या हातांत चेक बुक होतें. व दहा हजारांचा आंकडा व उपासनीचें नांव हीं मला त्यावर स्पष्ट दिसलीं. रावबहादुरांनीं आपल्या खोलींत टेबलावर डोकें टेकलें होतें; त्यामुळें मी पहात होतों हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं.

यानंतर कांहीं दिवसांनीं मी रावबहादुरांस भेटावयास गेलों. ते यावयास उशीर होता. तेव्हां सौ. बयाबाई म्हणाल्या कीं, तुमचें रावबहादुरांवर वजन आहे. तुम्ही पहातांच कीं, त्यांची प्रकृति अगदीं क्षीण होत चालली आहे. त्यांच्यानें आतां काम फारसें होणार नाहीं. मग आणखी कौन्सिलचा खटाटोप कशाला ! ते कौन्सिलांत गेले तरी काम होणार नाहीं. त्यांना आतां कोंकणांत किंवा दुसऱ्या कोठेंतरी खेड्यावर जाऊन रहावयाचा सल्ला द्या. माझ्या मनास बयाबाईंचें म्हणणें पटलें. जसजसा उपासनी "शास्त्री" च्या भेटी अधिकाधिक होऊं लागत तसतसे रावबहादूर अधिक चिडखोर होत चालले आहेत असें मला भासूं लागलें. तो उपासनी कोणत्या प्रकारचा मनुष्य आहे हें मला ठाऊक होतें. पण रावबहादूर त्याला फार भिऊन कां वागत हें समजत नसे. मलाच पुष्कळदां असें वाटे कीं, आपणच कांहींतरी कुरापत काढून या उपासनी बरोबर भांडण करावें, व त्याला पुरा चेंचून लंबा करावा. लेकाचा घरांत सवाईमालकासारखा वागे. आणि मलाच एकदां हुकूम करूं लागला होता. माझें व बयाबाईंचें बोलणें झाल्यानंतर कांहीं वेळानें रावबहादूर आले. पण त्यांच्या अगोदरच उपासनी तेथें येऊन बसला होता व तो रावबहादूर आल्यानंतर लगेच त्यांच्या खोलींत शिरला. कांहीं वेळानें रावबहादूर "माझा तूं पुरा मागच्या जन्मीचा वैरी आहेस. पण मी तुला बिलकूल भीत नाहीं. एक पैहि तुला देणार नाहीं. तुला वाटेल तें तूं कर." असें म्हणाले. इतक्यांत रिव्हॉलवरचा वार झाला.

तो बार ऐकल्यावर आम्ही जाऊन पाहातों तों रावबहादूर निश्चेष्ट पडले होते. त्यांच्या डोक्यांतून रक्त वाहात होतें. तो नाशिककर क्षेत्रोपाध्या जवळच होता. त्यानें उलट पोलीसला टेलिफोन केला कीं, "रावबहादूर आपटे यांनीं आत्महत्या केली आहे, लवकरच यावें." पोलीस आल्यानंतर त्यांनीं प्रथम त्या चंद्रशास्त्री क्षेत्रोपाध्याचीच जबानी घेतली. त्यानें उलट आपणच दुखावलेला पक्ष आहोंत अशी स्वतःची समजूत करून घेऊन बोलण्यास सुरवात केली. त्यानें रावबहादुरांचा पूर्ववृत्तांत सांगितला तो येणेंप्रमाणें:—

रावबहादूर आपट्यांचे आजोबा ब्रह्मावर्तास बाजीराव पेशव्यांच्या बरोबर गेले; तें आमचेंच विद्यार्थी-घराणें आहे. आज सात पिढ्या त्यांच्या पूर्वजांचे आमच्याकडे लेख आहेत. रावबहादुरांचे वडील गणेशपंत १८७० च्या सुमारास नाशिकास यात्रेसाठीं आले होते त्या वेळेस त्यांचें कुटुंब व त्यांचें अंगवस्त्र बरोबर होतें. रावबहादुरांच्या वडिलांस त्यांच्या कुटुंबापासून मूल झालें नव्हतें. रावबहादूर हे त्यांच्या अंगवस्त्राचे चिरंजीव. सखाराम गणेश हें नांव ते लावतात, तें त्यांचें खरें नांव आहे. ते अंगवस्त्राचे चिरंजीव म्हणून त्यांचें नांव आमच्या वहींत आहे. त्यांची आई महाराष्ट्रीय नसून एक परदेशी ब्राह्मणाची विधवा गणेशपंतांनीं बाळगलेली, तिचे ते चिरंजीव आहेत. रावबहादुरांनीं आपलें नांव सखाराम ठेविलें होतें तेंहि बदललेलें नाहीं; त्यामुळें तें माझ्या हातांत अचुक सांपडलें. मी मुंबईस एकदां आपल्या वह्यांची सूची घेऊन आलों होतों व तेव्हां आमचीं पुष्कळ कुळें माझ्या ओळखीचीं झालीं होतीं. त्यांत ज्या घराण्यामध्यें कांहीं व्यंग आहे असें मला माहीत झालें, त्यांकडे मीं विशेषच लक्ष दिलें.

सखारामपंत आपटे यांस प्रथम त्यांची खरी वस्तुस्थिति मला माहीत आहे असें मीं मुळींच दाखविलें नाहीं. मी त्यांच्याकडे येऊन रहात असें. पुढें एके दिवशीं त्यांना माझ्या माहितीची आठवण दिली आणि ब्राह्मण समजून 'मी आपल्याकडे जेवलों; संसर्गदोषासाठीं मला प्रायश्चित्त घेतलें पाहिजे, म्हणून प्रायश्चित्तासाठीं शंभर रुपये आपण मला दिले पाहिजेत,' असा आग्रह धरला. पण मीं त्याचा बोभाटा केला नाहीं. कांहीं दिवसांनीं रावबहादुरांच्या मुलीचें संस्थानिकाबरोबर लग्न झालें. तें लग्न होतांना मीं आडकाठी केली नाहीं. लग्न झाल्यानंतर "तुम्ही मुलीचें ब्राह्मणाबरोबर लग्न करून असा विटाळ ब्राह्मणांत कालवितां, मला त्याविरुद्ध प्रतिकार केला पाहिजे. मला तुमच्या व्याह्यांना सांगितलें पाहिजे कीं,

तुम्ही आतां मुलीला घरांत वावरूं देऊं नका. आणि मुलाचें दुसरें लग्न करून द्या. नाहींतर पुढें पोलिटिकल एजंट त्रास देईल. मुलगी ब्राह्मणाची नाहीं; लग्न कायदेशीर नाहीं, संस्थान जप्त होईल. ब्राह्मणाचें संस्थान जप्त होऊं नये म्हणून त्या संस्थानिकास जागें करणें माझें पवित्र कर्तव्य आहे. ते देखील आमचे विद्यार्थी आहेत. या वेळेस या गोष्टीबद्दल गप्प राहाण्याकरितां मीं रावबहादुरांपाशीं एक लाख रुपये मागितले. ते द्याल तर वहीचा उताराहि फाडून देतों, म्हणून अभिवचन दिलें;" पण रावबहादुरांनीं एक लाख रुपये दिले नाहींत. पांच हजार रुपये त्यांनीं देऊं केले; पण त्या वेळेस मी ते केवळ हप्ता म्हणून घेत आहें म्हणून सांगितलें. ते लाख रुपये अजून पुरे झाले नाहींत. पुढें दहा पंधरा हजार मिळाले; पण पुढें रावबहादुरांनीं मला पेचांत टाकण्याकरितां आत्महत्या केली इत्यादि.

पुढें चंदुशास्त्री यांविषयीं पोलीसनें कारवाई काय केली हें समजलें नाहीं. त्यानें पोलीसचीही मूठ दाबली असावी. माझी मात्र नोकरी गेली. मी पुढें अन्य ठिकाणीं नोकरीस लागलों व ठाणें जिल्ह्यांतून दुसरा एक उमेदवार निवडून आला.

—×—

प्रकरण २३ वें.

## पहिले "साहित्य-शिखर" दादा कावळे.

साहित्यिकांमध्यें "साहित्य-शिखर दादा कावळे" हें नांव सर्वविश्रुत आहे. आतां एक संपादकीय रहस्याचा स्फोट करतों. आज जाहीरपणें सांगतों कीं, दादा कावळे तो मीच. मी दादा कावळे हें नांव धारण करण्याचा योग कसा आला आणि साहित्यिक या धंद्यांत मी कसा पडलों याविषयीं थोडेंसें भाष्य करणें अवश्य आहे. "दादा कावळे" यास साहित्यशिखर ही पदवी मीं दिली त्यावेळेस मी दादा कावळे नव्हतों. दुसरीच व्यक्ति दादा कावळे होती; तथापि ती व्यक्ति आमच्या मालकांस पेचांत आणूं लागली तेव्हां मीच दादा कावळे बनलों, असा थोडक्यांत इतिहास आहे. त्याची कथा देणें अवश्य आहे. साहित्यिक व्हावयाचें म्हणजे फार शिक्षण

पाहिजे असें तुम्ही म्हणत असाल तर तें अजिबात चुकीचें आहे. शिक्षण किंवा विद्वत्तेबद्दल प्रसिद्धि वगैरे गोष्टी साहित्याच्या क्षेत्रांत वावरावयास साहाय्यक होत नसून अपकर्षक होतात असाच माझा दृढ विश्वास आहे. सामान्यपणा हाच मोठा गुण आहे. अलौकिकपणा हाच जगांतला अत्यंत मोठा दुर्गुण आहे, अशीच माझी खात्री झाली आहे. ज्याप्रमाणें बहुतेक मंडळी तांग्यावर पहिल्या वर्गाचें चिन्ह दिसलें म्हणजे तो तांगा वगळतात, आणि कमी दर मागणाऱ्या दुसऱ्या वर्गाचा तांगा पत्करतात, त्याप्रमाणेंच छापखान्याच्या धंद्यांतही आहे. कमी पैशांत नोकरी करणारा नोकर छापखान्यांस परवडतो. जो आज मुद्रितें तपासणारा तोच उद्यां साहित्यिक म्हणून झळकावयाचा. मुद्रितें तपासण्यास बी. ए., एम्. ए. झालेल्या लोकांपेक्षां आमचे सारखे अर्धशिक्षितच लोक अधिक उपयोगी पडतात. तेच पंधरा रुपयांत दहा तास काम करतील. मराठी भाषेंत अर्धशिक्षितांचेंच राज्य आहे. आणि तें आम्हांस राखावयाचें आहे. अल्पशिक्षित लोक कर्तृत्ववान् नसतातच असें मुळींच नाहीं. प्रथम भजींतळ्ये, नंतर कज्जेदलालांचे बिल-कारकून, तदनंतर मुत्सद्दी कसे बनतात ही गोष्ट नामदेवभगिनीनें लिहिलेल्या कथेंत लोकविश्रुतच आहे. मी प्रथम मुद्रितें तपासण्यास जो लागलों तो पुढें आमच्या छापखान्यानें वर्तमानपत्र छापण्याचें कंत्राट पत्करल्यामुळें संपादक बनलों. एवढेंच नव्हे तर पुढें माहिष्मती [ माहीम ] साहित्यिकांचा अध्यक्ष झालों. या माझ्या कर्तृत्वप्रणालीचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे मी अल्पशिक्षित असून मुद्रितें तपासण्याचें काम करूं शकत होतों हेंच होय. प्रथम बनावट संपादक म्हणूनच माझी योजना व्हावयाची होती. असा दैवयोग आला कीं कोणी तरी भुकेच्या तृप्तीसाठीं, संपादकपणाचें ओझें घेण्यासाठीं, तयार असा मनुष्य प्रसिद्धीच्या बाजारांत अवश्य होता. मी तें ओझें घेण्यास तयार झालों. जेव्हां देशभक्तांना सरकारावर टीका करण्यासाठीं कोणी फालतू भाई संपादक म्हणून तयार करावयाचा होता तेव्हां त्यांनीं माझ्या सारख्याची त्या कामावर योजना केली. छापखान्याचें आणि पत्राचें "डिक्लेरेशन" माझ्याच नांवानें केलें. कारण जर सरकारची अवकृपा झाली तर खरा मुत्सद्दी किंवा खरा घरंदाज बळी द्यावयास उपयोगी पडणार नाहीं. तर यासाठीं पहिला धक्का देण्यास फालतू भाईचीच जरूर त्या पत्राच्या चालकवर्गास फारच वाटत होती. आणि त्यामुळेंच माझ्या नांवाचें डिक्लेरेशन झालें. पत्राचा खर्च देण्यास जर कोणी तयार असेल तर आपण पत्र छापूं असें छापखानदार देशभक्तांस सांगता झाला.

देशभक्तांनीं पैसेहि जमविले. पण माझ्या नांवानें डिक्लेरेशन झालें. मी छापखान्यास अडचणींत आणणार नाहीं एवढा माझ्यावर छापखानदाराचा विश्वास होता, व त्यामुळें त्यांनीं मलाच संपादक, मुद्रक व प्रकाशक बनवावें अशी शिफारस केली आणि त्यामुळें देशभक्त मंडळीकडून पगार पंचवीस रुपये, छापखान्याकडून पंधरा रुपये याप्रमाणें मला चाळीस रुपये मिळत होते व कोर्टांतील नोटिसांचे अर्धें उत्पन्न मला मिळावें अशी योजना ठरविली होती.

मी संपादक बनलों तेव्हां मला स्टाफ् जुळविला पाहिजे, तोहि मीं जुळविला-पत्राची जाहिरात तयार केली. त्या जाहिरातींत अनेक संकल्पित लेखकांची तारीफ केली. ज्या देशभक्तांनीं छपाई-खर्च द्यावयाचा कबूल केला होता व ज्यांना पुढें निवडणुकींत उमेदवार म्हणून यावयाचें त्यांची तारीफ तर करणें अवश्य होतें. त्या लेखकांना देशदास, देशभक्त, देशबंधु, दुर्दांत अशा पदव्या दिल्या होत्या. संपादकपणा म्हणजे लोकांना पदवी देण्याचा हक्क. हा ज्याप्रमाणें राजेलोक, शंकराचार्य, यांनीं बजवावयाचा त्याचप्रमाणें संपादकांनीं बजवावयाचा असतो. आमच्या आश्रयदात्यांस त्याचप्रमाणें माझ्या खासगी मित्रांस व ऋणकोंस देखील, मीं पदव्यांनीं मढविलें होतें. मी गांवांत रहावयास आलों तेव्हां प्रथम एका भाड्याच्या खोलींत भाडें विभागून घेण्यासाठीं एक मनुष्य शोधीत होतों. त्यावेळेस एक कवि भाडें अर्धें देऊन रहावयास कबूल झाला. त्याचें भाडें मात्र आलें नाहीं. उलट त्यानें माझ्याकडूनच पंचवीस-तीस रुपये उसने घेतले होते. त्याचें पोट भरण्याची जेथें पंचाईत, तेथें माझे पैसे कसे मिळणार ? जेव्हां मला वर्तमानपत्राचे सर्वाधिकार आले तेव्हां त्यालाहि कांहीं काम द्यावें आणि त्यास जी प्राप्ति होईल तिच्यांतून आपले पैसे फेडून घ्यावेत हा विचार मनांत आला आणि त्यास वर्गणीदार मिळविण्याचें काम द्यावयाचें ठरविलें. तें त्यानें प्रथम कबूलहि केलें. तथापि आपण लोकांकडे त्यांस वर्गणीदार करण्यासाठीं जावयाचें तर आपणही कोणीतरी शिष्ट असलों पाहिजे. केवळ कारकून म्हणून गेलों तर काम व्हावयाचें नाहीं असें त्यानें सांगितलें. तथापि त्यास एकाएकीं महत्त्व देऊं नये, असें मालकांचें मत पडलें; तेव्हां असें ठरलें कीं, कांहींतरी लेखनीनाम जाहीर करावें आणि तें लेखनीनाम आपलेंच असें म्हणून त्यांनीं सांगावें येणेंप्रमाणें ठरलें. लेखनीनाम "दादा कावळे" असें ठरलें. जेव्हां त्या नांवाचा उदो उदो करणें भाग पडलें, तेव्हां अप्रसिद्ध "साहित्यराऊ" उर्फ "झांकलें माणिक" असें ज्याचें वर्णन करावें लागेल, तथापि आपल्या मित्रमंडळींत "साहित्य-

शिखर" या नांवानें जे ओळखले जातात त्या "दादा कावळे" यांचे वाङ्मयविषयक सुंदर व मननीय लेख आमच्या पत्रांत येतील असें मीं जाहिरातींत लिहिलें. "साहित्य-शिखर" या पदवीची जन्मकथा याप्रमाणें आहे. पुढें त्या पदवीचें स्थानांतर कसें काय झालें हें सांगितलें पाहिजे. आमचे स्नेही "दादा कावळे" या नांवाचे जे पहिले अधिकारी होते त्याचें खरें नांव काशिनाथ बकाराम मुळे असें होतें.

आमच्या साप्ताहिकांत प्रथम दादा कावळे आणि काशीनाथ मुळे या दोन्ही नांवांनीं लेख प्रसिद्ध झाले. मुळे कवी होते परंतु त्यांच्या कवित्वाचा साप्ताहिकास फारसा उपयोग नव्हता. रोज बातम्या पाहिजेत, गांवच्या लोकांवर टीका पाहिजेत, या तऱ्हेच्या गोष्टी हव्या होत्या. गांवची राजकारणी मंडळी राजकारणावर लेख लिहीत; तथापि तेवढ्यानें लोकप्रियता वाढणार नव्हती. आमच्यापाशीं लेखकांचा संग्रह बराच आहे, असें लोकांस भासविण्यासाठीं निरनिराळ्या नांवांनीं लेख लिहावे ही आवश्यकता उत्पन्न झाली असल्यामुळें मीं अनेक नांवांखालीं लेख लिहिले. त्याप्रमाणें मुळ्यांनीं, दादा कावळे व काशीनाथ मुळे या दोन्ही नांवाखालीं लेख लिहिले होते. दादा कावळे या नांवाखालीं जो लेख लिहिला त्यांत मात्र मला फारच बदल करावा लागला होता. त्या बदलामुळें मुळे नाखूष झाले, आणि त्या विषयावर तो लेख लिहिण्याचें टाळूं लागला. तो विषय अर्वाचीन कवी आणि कथालेखक असा होता. तथापि मुळ्यांचा आवडता विषय गांवांतील लोकांवर टीका हाच असे. या मार्गानें आपण गरीब असलों तरी बलवान् होऊं असें त्यांस वाटे. "होमरूल लीग" वगैरे ज्या संस्था गांवोगांव स्थापन झाल्या त्यांच्या सभासदवर्गाला नेहमीं भीतींत रहावें लागत असे. ज्यांस सरकारची भीति वाटत नसे असा वर्ग असावयाचाच. तो वर्ग ज्यांच्या पाशीं कांहींएक नाहीं अशांचाच होता. ज्यांच्यापाशीं कांहींतरी पुंजी असे त्याला भीतीचें कारण उत्पन्न झालेंच. अशा परिस्थितीमुळें निष्कांचन लेखकांस आणि वक्त्यांस महत्त्व आलें होतें. या निष्कांचन वर्गापैकीं कित्येक मेहनती लोक होते तर कित्येक निवळ "पॉलिटिशीअन" होते. त्यांना गाढवासारखें काम करणाऱ्याविषयीं तिरस्कार असे. "पॉलिटिशीअन" व्हावयाचें म्हणजे गप्पाबाजी, दादागिरी, दमबाजी करूनच उपजीविका करावयाची असा अर्थ बहुतेक लोक करीत होते. साहित्यसिद्धि हा वर्तमानपत्राचा हेतु नसून आपल्या महत्त्वाची वाढ करावी हाच हेतु असे. वर्तमानपत्र काढावयाचें, तें लोकांचीं बिंगें बाहेर काढण्यासाठीं, कोणाला

तरी चढविण्यासाठीं व कोणाला तरी उतरविण्यासाठीं काढावयाचें, असेंच पुष्कळांस वाटे आणि यासाठींच वर्तमानपत्र नुकसानींतहि चालविण्यांत येई. प्रसिद्धीचें साधन हातांत आहे त्याच्या भोंवतीं दुसरे अनेक लोक गोळा होत असत. या प्रकारची शक्ति उत्पन्न झाली म्हणजे तिचा उपयोग आपली किफायत करण्यासाठीं करून घ्यावयाचा. मला स्वतःला हा पॉलिटिशिअनचा धंदा बरोबर समजत नव्हता. मी नोकरपेशाचा मनुष्य होतों. तो तसाच राहिलों. प्रुफें तपासावींत, सरळ मनानें लेख लिहावेत. या प्रकारच्या गोष्टी करणें म्हणजे केवळ व्यवहारशून्यता समजली जाई. आणि काशीनाथ बकाराम मुळे हा आपल्याला खरा पॉलिटिशिअन समजे. त्याच्या नांवाचें आद्याक्षर, त्याच्या बापाचे नांवाचें आद्याक्षर [ बलयोरभेदः ] आणि आडनांवाचें अंत्याक्षर, मिळून "कावळे" हें नांव तयार झालें होतें. त्यांत अशीही खुमारी होती कीं मुंबईच्या पळसे ब्राह्मणांना तें आपलें आडनांव वाटावें. कारण कावळे हें आडनांव त्यांच्यांत व देशस्थ ब्राह्मणांतही होतें. कावळे आडनांव लावून पत्राकडे कांहीं लोक आकर्षावे, तर मुळे आडनांव ठेवून दुसरे आकर्षावे, असा त्याचा हेतु होता. मुळे आडनांव देशस्थांत, देवरुख्यांत, कऱ्हाड्यांत, भोयांत, आणि कासारांत असल्यामुळें आपली खरी ज्ञाति अप्रसिद्ध रहावी, अशीहि त्याची इच्छा होती. अनेक लोकांत मिसळून त्यांच्या उखाळ्या पाखाळ्या वर्तमानपत्रांत आणाव्यात, विरुद्ध बाजूचेंहि पत्र छापावें अशा तऱ्हेची हुशारी बाळगून त्यानें सबंध साष्टी जिल्ह्यांत कहर उडविला. येणेंप्रमाणें आमच्या मुळ्यांच्या हुशारीला दुसरेंच वळण लागलें. वर्तमानपत्रांत अनेकांचे फोटोही मीं देण्यास सुरवात केली होती.

वर्तमानपत्र चालविण्याची खरी विद्या या मुळ्यांसच समजत आहे असेंही मला वाटूं लागलें. मात्र हा कधींतरी वर्तमानपत्रास गोत्यांत आणील असें मधून मधून वाटे. एकदां हा लहानशा गांवीं गेला तेथें हेडमास्तरानें शाळा पहाण्यास सांगितलें. त्याचें शाळेंत व्याख्यान झालें. तेव्हां त्या गांवच्या लोकांनीं 'मुळे यांचा केलेला सन्मान' यावर एक लेख त्यानें दडपून दिला. अर्थात् मास्तरानें आपल्या प्रास्ताविक भाषाणांत मुळे यांची जी ओळख करून दिली तिचें रसभरित वर्णन पत्रांत आलेंच होतें. हें वर्णन अर्थात मुळे यांनीं आपल्याच कल्पनेप्रमाणें घातलें होतें. आणि त्यांत त्यांची साहित्यसेवा, त्यांची लोकहिताविषयीं कळकळ, याविषयीं वर्णन दडपून दिलें. ऑफिसच्या व्यवहारांतील एक मौज या दृष्टीनें मीं कोणच्याही प्रकारची त्यास हरकत घेतली नाहीं.

मुळे यांच्या लेखनव्यवसायाला निराळेंच वळण मिळालें. "साहित्य-शिखर" दादा कावळे यांची अर्वाचीन कवींवर लेख लिहावयाची इच्छा बरीचशी मंदावली, व दादा कावळे यांचा जो पहिला साहित्यविषयक लेख आला त्याच्यानंतर दुसरा कां आला नाहीं म्हणून लोक पृच्छा करूं लागले. मुळे यांची खरोखर कवींच्या कवितेवर विचार करून लिहिण्याची इच्छाच नव्हती. त्यांच्या मनांत यशवंत, गिरीश, मायदेव, यांच्यावर वर्षाव करावयाचा होता. हे केवळ सकाव्य गायक आहेत, कवी नाहींत. आणि यांचा आवाज गोड असल्यामुळें यांची तारीफ होत आहे, वगैरे गोष्टी सांगावयाच्या होत्या. परंतु त्याबरोबर जरा विचार करण्याची आणि अभ्यास करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली असती. तसें "गाढवासारखें खपणें" अर्थात् आमच्या मुळ्यांस नको होतें. पण आम्ही "साहित्य-शिखर" दादा कावळे यांची, यांच्या विद्वत्तेची बरीच तारीफ केली होती. तर ती तारीफ सार्थ होण्यास कांहींतरी आपण नियमानें लिहिलें पाहिजे, असें जेव्हां मीं मुळ्यांस सांगितलें, तेव्हां मुळ्यांनीं "साहित्य-शिखर" दादा कावळे वारले असें समजून आपण त्यांचा एक मृत्युलेख लिहावा असें सुचविलें. अर्थात् या प्रकारचा लेख लिहिणें मला पसंत नव्हतें. मीं अर्थात् शेवटीं विचार करून दादा कावळे हें नांव स्वतःलाच घेण्याचें ठरविलें आणि पुढें मात्र "साहित्य-शिखर" वगैरे विशेषणें कधींच लावलीं नाहींत. जोंपर्यंत दुसऱ्या कोणास मोठें करावयाचें होतें, तोंपर्यंत "साहित्यरत्न", "साहित्य-शिखर" वगैरे बनविण्यास मला दिक्कत वाटली नाहीं. पण स्वतःच्या योग्यतेची जाणीव मला पूर्ण असल्यामुळें मी स्वतःसच "साहित्य-शिखर" म्हणवून कसा घेऊं ! केवळ दादा कावळे एवढेंच लेखकाचें नांव देऊन मीं आधुनिक कवींवर आपली लेखणी चालविली. ती चालवितांना एक मात्र मनांत ठेविलें कीं, खोटी स्तुति करावयाची नाहीं, आणि खोटी निंदा करावयाची नाहीं. कवीच्या काव्याचें मर्म आपणांस विशेष समजलें नाहीं तर, दुसऱ्या कोणापाशीं चर्चा करावयाची, व साधारणपणें जें कांहीं लिहावयाचें तें अभिज्ञतापूर्वकच लिहावयाचें. मला जाडे शब्द येत नव्हते. सोप्या शब्दांनीं मांडणें ही क्रिया अर्थात् स्वाभाविकपणेंच होऊं लागली. आणि त्यामुळें बरेचसे कवि "दादा कावळ्यांवर" खूष होऊन गेले. आणि एका कवीनें आपल्या कवितेची जाहिरात देतांना, दादा कावळे यांच्या लेखाचा उतारा दिला, व त्या नांवाला 'साहित्य-शिखर' हें उपपद शोधून काढून जोडलें. त्याचाच कित्ता दुसऱ्या अनेक कवींनीं गिरविला. अर्थात्

अनेक कवि आपल्याच गौरवासाठीं त्यांचा गौरव करणारा दादा कावळे यांस "साहित्य-शिखर" असें म्हणूं लागले. त्याप्रमाणें कित्येक दादा कावळ्यांचा उपहास करण्याकरितां जो लेख लिहिते झाले, त्यांत दादा कावळ्यांचा मूर्खपणा दाखविण्या-साठीं टीका करतांना विरुद्ध गुणन्यास अलंकार साधण्यासाठींच कीं काय "साहित्य-शिखर" हें पद मुद्दाम लावूं लागले. आणि त्यामुळें उलट्या–सुलट्या स्वल्पविरामांत लिहूं लागले. आणि येणेंप्रमाणें "साहित्य-शिखर" या नांवाचा मुकुट दादा काव-ळ्यांच्या डोक्यावर कायमचा बसला. तथापि रा. नरसोपंत केळकरांप्रमाणें मीं आपल्या पत्रांत आपलीच तारीफ करणारीं वाक्यें घातलीं नाहींत. नरसोपंतांना "साहित्य-सम्राट्" मला वाटतें कीं विजय साहित्य मालाकारांनीं आपल्या मालेची जाहिरात करण्यासाठींच अगोदर बनविलें होतें. आणि पुढें गडकरी स्मृति-दिनाच्या दिवशीं नरसोपंतांना "साहित्य-सम्राट्" बनविण्यास केवळ अनंतराव गोखले कारणीभूत झाले, कीं आजकाल कादंबरीकार म्हणून अत्यंत लोकप्रिय झालेले आणि

॥ शालूसमान मिळतो फडक्यास मान ॥

ही जुनी नाना फडणिसाच्या काळीं व्यक्त झालेली उक्ति सार्थ करूं पहाणारे प्रो. फडके देखील त्या प्रकारच्या हुशारींत सामील झाले होते याविषयीं सांगतां येत नाहीं. तारीफ करण्याच्या हेतूनें त्याचप्रमाणें उपहासाच्या हेतूनें पदवी वापरली जाण्याचें भाग्य देखील नरसोपंतांस मजप्रमाणें लाभलें आहे. नरसोपंतांनीं डॉ. केतकर यांस हैद्राबाद संमेलनाचे अध्यक्ष नेमल्याबद्दल तडफडून ( डॉ. केतकरांच्या गैरहजेरींत ) त्यांजवर तोंडसुख घेतलें, तेव्हां त्यांच्यावर खरपूस टीका करतांना व्याजोक्तीचा अलंकार साधण्यासाठीं मुंबईच्या "प्रगति" पत्रानें त्यांच्या "साहित्य-सम्राट्" पणाचा उद्धार केला. आणि तेव्हांपासून लोक नरसोपंतांना "साहित्य-सम्राट्" म्हणतात, म्हणून केसरीकारही लोकांस वारंवार सांगूं लागले ! ! नरसोपंत केळकर "साहित्य-सम्राट्" होण्यापूर्वींच "साहित्य-शिखर" ही पदवी मला मिळाली होती. पण ती पुन्हां पुन्हां आपल्या पत्रांत जाहीर करण्याचें औद्धत्य मजपाशीं तरी निदान नव्हतें.

—x—

प्रकरण २४ वें.

## माझें दुसरें लग्न.

माझें दुसरें लग्न झालें तें कसें याविषयीं पुष्कळ मंडळी मला पृच्छा करतात. माझ्या लग्नांतील विशेष गोष्ट म्हटली म्हणजे तें एका नर्सबरोबर झालें. ती विधवा होती. मी आजारी म्हणून इस्पितळांत होतों, आणि इस्पितळांत असतां ती विद्यार्थी म्हणून शिकत होती. माझ्याविषयीं सहानुभूति बाळगून माझ्यासाठीं कांहींतरी करावें अशा तऱ्हेची भावना तिची दिसून आली. मी श्रीमान् नाहीं ही गोष्ट तिला ठाऊक होती. आणि नर्सेस म्हणजे जे त्यांना बक्षीस देतील, चाकोलेट खावयास देतील–त्यांच्याशींच त्यांनीं सहानुभूति बाळगावी असा इस्पितळांतील अलिखित कायदा असतो. तथापि तो तिनें मोडला होता. निर्धन मनुष्यासाठीं देखील कांहींतरी करावें ही तिची वृत्ति माझ्या दृष्टीस पडली. आणि सहानुभूति बाळगणाऱ्या स्त्रीवर प्रेम जाणें स्वाभाविक आहे. व तसें माझें गेलेंही होतें. इस्पितळ सोडून जेव्हां मी जाऊं लागलों तेव्हां मात्र मी गोदूबाईस म्हटलें कीं " मी जरा बरा झालों आहें, तरी देखील हें इस्पितळ सोडून जाणें वाईट वाटतें; कारण तुमचें स्मितमुख माझ्या दृष्टीस पडणार नाहीं." गोदूबाईनें आणखी एक सलज्ज स्मित केलें. मी इस्पितळाच्या बाहेर पडलों. त्यानंतर थोडक्याच दिवसांनीं डॉ. घैसास यांचेकडे कंपाउंडर म्हणून कामास राहिलों होतों. त्यावेळेस गोदूबाई नर्स म्हणून बाहेर पडल्या होत्या. आणि एक चिठी घेऊन डॉ. घैसास यांस भेटावयास आल्या. त्यांनीं ती चिठी मला दाखविली. त्या चिठींत गोदूबाईस सर्व प्रकारें साहाय्य करावें असें लिहिलें असून ती चिठ्ठी डॉ. घैसास यांचे मामेभावानें लिहिली होती. डॉ. घैसास हे आपणांस कांहीं रुग्णशुश्रूषेसाठीं बोलावीत जातील असें वाटतें व मी देखील आपल्यासाठीं खटपट करीन असें सांगितलें. गोदूबाईंना आनंद झाला. त्यांची रहाण्याची जागा वगैरे विचारून घेतली व त्यांच्याकडे जाऊं येऊं लागलों. गोदूबाई ही कोंकणस्थ ब्राह्मण विधवा होती; तथापि तिच्याशीं लग्नाची गोष्ट काढण्याचें धैर्य मला बरेच दिवस झालें नाहीं. याचें कारण उघडच होतें. डॉ. घैसासांकडून मला फक्त तीस रुपये मिळत. आणि गोदूबाईंची प्रॅक्टीस पन्नास, साठ रुपयांपेक्षां अधिक होती. म्हणजे पैशाच्या दृष्टीनें गोदूबाई माझ्यापेक्षां उच्चवर्णीय झाल्या होत्या.

एका दिवशीं मी गोदूबाईकडे गेलों त्यावेळीं गोदूबाई ह्या जेवण करीत होत्या. हें पाहून मजला आश्चर्य वाटलें. कारण त्या नेहमीं खाणावळींतून डबा आणीत असत. त्या रहात असलेली जागा आधुनिक सुखसोयींची होती व ती सर्व प्रकारें घरीं जेवण करण्यास लागणारें साधनसाहित्य व भांडीकुंडीं यांनींहि सजविलेली होती. त्या जेवण करीत असतांना पाहिल्यामुळें मीं लगेच त्यांना विचारलें "काय आज हातांनींसा स्वयंपाक करतां ?" त्या म्हणाल्या "अहो, मला जेवण करण्याची फार हौस आहे. पण येऊन जाऊन एकट्याकरितांच ना जेवण करावयाचें ! त्यामुळें मी कंटाळा करतें. शिवाय मला जेवणसुद्धां चांगलें करतां येतें. राहाना तुम्ही आज जेवावयाला ! जेवण तयार आहे."

"नको हो ! तुम्हांला त्रास कशाला ?"

"त्रास कसला आहे त्यांत !"

याप्रमाणें बोलणें झाल्यावर मी अतिआग्रहामुळें जेवावयास रहाण्यास तयार झालों. आमचें एकीकडे बोलणें चाललें होतें. आम्ही दोघेंहि जेवीत होतों. मधूनच माझेकडून त्यांनीं केलेल्या पदार्थांचें परीक्षण होत होतें. परंतु तें फक्त "चांगलीच भाजी झाली आहे," "पोळी किती सुंदर व खरपूस झाली आहे." वगैरे वगैरे. आमचें जेवण आटोपल्यावर आम्ही बैठकीच्या खोलींत कोचावर बसलों होतों. नेहमीं बोलणें निरनिराळ्या विषयांवर चाले; परंतु आज काय झालें होतें कुणास ठाऊक, प्रत्येक प्रश्न निघे तो कांहींतरी एकमेकांच्या हृदयीं जाऊन भिडेल अशा प्रकारचा निघत होता.

"तुम्हांला नाहीं काहो खाणावळीचा कंटाळा येत ?" गोदूबाई म्हणाल्या.

"येतो. पण येऊन उपयोग काय ?"

"अहो ! माझी काशी मेली आणि मी घरगुती जेवणास मुकलों. आतां मला नाहीं वाटत, कीं मजला घरगुती जेवण जेवावयास सांपडेल."

"तुम्ही प्रयत्न करीत नाहीं म्हणून तुम्हांला हें नैराश्य वाटतें !"

"मी प्रयत्न कोणत्या आधारावर करावयाचा ? एकतर मी विधुर, माझी द्रव्यार्जन शक्ति संकुचित, अशा स्थितींत मजला कोण मुलगी देणार ? शिवाय एकाद्या गृहस्थानें द्यावयाची कबुली दिली तरी पुढें तिचे व माझे विचार जमले तर ठीक ! नाहींतर पश्चात्ताप व्हावयाचा नाहीं ?"

"ओळख करून आपलीं एकमेकांचीं मतें, आर्थिक स्थिति व इतर किरकोळ गोष्टी या पटवून मगच तिचेजवळ लग्न करावें."

"तें तर शक्य नाहीं. कारण मी कुमारिकांजवळ या प्रकारची ओळख करून घ्यावयास नाकबूल आहें. कारण विधुरांजवळ कुमारिकांचा विवाह व्हावा या मताच्या मी विरुद्ध आहें. जर विधुरास लग्न करावयाचें असेल तर त्यांनीं तें विधवेजवळ करावें."

"मलासुद्धां असेंच वाटतें."

"मग काय हो गोदूबाई तुम्ही पुनर्विवाह करण्याच्या विरुद्ध नाहीं. मग तुम्हीं पुनर्विवाह कां केला नाहीं?"

"माझा असा दृढनिश्चय होता कीं आपण आर्थिक दृष्टीनें पूर्ण स्वावलंबी झाल्याशिवाय पुनर्विवाहासंबंधानें मनांत विचारच आणावयाचे नाहींत. पण आतां असें वाटूं लागलें आहे कीं, आतां हा प्रश्न विचारांत घ्यावयास हरकत नाहीं."

हें बोलणें त्या बोलत होत्या व मी त्यांच्या होत असलेल्या हालचालींकडे लक्षपूर्वक पहात होतों.

गोदूबाई म्हणाल्या, "तुम्हीं जशीं आपलीं मतें मला सांगितलीं, तशीं मी माझीं सांगतें. आपण स्वावलंबी व्हावें, पुनर्विवाहित पतीला आर्थिक मदतीची आवश्यकता भासल्यास त्यास करतां यावी. परंतु ती मदत त्यास कर्तव्यशून्य बनण्यास उपयोगी पडणार नाहीं येवढी खबरदारी घ्यावयाची."

हे त्यांचे विचार ऐकून मी आनंदित झालों. माझी कल्पना नव्हती कीं, गोदूबाईंचे विचार इतके परिपक्व असतील. या त्यांच्या विचारामुळें मला गोदूबाईजवळ लग्नासंबंधी गोष्ट काढण्याचें धैर्य होत नव्हतें तें आज होणार असें वाटून एकदम आनंदानें बेहोष झाल्याप्रमाणें माझ्या सर्व हालचाली होऊं लागल्या. साहाजिकच ही स्थिति गोदूबाईंच्या लक्षांत आली. त्यांनीं मला विचारलें,

"तुम्ही जरा वेळापूर्वीं बोलत असतांना गंभीर दिसत होतां पण आतां इतक्यांतले इतक्यांत खेळकर व उल्हसित दिसूं लागलां याचें कारण काय?"

"काय सांगूं जें अप्राप्त असतें व तें प्राप्त होईलच असें जरी निश्चित नसलें तरी पण प्राप्त होण्याचीं बरींच चिन्हें दिसूं लागलीं तर त्यावेळीं जशी एकाद्याची

स्थिति होईल, तशी माझी आतां झाली आहे. ती कायम ठेवणें मात्र तुमच्या हातीं आहे. ”

“ म्हणजे ? मी समजलें नाहीं. पण एवढेंच सांगतें कीं, माझ्याकडून जी गोष्ट होण्यासारखी असेल ती मी आनंदानें करीन. ”

“ जी गोष्ट विचारण्याचें आजपर्यंत मला धारिष्ट्य झालें नाहीं, तें आज झालें आहे. ”

“ लवकर विचारा तुमचा प्रश्न—”

त्यांची प्रश्न विचारण्यासंबंधीची घाई पाहून माझ्या प्रश्नाचा कल काय आहे हें यांनीं ताडलेलें असावेंसें वाटलें.

“ तुमचे माझे विचार एकमेकांस पटतात तर तुम्हीं माझेजवळ लग्न केलें तर मला वाटतें आपलें आयुष्य सुखमय जाईल; तर तुम्हांस काय वाटतें ? ”

त्यांनीं प्रश्नाचें उत्तर होकारार्थी मानेनें व सलज्ज स्मितानेंच दिलें. तें स्मित माझ्या हास्पिटलमधील घरीं येण्याच्या दिवसापेक्षां मजला थोडेंसुद्धां कमी भासलें नाहीं.

या वेळीं गोदूबाई माझ्या लगट कोंचावर बसल्या होत्या व दोन्ही हातांनीं पदराचे टोकाशीं त्यांचा चाळा चालू होता.

आमचें पुढें लग्न झालें व मी जो आर्थिक बाजूनें नीच वर्णीय होतों तो लग्नाचे पुढील जबाबदारीमुळें स्वाभाविकच जास्त जास्त प्रयत्नांनीं उच्च वर्णीय होत गेलों.

—x—

प्रकरण २५ वें.

## स्वातंत्र्ययुद्धांत माझा भाग.

स्वातंत्र्ययुद्धांत मीं भाग घेतला नाहीं असें नाहीं. त्यावेळेस मी मुंबईस होतों. आणि बरेच चमत्कार पहात होतों. मुंबईस असतांच लाहोरची कॉंग्रेस झाली. जवाहिरलाल अध्यक्ष झाला. आणि स्वातंत्र्य हें तावडतोबीचें साध्य आहे असें ठरलें. स्वातंत्र्य ही केवळ जेवावयाची गोष्ट आहे काय ? तुम्ही करणार आहांत तरी काय या प्रकारचे प्रश्न लोकांमध्यें उपस्थित होत होते. आणि शेवटीं " मिठाचे कायदे मोडावयाचे " असें ठरलें. वर्ध्याचा मारवाडी तुरुंगांत गेला, नरीमन तुरुंगांत गेला वगैरे बातम्या रोज पत्रांतून येऊं लागल्या. व एक दिवसा आड हरताळ जाहीर होऊं लागला. त्यावेळेस व्यापाराची मंदी सपाट्टून होती. आणि त्यामुळें हरताळास जोर येत होता. दुकानदार म्हणत कीं, हरताळ झाला तर फायदा होतो. आम्हांला रोज दुकानांत जावें लागतें. पण जाण्यायेण्याचा ट्रॅमखर्चीहि निघत नाहीं. पण दुकानांत येऊं नये म्हटलें तर गिऱ्हाईक दुसऱ्याकडे जाणार. सर्वच दुकानें बंद असलीं म्हणजे गिऱ्हाईक कोठें जाणार ? हरताळ जाहीर झाला म्हणजे निदान दोन आणे ट्रॅमचे आणि चार, पांच आणे फराळाच्या खर्चाचे तर वांचले. येणेंप्रमाणें जो हरताळ जाहीर होत होता त्याचा हेतु स्पष्ट होत होता. मिठाचा सत्याग्रह करून तुरुंगांत जाणारांची संख्या वाढत होती. त्यावेळेंस असें झालें होतें कीं उद्योगहीन वर्ग इतका वाढला होता कीं "सत्याग्रही व्हालंटीअर"च्या कॅंपमध्यें दाखल झालें म्हणजे जेवणाची तरी ददात मिटली असें वाटे. आणि तुरुंगांत गेलें म्हणजे कांहींतरी महिन्यांची ददात मिटली. या तऱ्हेनें "तुरुंग" आणि "सत्याग्रही लोकांचा कॅंप" हें उद्योगहीन लोकांस साधन झालें होतें. सरकारशीं लोकपक्ष स्वराज्य मागत आहे, आणि आमच्या तुरुंगांत जाण्यानें मोठें देशकार्य होणार आहे ही समजूतदेखील होतीच. पण ही समजूत, करावें लागतें तें गोड करण्यासाठींच आहे असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. ज्याअर्थीं बऱ्याच लोकांना तुरुंग ही बेकारीपणापासून एक मोठी सोडवणूक झाली होती, त्याअर्थीं सत्याग्रह लोकप्रिय झाला यांत नवल तें काय ? मंडळी नोकरीसाठीं हिंडत व नोकरी मिळाली नाहीं म्हणजे "सत्याग्रहाचे व्हालंटीअर" होण्याची खटपट करीत.

नोकरी मिळविण्याच्या बाबतींत जशा पक्षपाताच्या गोष्टी होत, तशाच सत्याग्रही व्हालंटीअर होण्याच्या बाबतींत देखील होत.

याच सुमारास झेंडावंदन आणि प्रभातफेरी हे दोन लोकप्रिय कार्यक्रम सुरू झाले; ज्या कार्यक्रमामुळें गोंडस देखावा उत्पन्न होईल, आणि त्या गोंडस देखाव्याचे आपण भाग बनूं तो कार्यक्रम लोकप्रिय व्हावा यांत नवल तें काय? प्रभातफेरीचा तर कार्यक्रम गाण्याचा. त्यांत माधुर्य आहेच. शिवाय तरुण मुलगे आणि तरुण मुली यांच्या राजरोस भेटी व्हावयास याच्या योगानें संधि उत्पन्न होई, हीहि एक त्या कार्यक्रमाच्या लोकप्रियतेची बाब होती. समाजामध्यें, स्त्रीपुरुषांमध्यें जो परस्पर संबंधाभाव आहे आणि जो तरुण स्त्रीपुरुषाच्या प्रेमसंवर्धनास अपकर्षक आहे, तो संबंधाभाव आतां नाहींसा होऊन आतां मदनाचें आणि प्रेमाचें स्वैरराज्य स्थापन होईल असें वाटूं लागलें. गांधीच्या आश्रमांत आणि गुजरात विद्यापीठांत तरुण मुलींस अनीतीच्या मार्गावर जाण्यास उत्तेजन देणाऱ्या गोष्टी होत आहेत, असे आरोप जे अमदावादच्या पत्रांत पूर्वींपासून येत असत आणि जे खरे वाटत नसत ते आतां खरे वाटूं लागले.

कायदेभंगाची चळवळ सुरू झाल्यावर कांहीं ठिकाणीं स्त्रियांच्या देशभक्तीच्या भाषणाला ऊत आला. पुष्कळ ठिकाणीं स्त्रिया बोलावयास शिकल्या. पुष्कळ ठिकाणीं स्त्रिया सत्याग्रहांत पडल्या तर "वायकांना काय पोलीस मार देणार आहे?" असें म्हणून जे वाणी स्वतः चोप घ्यावयास नाखुष होते ते आपल्या बायकांना पाठवूं लागले. बायकांना देखील देशसेविकेचा केशरी पोषाख घालून दुकानावर जाऊन "बसायचा" सत्याग्रह करायचा मोठा उत्साह उत्पन्न झाला. एखाद्या कार्यक्रमांत जितका दिखाऊ भाग जास्त आणि खरें काम कमी तितका तो कार्यक्रम आकर्षक अधिक व त्यास अनुयायीहि अधिक; हें तत्त्व गांधीनें ओळखिलें होतें. व सरकारनेंहि त्याचें महत्व योग्य तऱ्हेनें जोखलें होतें. जेव्हां युद्धाचा आविर्भाव युद्धाचाच सूचक असतो तेव्हां त्याचें महत्त्व असतें; तथापि जेव्हां तो आविर्भाव केवळ आविर्भावाचाच द्योतक आहे, असें दिसून येतें, तेव्हां याकडे सरकार स्मितपूर्वक उपेक्षा करीत असलें पाहिजे! प्रभातफेरी झेंडा वंदन या गोष्टी प्रत्यक्ष उपद्रव न करणाऱ्या होत्या. मिठाचा सत्याग्रह देखील आंत सवाईचा धंदा होता. एक रुपयाचा खर्च करून चार आण्याचें मीठ करावयाचें असा हा व्यवहार किती दिवस चालणार? कांहीं व्यक्तींनीं असें बेकायदेशीर तयार झालेलें मीठ सभेंत विकण्याचा जोरदारपणा दाखविला. त्यांना ठाऊक होतें कीं, हें

मीठ बेकायदेशीर आहे असें सरकारला सिद्ध करावें लागेल आणि तें तसें होतें याला आपल्याच म्हणण्याखेरीज दुसरा पुरावाच नाहीं. एवंच ज्याला खरोखर तुरुंगांत जावयाचें त्याची सरकार सोय करीत असे, पण ती सवड पाहून करीत असे.

महात्मागांधी आणि त्यांच्या अनुयायांचीं व यंत्रांचीं वैगुण्यें माझ्या लक्षांत आलीं नाहींत असें नाहीं. पण ज्याच्या नांवानें कुंकू लावावयाचें त्याचें पौरुषवैगुण्य लोकांस सांगून उपयोग काय ? काय करावें लागलें हेंच सांगितलें पाहिजे. एकोणीसशें तेवीस सालापासून पुढच्या सात वर्षांचा माझा वृत्तांत बराच विविध आहे. राष्ट्रीय शाळांतून बाहेर पडलेले विद्यार्थी आणि आम्ही नित्य व्यवसाय गमावून बसलेले लोक हे दोघेहि वर्ग एकाच होडींत होतों. आणि तेव्हांपासून आम्हांला एकमेकांबद्दल सहानुभूति वाटत होती. जे बरेचसे लोक ठराविक व्यवसायांच्या बाहेर पडले, त्यांचेहि कांहीं दिवस दुसरे ठराविक व्यवसायच झाले. निरनिराळ्या डिस्ट्रिक्ट असोसिएशनचे किंवा कॉंग्रेस कमेट्यांचे कारभारी किंवा सेक्रेटरी होणें हे आमचे नित्याचे धंदे होतेच. प्रचारक म्हणून जे आम्ही काम करीत होतों त्या सर्वांनीं आम्हीं एक ओळखिलें होतें कीं कॉंग्रेसचे जे पुढारी आहेत त्यांपैकीं बहुतेक दुसरे धंदे करून पुढारीपण करणारे आहेत. नेहमींचा जीवितोद्योग त्यांचा निराळाच आहे. आणि त्यामुळें त्यांना आपलें महत्त्व कायम राखण्यासाठीं चोवीस तास विचार आणि कारवाई करण्याचा अवकाशच नाहीं. जर कोणी कायमचा कार्यकर्ता असेल तर तो "गांधीच" आहे. त्यांतल्या त्यांत त्याला बहुरूपीपणा धरतां येणार आहे. वकिली धंद्यांतल्या मनुष्याला लंगोटी लावणें शक्य आहे काय ? ज्याला दुसरा उद्योग नाहीं त्यालाच सर्व प्रकारचे नखरे करणें शक्य आहे. त्यामुळें कॉंग्रेसमध्यें प्रत्येकाचें पद अस्थिर आहे. स्थिर असेल तर तें फक्त गांधींचें आहे. तोच आपला खरा अन्नदाता आहे. तो पैसे मिळविण्यासाठीं हवा तितका निलाजरा बनेल. हवीं तीं सोंगें करील, हव्या त्या गोष्टी करून त्यांचें समर्थन करण्याची अक्कल त्यालाच आहे. अनेक लटपटी करून यश कसें पावावें, आपलीं माणसेंच अधिकारांत कशीं राखावीं याची युक्ति देखील त्यालाच ठाऊक आहे. तर आपण आपल्या भाकरीच्या खात्रीसाठीं महात्मा गांधींसच एकनिष्ठ राहिलें पाहिजे, असें मला वाटत होतें.

—×—

[ डॉ. केतकर यांच्या मनांतून आणखी कांहीं प्रकरणें लिहावयाचीं होतीं, परंतु त्यांचे आकस्मिक मृत्यूमुळें तीं लिहिणें शक्य झालें नाहीं. ]

4622